# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. ११/११/२०११**

आज शुक्रवार दि. ११/११/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. २९/१०/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २२) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २३) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २४) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २५) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २६) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| २७) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| २८) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| २९) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३०) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३१) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३२) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३३) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३६) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ३७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ३८) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ३९) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४१) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४४) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ४५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ४७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ४८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ४९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५७) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ५८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६१) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | हंसुकुमार पांडे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| २) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| ३) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ८) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ९) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| १०) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ११) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| १२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १५) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| १६) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| १७) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| १८) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| १९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| २०) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| २१) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार, दि. ११/११/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०८, दि. २९/१०/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, विषयाला सुरूवात केलेली आहे. सर्वप्रथम सन्मा. महापौर आणि आपल्या सर्वांचे ह्याठिकाणी अभिनंदन करतो. आजची तारिख ११-११ महिना आणि ११ वाजून ११ मिनिटांनी आणि ११ सेकंद हे व्यवस्थित जुळून आलेले आहे. सन्मा. महापौर साहेब त्यांच्या कारकिर्दीत वेळेवर आलेले आहेत. आणि वेळेवरच मिटींगची सुरूवात केलेली आहे. त्याबद्दल आपल ह्याठिकाणी अभिनंदन करतो. आणि अशीच वेळेवर आपण सगळ्या गोष्टी करत रहा अशी मी आपणाला सुचना करतो. आपण जर चांगली कृती केली तर समोरचा व्यक्तिसुध्दा चांगली कृती करू शकतो. आपण शहराचे प्रथम महापौर आहात आपण जर वेळेवर सगळ्या गोष्टी केल्या तर त्याचा मेसेज चांगल्या पध्दतीने समाजामध्ये जाईल. पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देतो. धन्यवाद.

**नरेंद्र मेहता :-**

दरवेळेला ११ वाजून ११ मिनिटांनी सभा चालू व्हावी अशी आमची अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-**

अभिनंदन केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. आणि अशाच खेळेमेळीच्या वातावरणात सभा चालवू या अशी माझी इच्छा आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरता तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सन्मा. नरेंद्र मेहता ह्यांची आहे. दुसरी लक्षवेधी सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांची आहे. तिसरी लक्षवेधी प्रमोद सामंत ह्यांची आहे. अशा तीन लक्षवेधी आल्या आहेत . त्या मी मा. महापौरांकडे सुपूर्द करतो.

**मा. महापौर :-**

ह्याठिकाणी तीन लक्षवेधी आल्या आहेत. त्याच्यातील सन्मा. नरेंद्र मेहता ह्याची लक्षवेधी फेटाळण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्याची देखील लक्षवेधी फेटाळण्यात येत आहे. आणि प्रमोद सामंत ह्याची लक्षवेधी शहराच्या हिताची असल्यामुळे त्याची लक्षवेधी घेत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपण लक्षवेधी फेटाळली त्याच्याबद्दल आमचे काय मत नाही. आपल्याला विषयाचे महत्व वाटत नाही का? आपल्याला महत्व वाटत नाही का?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

लक्षवेधी एकच घ्यायची असते.

**नरेंद्र मेहता :-**

लक्षवेधी एकच आहे. पण महत्वाची घ्या. आपल्याला बोलता येत नाही. रूलिंग ते देतील. रूलिंग महापौर देतील आपण देऊ नका.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी तुम्हाला नियम सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब बोलतील आपण बोलू नका. आम्ही सांगितल आमची लक्षवेधी स्विकारा. आपला अधिकार आहे. आपल्याला महत्वाची वाटत नाही का?

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर साहेब, माझी लक्षवेधी घेतली त्यासाठी तुमचे धन्यवाद. सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंताकडून आणि अधिकाऱ्याकडून ठेकेदारांकडून..........

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, प्रत्येक वेळेला सत्ताधाऱ्याचेच प्रस्ताव असायला पाहीजे का? आपण एवढ सक्षम आहात की, आपल्याला लक्षवेधी आणि 'ज' चे प्रस्ताव आणायची गरज नाही. आपण सक्षम आहात आपण करू शकता. तरी सुध्दा ही परिस्थिती आहे.

**मा. महापौर :-**

आपले जे प्रश्न आहेत त्यासाठी सन्मा. आयुक्त आहेत ते प्रश्न सोडवतील.

**शरद पाटील :-**

आज जी ओमप्रकाश गारोडियाने जी लक्षवेधी आणली ती आज आणलेली लक्षवेधी नाही त्याच्यावर कुठलीही कारवाई होत नाही ह्याचे गांभिर्य लक्षात घेत नाही.

**मा. महापौर :-**

तुमचे दोन्ही विषय प्रशासनाचे आहेत. तर तुम्हाला प्रशासनाकडून सोडवता आले नाहीत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला सोडवता आला नाही म्हणून विषय इथे आणला. तुम्ही सत्ताधारी आहात. तुम्हाला सोडवता आला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आयुक्त तुमच ऐकत नाही का?

**शरद पाटील :-**

साहेब, एकाचा प्रश्न नाही. आम्हाला न्याय मिळत नाही ही लक्षवेधी सहा वेळा आणली आहे. तुम्ही लक्षवेधी घेत नाही त्याच्यावर कारवाई होत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

२००५ पासून लक्षवेधी आणतो आजची लक्षवेधी नाही. ५ वी लक्षवेधी आहे. आणि प्रशासनाच्या कामकाजाबद्दल ही लक्षवेधी आहे. कोणा व्यक्तिबद्दल आरोप नाही. आपल्या माहीतीसाठी सांगतो मला आताच माहीत पडल की, ह्या लेखापरिक्षण अहवालाबद्दल स्वतः मा. आयुक्तांनी शोकॉज नोटीस दिलेली आहे. ते कामकाज बरोबर नाही म्हणून काही गोष्टीचे गांभिर्य बघितले पाहीजे. तुम्ही सत्ताधारी आहात. तुम्ही विषय आणू शकता, तुम्ही प्रश्न आणू शकता, तुम्ही कार्यवाही करू शकता. विरोधी पक्षनेत्याच तरी कधी ऐकले पाहीजे. आमची लक्षवेधी कमीत कमी वाचून तरी घ्या. लोकांना कळू द्या. प्रशासनाचे काय काम चालू आहे. तुम्ही सहा वेळा लक्षेवधी फेटाळली आहे.

**प्रमोद सामंत :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रियेचे वेगवेगळे घोटाळे ज्या त-हेने केले जातात. त्याबद्दल माझी लक्षवेधी आहे. आणि त्याबद्दल माझ काय निवेदन आहे ते लक्षात घेऊन सार्वजनिक विभागाकडून त्या गोष्टी क्लियर करण्यात याव्यात. त्याच स्पष्टीकरण देण्यात यावे. विषय असा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरवर्षी वेगवेगळ्या निविदा काढल्या जातात. त्या निविदा नंतर ई-टेन्डरींगवर प्रक्षेपित करण्यात येतात आणि त्या कशाप्रकारे प्रक्षेपीत करण्यात येतात त्याबद्दल ही लक्षवेधी आहे. काही टेंडर असे असतात की ते अस्थायी काम म्हणजे सर्वधर्म उत्सव किंवा पोलिओच म्हणजे काही विषय अशी असतात स्थायी म्हणजे रस्ता बांधकाम ह्या गोष्टी बद्दल असतात. सर्वधर्म उत्सवाच जे टेंडर आपल्या पालिकेकडून दरवर्षी दिले जात त्या निविदेमध्ये ऑगस्टपासून आपण निविदा प्रक्रिया चालू करतो. ऑगस्ट महिन्यापासून उत्सव चालू होतात. तर निविदा प्रक्रिया देखील ऑगस्ट महिन्यापासून चालू करतो. मला असा प्रश्न पडतो की ऑगस्ट महिन्यात ठेका दिला जातो तर दोन महिने अगोदर ही निविदा प्रक्रिया का सुरू करत नाही. उशीराने निविदा प्रक्षेपीत करून घाईघाईने ते टेंडर कोणाला तरी दिल जाते. टेंडर दिले जाताना जे टेंडर फॉर्म निघतात माझ्यामते महाराष्ट्र शासनाने काही निर्देश दिले आहेत. अटीशर्ती ठरवल्या आहेत. प्रत्येक वेळेला त्याच अटीशर्ती असल्या पाहिजेत. म्हणजे नॉम्स असतील त्याच टर्नओव्हर असेल त्याच्याकामाच एक्सपिरियन्स असेल त्यांना लागणारे सर्व्हिस टॅक्स किंवा व्याज त्याची जी कागदपत्राची पूर्तता करायची असेल त्या सगळ्या गोष्टी असतील. ह्यावर्षी जो टेंडर प्रोसेस करण्यात आला तो ऑगस्ट महिन्यात वेलंकनी उत्सव सुरू असताना म्हणजे २८ ऑगस्टला वेलंकनी उत्सव सुरू होता. आपली टेंडर प्रोसेस तीन तारखेला सुरू करण्यात आली. तीन तारीख ते दहा तारखेचा वेळ देण्यात आला. त्यानंतर १२ तारखेला टेंडर ओपन होणार होते ते ओपन झाले नाही. २० तारखेला पून्हा रिटेडरिंग झाले हा जो कमी वेळ देण्यात येतो तो देण्यात येऊ नये असे का होते त्याचे स्पष्टीकरण प्रशासनातर्फे मिळायला पाहिजे. दूसर म्हणजे त्याच्यात ज्या अटीशर्ती असतात अटीशर्ती मध्ये गेल्या वर्षाचा जो टेंडर फॉर्म होता, टेंडर नोटिस होती किंवा टेंडरच्या ज्या जनरल इस्ट्रक्शन होते. त्यामध्ये ५० लाखाचे टर्न ओव्हर १ लाख ४० हजार च्या टेंडर साठी ५० लाखाचे टर्न ओव्हर मागितल गेल होत. मला कूठेच अस आढळल नाही की १ लाख ४० हजाराच्या टेंडरसाठी ५० लाखाचे टर्न ओव्हर आवश्यक आहे. आणि ते अशाप्रकारे का करण्यात आल त्याच मला उत्तर पाहिजे. जर ५० लाखाच टर्न ओव्हर गेल्यावर्षी आवश्यक होत तर हयावर्षी ती अट का घालण्यात आली नाही. हयावर्षी तो टेंडर फॉर्म प्रिन्टं करण्यात आला त्यामध्ये सुरूवातीला इ.पी.एफ. पी. एफ. ची अट टाकण्यात आली. गर्व्हमेंन्ट काम करण्याची अट टाकण्यात आली ती गेल्यावर्षी होती नंतर रि-टेंन्डरींग करताना कूठलाही गव्हरमेंन्ट एक्सपिरियन्स कामाचा एक्सपिरियन्सची अट टाकण्यात आली नाही. ही जी तफावत दोन वेगवेगळया टेंडर प्रोसेस मध्ये ती का आहे? नक्की कोणत्या अटीशर्ती आपण मान्य करतो? कोणाला फॉलो करतो ही एक महत्वाची गोष्ट आहे ती प्रशासनातर्फे क्लियर करण्यात यावी. शुध्दी पत्रक जवळ जवळ १ करोड रूपयाच सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सर्वधर्म उत्सवाकरिता दरवर्षी बिलींग करण्यात येते. या एक करोडचे बिलींग करत असताना शेवटच्या दिवशी म्हणजे ज्या दिवशी टेंडर ओपन होणार आहे त्याच्या आदल्या दिवशी शुध्दीपत्रक काढण्यात येते की ५० लाखाची टर्न ओव्हर पाहिजे मग पहिली ५ ते ७ दिवस मुदत असते त्या काळात ज्या ज्या लोंकानी निविदा फॉर्म डाउनलोड केले आहेत किंवा जे इच्छूक असतील त्यांना काय करायच? ही एवढी महत्वाची अट होती तर ती सुरूवातीपासून का टाकली नाही. तुमचा एवढया वर्षाचा अनुभव आहे. तुम्ही दरवर्षी हीच प्रोसेस करता तर ती अट तुम्ही सूरूवातीपासून का टाकत नाही. मला हयांच्यात दाट संशय येतो की सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे हया निविदा काढताना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो. निविदा काढताना भ्रष्टाचार होऊ नये म्हणून ऑनलाईन निविदा काढण्यात येतात. हया निविदा काढताना गेल्यावर्षी २०१०-११ मध्ये निविदा प्रक्षेपित करण्यात आल्या निविदाची स्टार्ट डेट २३-०८ होती. २३-०८ ला निविदा प्रक्षेपित न होता २७-०८ ला प्रक्षेपित होतात म्हणजे पाच दिवस उशिराने नंतर शेवटची डेट असते दोन तारीख आणि ३१ तारखेला ३० तारखेला नविन अमेंटमेन्ट होते. हया सगळया प्रोसेस बघितल्यावर हया टेंडर प्रोसेसमध्ये फार मोठया प्रमाणात काही ठरावीक ठेकेदाराना फायदा होण्यासाठी जाणून बुजून हया अटी टाकल्या जातात. उशिराने प्रक्षेपित केल जाते. त्याच्यासाठी आपण काम करतो अस दिसण्यात येते ही सर्वधर्म उत्सवाचे झाले. त्यानंतर पब्लिक डिपार्टमेन्टच पॅचवर्कसाठी निविदा काढण्यात आल्या त्याची स्टार्ट डेट २६ तारीख होती. साहेब ही

चार करोडची टेंडर प्रोसेस आहे. चार करोडच्या टेंडर प्रोसेस मध्ये २६ तारीख ओपनिंग डेट आहे ती निविदा ३० तारखेला इ टेंन्डरीगवर दाखवण्यात आली २६ तारखेला डाउन लोड व्हायला पाहिजे ते फॉर्म चार दिवस अजून उशिरा अस करतात? तर त्याच मला उत्तर देण्यात आले. इंटरनेट बंद असल्यामुळे त्या निविदा उशिरा करण्यात आल्या. २७ तारखेला सर्वधर्म उत्सवात देण्यात आल्या. मग त्या मॉडेशिअल आहेत. पॅचवर्कच्या ज्या निविदा आहेत त्या चार दिवस उशिरा का देण्यात आल्या? त्या २७ ला का प्रक्षेपीत झाल्या नाहीत? त्या ३० तारखेला का प्रक्षेपीत झाल्या? मला असे वाटते की, सार्वजनिक बांधकाम विभागात कुठेतरी ठराविक ठेकेदारांना फायदा पोहोचविण्यासाठी ह्या प्रकारचे खेळ खेळले जातात. आणि त्यांना फायदा पोहचवला जातो. त्याच्यापुढे जाऊन मी मा. महापौरांना आणि मा. आयुक्तांना पत्रव्यवहार केलेला आहे. निविदा प्रोसेसमध्ये प्रशासनाच्या क्लियर इस्ट्रक्शन आहेत. एकाच घरातील ब्लड रिलेशन असलेल्या व्यक्तिने एकाच टेंडरसाठी एकाच वेळी बिड करू शकत नाही. अस असताना देखील मी मा. आयुक्तांना पत्र लिहून दाखविलेले आहे. आणि मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एकाच घरातील एका व्यक्तिने जवळ जवळ १५ वर्ष असतील एकाच घरातील एक व्यक्ति ह्या टेंडरसाठी बिड करते म्हणजे त्याचा प्रोपायटर मी असेल तर माझा मुलगा दुसऱ्या कंपनीचा मॅनेजर आहे. किंवा पॅनकार्ड होल्डर आहे. किंवा गुमास्ता लायसन्स त्याच्या नावावर आहे अशाप्रकारे केले जाते. सर्वधर्म उत्सव आणि त्यासाठी लागणार बोटीचा जो बोटीसाठी टेंडर भरतो तोच माणूस मंडपासाठी टेंडर भरतो त्या माणसाकडे कुठल्याही तऱ्हेचा एक्सपिरियन्स नसताना त्याला कन्सिडर केले जाते किंवा जो मंडप आणि लाईट व्यवस्था करण्यासाठी ज्याला टेंडर दिले जाते तो बोटीसाठी टेंडर भरतो. त्यालाही कुठला एक्सपिरियन्स नाही. मग तुम्ही प्रत्येक वेळेला एक्सपिरियन्स मागवता तो कशासाठी मागवता. त्याचे काही प्रमाण आहे का तुम्हाला जर त्यांना एक्सपिरियन्स नसेल तर तुम्ही त्याला कन्सिडर का करता? एखादा टेंडर देताना तीन निविदा आपल्याला अपेक्षित असतात. जर दोन कंपन्यांना अजिबात एक्सपिरियन्स नसताना ते जर निविदा भरत असतील तर तुम्ही त्यांना दुसरी प्रोसेस करा. रिटेंडरिंग करा. पण आपण रिटेंडरींग करताना पुन्हा अटीशर्ती बदली करुन टाकतो. मा. आयुक्त साहेब हया गोष्टीकडे तुम्ही लक्ष दिल पाहिजे आणि मला प्रशासनाकडून हया गोष्टीचा सभागृहाला खुलासा व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. टेंडर देतानाची ही प्रोसेस झाली त्याच्यात हा भष्ट्राचार आहे. टेंडर दिल्यानंतर ठेकेदार रेट देतो. रेटच निगोशिएशन्स होत आणि निगोशिएशन्सनंतर काम दिल जात. आपले अभियंते एवढे हूशार आहेत की, अभियंतानी ज्या गोष्टीची किंमत बाजारात अडीज हजार रुपये आहे पालिका त्याच गोष्टीचे दिवसा चार हजार भाड देत म्हणजे दीड हजार रुपये जास्त देते. कूठल्याच अभियंताला एवढा एक्सपिरियन्स नाही का? की हया गोष्टीची किंमत अडीज हजार रुपये आहे आणि चार हजार का दिले जातात. ती गोष्ट आपण विकत घेत नाही. तर हया गोष्टीकडे लक्ष दयायच आणि अशाप्रकारे महापालिकेच आर्थिक नुकसान केल जात. काम दिल्यानंतर कामाचा रेकॅार्ड केला जातो. २००७ पासून ज्या नोंदणी मोजणी बूकात केलेल्या आहेत ते अस्थायी काम आहे आपण आज केल ते दोन दिवसासाठी असते त्याचा कूठलाही प्रूप दोन दिवसानंतर आपल्याकडे नसतो. हया अस्थायी कामाची नोंद जवळ-जवळ वर्षभरात करण्यात येते. म्हणजे आज आपण ११-११-२०११ ला काम केल हया कामाची नोंद आज झाली पाहिजे. क्लियर इंस्ट्रक्शन आहेत पण त्या कामाची नोंद वर्षभरात केली जाते हा कोणता नियम आहे. हयाच स्पष्टीकरण दयाव नोंदी करताना त्या कामाची कूठेच नोंद नाही. कोणत्या दिवशी काम झाल, कोणत्या ठिकाणी काम झाल कूठलीच नोंद त्याठिकाणी केली जात नाही त्या नोंदीवरती ठेकेदाराच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी झाली पाहिजे. त्याच्यासमोर ती नोंदी झाली पाहिजे तेही दिसत नाही. वेलंकनी उत्सवाचे आपल्याकडे १६ लाखाच बजेट असते. ते आपण निविदेमध्ये दिल आहे. दरवर्षी २२ ते २४ लाख त्या उत्सवासाठी खर्च करतो. दरवर्षी तेवढा खर्च करता तर ती प्रोव्हिजन का करत नाही? तेवढी प्रोव्हिजन केली पाहिजे. माझ्याकडे असा डेटा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी वेलंकनी उत्सवात २०१०-११ ठेकेदार १३-८-२०१० च्या वर्क ऑर्डरनूसार पेमेन्ट मागतो पैशाची मागणी करतो आणि आपल बांधकाम खात ७-८-२००९ प्रमाणे त्यांना पेमेन्ट करते. कुठल्या वर्क ऑर्डरप्रमाणे आपण पेमेन्ट केल आहे. ठेकेदार मागतो यावर्षीच्या वर्क ऑर्डरप्रमाणे आणि आम्ही देतो गेल्या वर्षीच्या वर्क ऑर्डरप्रमाणे. हया दोन्हीमध्ये जवळ-जवळ ७ लाख ९४ हजाराच डबल पेमेन्ट आम्ही केलेल आहे. जे काम झालच नाही त्याच पेमेन्ट केलेले आहे हे आपण तीन वर्ष करतो जर ठेकेदाराने १३-८ प्रमाणे पैसे मागीतले तर तुम्ही ७-९-०९ प्रमाणे का पेमेन्ट करता? हया वर्षीप्रमाणे पेमेन्ट करा. हया मधली तफावत कशाप्रकारे आहे. आणि ही चूक का करण्यात आली आहे. हया सगळया गोष्टीच उत्तर प्रशासनाने सभागृहाला दयाव अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. चार करोडचे टेंडर आपण फक्त ३ दिवस ऑनलाईन ठेवतो ते ८ दिवस का ठेवत नाही. जरी इंटरनेट अवेलेबल नसेल तर आपण ते पून्हा का प्रकाशित करत नाही. तेवढा वेळ ठेकेदाराना का देण्यात येत नाही? हया सगळ्या गोष्टीचे उत्तर प्रशासनाने द्यावे. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. प्रमोद सामंतने जी लक्षवेधी मांडली आहे. जर इंटरनल बघितल जेवढा बांधकाम दोषी तेवढा लेखापाल दोषी आहे. हे मी माझ्या लक्षवेधीत बोलणार होतो. पेमेन्ट कसे निघाले. पेमेन्ट काढणारे सार्वजनिक बांधकामाने बिल दिल असेल तरी शेवटी ती जबाबदारी लेखापरिक्षकाची आहे की ते काम झाल का नाही. कूठल्या पध्दतीने झाल आहे. बिल दिल आहे ते खोट आहे की खर आहे. तेवढा जवाब हया लेखा परिक्षणाने दिला पाहिजे. त्याच्या विषयामध्ये दोन्ही क्लब आहे. फक्त टेंडर प्रक्रिया हा भाग वेगळा आहे आणि पेमेन्ट देण हा भाग वेगळा आहे. हे दोन्ही त्याच्यात मिक्स आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिलच पाहिजे. इ-टेन्डरींगमध्ये कसा काय विलंब होतो त्यानंतर लेखापालने देखील त्याबाबतीत झालेला गैरव्यवहार पेमेन्ट कशा पध्दतीने झाले त्याचा खुलासा लक्षवेधीच्या माध्यमातून झाला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सन्मा. नगरसेवक प्रमोद सामंत हयांनी जी लक्षवेधी मांडली आहे त्याबाबतीत ते आमच्या विभागाकडे जवळ-जवळ एक वर्ष पत्रव्यवहार करतात. त्यांच्या प्रत्येक पत्राला आम्ही उत्तर दिलेल आहे.

**प्रमोद सामंत :-**

प्रत्येक पत्राला वेगवेगळी उत्तर दिली जातात. विचारलेले प्रश्न वेगळे असतात आणि उत्तर वेगळी दिली जातात. आम्ही फार प्रामाणिक आहोत अस उत्तर देतात.

**दिपक खांबित :-**

प्रत्येक पत्राचे उत्तर दिले जाते. बांधकाम विभागाकडून जेवढी टेंडर प्रसिध्द होतात ते गेल्या दोन वर्षापासून इ-टेन्डरींग द्वारे प्रसिध्द होतात आणि पेपर जाहिरात जी आहे ती आपण एक राज्यस्तरीय पेपरला देतो आणि एक स्थानिक पेपरला देतो. एक मराठीमध्ये असते एक इंग्रजीमध्ये असते आणि टेंडरच्या प्रक्रियेबद्दल आम्हाला कोणत्याही ठेकेदाराने वेळ कमी मिळाला हयाबद्दल कधीही कम्प्लेन्ट आलेली नाही. अशी जर तक्रार आली तर आम्ही त्यांना त्या-त्या वेळी वेळ वाढवून दिलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

ठेकेदारानी जरी कम्पलेन्ट केली नसेल तरी हे तुमच्या समोर आहे. चार करोडचे टेंडर आहे २५-८ ही त्याची स्टाट डेट आहे. तुम्ही ३० तारखेला ऑनलाईन येता. ३० तारखेला किती वाजता येता ते तरी बघा.

**दिपक खांबित :-**

साहेब, त्याच मी तुम्हाला उत्तर दिल काय प्रॉब्लेम झाला त्याबद्दल..............

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही काय उत्तर दिल नेट अवेलेबल नव्हत. नेट तुम्हाला २७ तारखेला अवेलेबल झाल आणि नेट अवेलेबल नव्हत तुम्हाला माहित नाही. नेट अवेलेबल नव्हत तर तुम्ही अवधी वाढवायची.

**दिपक खांबित :-**

इ-टेंडरींगचा जो विभाग आहे त्याची उत्तर दिलेली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

नेट अवेलेबल नव्हत तर तुम्ही अवधी वाढवायची.

**दिपक खांबित :-**

माझ्या संबधित विभागाची जी उत्तर आहेत ती मी आता देतो.

**प्रमोद सामंत :-**

मला तेच सांगायच आहे की चूकीची उत्तर दिली जातात. जर तुमच्याकडे नेट अवेलेबल नव्हत तर तुम्ही त्याची अवधी का वाढवली नाही. तुमच्या सार्वजनिक विभागाची टेंडर होती. तुम्हाला ती आठ दिवसात प्रक्षेपित झाली पाहिजे. ती चारच दिवस का प्रक्षेपित होतात.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडून टेंडर जे आहेत ते जी-वन  नमूना आणि पेपर नोटिसची कॉपी ही इ-टेन्डरींग सेलला दिली जाते. जी टेंडर पब्लिश करतात. ती त्या डिपार्टमेन्टकडूनच केली जातात. ती बांधकाम विभाग करत नाही. आमच्याकडे ते टेंडर आल्यानंतर आम्ही ती डॉक्यूमेन्ट घेऊन पूढची प्रोसेस करतो. तो पर्यंत जी प्रोसेस आहे ती इ-टेन्डरींग सेल मार्फत करण्यात येते.

**प्रमोद सामंत :-**

तुमच्या ई-टेन्डरीगच्याच निविदा आहेत. सी.एफ.सी.च्या निविदा नाहीत. तुमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा आहेत.

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेची सगळी जी काम आहेत ती वाटून दिलेली आहेत. त्याप्रमाणे आम्ही करतो.

**प्रमोद सामंत :-**

त्या विभागाने तुम्हाला कळवल नाही का? की नेट अवेलेबल नाही म्हणून?

**दिपक खांबित :-**

आम्हाला कळवल नाही.

**प्रमोद सामंत :-**

मग कोण दोषी आहे.

**दिपक खांबित :-**

कोणाची कम्पलेन्ट आली नाही. आमच्याकडे कम्पलेन्ट आली असती तर आम्ही चौकशी केली असती.

**प्रमोद सामंत :-**

तुमच्याकडे कितीतरी कम्पलेन्ट आहे. तुमच्याकडे माझी कम्पलेन्ट आहे.

**दिपक खांबित :-**

ह्या बाबतीत एक कम्पलेन्ट नाही. मी तुम्हाला इतर प्रश्नांची उत्तर देतो.

**प्रमोद सामंत :-**

इतर नाही हया प्रश्नाच उत्तर दयाव. तुमच्या विभागाच टेंडर आहे ना? तुम्हाला कॉम्पीटेशन करायच आहे ना?

**दिपक खांबित :-**

करायची आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्हाला पालिकेच्या फायदयासाठी ठेवलेलं आहे. तुम्ही का नाही केल.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे एकही कम्पलेन्ट नाही.

**प्रमोद सामंत :-**

मी दिली आहे ना.

**दिपक खांबित :-**

तुम्ही लेखी स्वरुपात दिली नाही.

**प्रमोद सामंत :-**

माझी लेखी कम्पलेन्ट तुमच्याकडे आहे.

**दिपक खांबित :-**

मी उत्तर दिल असणार.

**प्रमोद सामंत :-**

माझ पत्र दाखवतो. तुम्ही वेळ मारुन घेऊ नका. मी दाखवतो पत्र.

**दिपक खांबित :-**

त्याला उत्तर देखील मिळाल असेल.

**प्रमोद सामंत :-**

नेट बंद आहे अस उत्तर मिळाल. मग तुम्ही अवधी का नाही वाढवला.

**दिपक खांबित :-**

कूठल्या टेंडरच.

**प्रमोद सामंत :-**

चार करोडच जे टेंडर आहे त्याचा अवधी वाढवला नाही. आणि सर्वधर्म उत्सवाच टेंडर आहे त्याचा देखील अवधी वाढवला नाही.

**दिपक खांबित :-**

हया बाबतीत आमच्याकडे कूठलीच तक्रार आली नाही.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही सभागृहाची दिशाभूल करुन घेऊ नका.

**दिपक खांबित :-**

सभागृहाला देखील कळू दया.

**प्रमोद सामंत :-**

माझ पत्र आहे. पत्र यायच्या अगोदर तुम्ही बघीतल पाहिजे. चारच दिवसाचा अवधी दिला आहे. नियमाप्रमाणे आठ दिवसाचा अवधी दिला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

पेपरला पण आहे. तुम्ही बोलता इ-टेन्डरीगला डेटची चूकी झाली पण निविदेची डेट आहे ना.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही ऑनलाईन निविदा मागवता त्यावेळेला त्या प्रक्षेपित करण्याचा वेळ पण तेवढाच पाहिजे.

**दिपक खांबित :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

डॉक्यूमेन्ट स्टाट डेट २६ तारीख देता आणि डॉक्यूमेन्ट डाऊनलोड करता ३० तारीख म्हणजे चार दिवसाचा डिफरन्स केला की नाही.

**दिपक खांबित :-**

जाहिर वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केल.

**प्रमोद सामंत :-**

त्याला अटीशर्ती नाहीत.

**दिपक खांबित :-**

त्याबद्दल एकही तक्रार आली नाही.

**प्रमोद सामंत :-**

ठेकेदाराला अटीशर्ती दिसल्याच नाहीत. तुमच्या अटीशर्ती प्रत्येक वर्षी बदलतात? का बदलतात. ५० लाखाची अट गेल्यावर्षी होती. टेंडर कंडीशनमध्ये ५० लाखाची अट गेल्यावर्षी होती. तुम्हाला कोणी सांगितल की ५० लाखाची अट काढून टाका म्हणून.

**दिपक खांबित :-**

निविदामध्ये ज्या अटी असतात त्या संपूर्ण प्रशासनामार्फत टेंडर फॉम तयार केला जातो आणि तुम्ही बोलता ५० लाखाची दोन वर्षापूर्वी अट काढून टाकली. टेंडरमध्ये कुठलीही अट कुठल्याही क्षणी बदलण्याचा अधिकार असतो.

**प्रमोद सामंत :-**

ही अट घालण्याचा तुम्हाला शासनाने गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. त्याप्रमाणेच तुम्हाला करायच आहे. प्रशासन वेगळया गाईडलाइन बनवत नाही. शासनाच्या गाईड लाईन्स आहेत. प्रशासनाच्या गाईड लाईन्स चालत नाही.

**दिपक खांबित :-**

ह्या वर्षी आम्ही सेन्ट्रल व्हीजीलन्स कमिशनच्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्याप्रमाणे अटीशर्ती टाकल्या.

**प्रमोद सामंत :-**

गेल्यावर्षी का नाही टाकल्या.

**दिपक खांबित :-**

गेल्यावर्षी नाही टाकल्या. तुमची तक्रार आली म्हणून.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही सर्व सभागृहाला मूर्ख समजून उत्तर देता. त्यांना अस वाटते की, सभागृहाला काहीच कळत नाही. अस त्यांनी नाही केल पाहिजे. सभागृहाची दिशाभूल करतात.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

तुमचे असे म्हणणे आहे की, सर्वधर्म उत्सवाच्या अंतर्गत जे टेंडर निघतात ते सगळया एकच ठेकेदाराला दिले जातात. ह्या बाबतीत वस्तुस्थिती खरी आहे. जी सर्वधर्म उत्सवाची टेंडर निघतात ती आपल्याकडे एकच ठेकेदार गेल्या २० वर्षापासून काम करतो. ह्या बाबतीत मिरा-भाईंदरमध्ये जेवढे ठेकेदार आहेत त्यांना प्रत्येक वेळेला नोटिसची कॉपी देतो. त्याना कळवलेल आहे की हयाच्यामध्ये टेंडर फीड करा तरीसुध्दा टेंडरमध्ये कोणी इकडे येत नाही. ह्याच्यामध्ये आमची काही चूक नाही.

**प्रमोद सामंत :-**

का येत नाही त्याची कारणे आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

तो एकच ठेकेदार हे करतो म्हणजे शहरातील इतर ठेकेदार काम करायला इच्छूक नाही अस तुम्हाला म्हणायच आहे की त्यांची दादागीरी आहे म्हणून ते येत नाही.

**दिपक खांबित :-**

अस काही नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही सांगता त्याचा अर्थ असा होतो. तुम्ही अस सांगता की कोणी टेंडर भरतच नाही. म्हणजे बाकी लोक त्या लाईनचा धंदा करत नाही का?

**दिपक खांबित :-**

टेंडर येत नाहीत ना. (सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

आज ह्या टेंडरमुळे अस वाटते की, नगरसेवकाना आणि सभागृहाला कुठेतरी जाग आली आहे  अस वाटते. परंतु स्टॅन्डिंगमध्ये मंजुर करताना ह्या विषयावर विरोध प्रत्येक वेळेला होत गेलेला आहे. स्टॅन्डिंगमध्ये मंजुर करताना त्यांनी हा विचार केला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या विषयावर स्टॅन्डिंगमध्ये जेव्हा आम्ही विरोध करत होतो. ह्या विषयाबद्दल जंगम साहेब होते.

**प्रमोद सामंत :-**

ठेकेदार ह्यामध्ये का सहभाग घेत नाही की २८ ऑगस्टला वेलंकनी उत्सव होतो. टेंडर ३ तारखेला ऑनलाईन केल आहे. आपल्याला माहित नाही की उत्सव २८ तारखेला सुरु होतो. दोन महिने अगोदर प्रोसेस का पूर्ण केली नाही? लोकाना वेळ का नाही दिला? तुम्हाला माहिती आहे २० वर्ष एकच ठेकेदार हे काम करतो. एकाच ठेकेदाराची मक्तेदारी आहे. तुम्ही लोकाना दोन महिने का वेळ दिला नाही. अव्हेरनेस का केले नाही? ह्यावर्षी ई-टेन्डरींग केले. आयुक्त साहेब १८ तारखेला पेपर नोटिस २० तारखेपासून ऑनलाईन २० तारखेलाच अमेंटमेन्ट येते की २४ लास्ट डेट चारच दिवस दिले जातात.

**दिपक खांबित :-**

मिनिमम ७ दिवस दिले आहेत.

**प्रमोद सामंत :-**

कुठे दिले आहेत तुम्ही बघा.

**दिपक खांबित :-**

मिनिमम दयायला त्याला कारण अस ठरल की, वेलंकनी उत्सव २९ तारखेला सुरु होणार होता.

**प्रमोद सामंत :-**

तीच चूक मला सांगायची आहे.

**दिपक खांबित :-**

आम्हाला त्या ठेकेदाराने मागणी केली होती की, मागच्या दराने काम करण्यास तयार आहे. त्याला काम द्यायचं नव्हत. म्हणून आपण रि-टेंन्डरींग करुन नविन टेंडर घेतले.

**प्रमोद सामंत :-**

कूठले टेंडर

**कल्पना म्हात्रे :-**

मा.महापौर साहेब, ह्याच्याच पक्षाचे सभापती तिथ असतात तेव्हा त्याच्या लक्षात आणून दिल पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही प्रोसीजर चूकीची आहे. स्थायी समितीला अधिकार आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही चूक केली ती मान्य करा.

**दिपक खांबित :-**

त्याच्यात चार टेंडर आले. त्याच्यात जे आले त्यांना त्याच दिवशी ऑर्डर दिली होती.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही ठेकेदाराना तेवढा वेळ देत नाही.

**दिपक खांबित :-**

तुम्ही हे जे मुद्दे काढले त्याच्यात मा. आयुक्तांनी मुदतवाढ न देता नविन प्रक्रिया राबवली ठेकेदाराचे जे टेंडर आले. त्याच्यात जे लिमिट होते, त्याच्याशी निगोशिएशन करुन त्यांना वर्क ऑर्डर दिली. मिरा-भाईंदरचे असोसिएशन आहे. जे रेट आहेत त्याहीपेक्षा आपले रेट कमी आहेत. ते तुम्हालाही माहित आहे कारण तुम्ही पण त्या असोसिएशनमध्ये आहेत त्यामुळे तुम्ही जे रेट बोलले चार हजार की दहा हजार दिल त्या विषयाबद्दल दूसरा विषय तुम्ही सांगितल डबल पेमेन्ट दिलेल आहे. एका कामाच डबल पेमेन्ट दिलेल नाही त्या कामाचे दोन बिल म्हणजे एक रनिंग बिल आणि दूसर फायनल बिल दिल. अस करुन पेमेन्ट दिल. वेलंकनी उत्सवाचा जो १६ लाख खर्च होतो तो एक वर्षी २३ लाख झाला कारण त्यावर्षी खास सण होता. त्यावर्षी पालीला स्वतः आमदार आले होते. तत्कालिन आयुक्ताकडे मिटींग झाली त्यानंतर तेथे वाढीव व्यवस्था ठरल्यामुळे ते एकाच वर्षी काम केल. दरवर्षी काम केलेल नाही. ते डबल पेमेन्ट केलेल नाही.

**प्रमोद सामंत :-**

साहेब दोन वर्ष पेमेन्ट केलेल आहे. एक वर्षी २२ लाख केले. दुसऱ्या वर्षी २४ लाख केलेले आहे. ह्या वर्षी देखील मी बोललो असते. तर आणखी केल नसत. माझा त्या कामाला २२ लाख किंवा २४ लाख का खर्च झाला त्याबद्दल आक्षेप नाही. माझा आक्षेप हा आहे की त्या कामाला २२ लाख खर्च होतो किंवा २५ लाख खर्च होतो तर त्याप्रमाणे प्रोव्हिजन करुन निविदा मागवा.

**दिपक खांबित :-**

बरोबर आहे. पत्रव्यवहार झाल्यानंतर झाल ना.

**प्रमोद सामंत :-**

कस काय. पत्रव्यवहार केल्याशिवाय तुम्हाला कुठल्या गोष्टी लक्षात येत नाही का?

**दिपक खांबित :-**

नाही ना. तुम्ही दोन महिने अगोदर टेंडर द्यायला पाहिजे. त्याप्रमाणे आम्ही कारवाई करु.

**एस.ए.खान :-**

साहेब, तुम्ही २० वर्ष केलेल नाही ह्यावर्षी करा.

**दिपक खांबित :-**

टेंडरमध्ये टाईम लिमिट आहे तो कमी पडतो. आपल्या बी.पी.एम.सी. ॲक्टप्रमाणे पाच दिवसाचा टाईम आहे. मंडप डेकोरेटरच्या कामासाठी तो कालावधी पूढच्या वर्षी वाढवू. आणि दोन महिने अगोदर टेंडर काढू अस मी आमच्या विभागाकडून आयुक्ताकडे शिफारस करु.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब ह्या विषयाला अनुसरुन टेंडर प्रक्रिया वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केली जाते. वृत्तपत्रामध्ये अटीशर्तीचा उल्लेख नसतो. तो ऑनलाईनच व्हायला लागते ही खरी परिस्थिती आहे. नेट बंद असला किंवा अनेक

तांत्रिक अडचणी असतात. त्यामुळे ठेकेदाराला वेळेवर करता येत नाही. त्या विषयावर त्या विभागाने विशेष लक्ष द्यायला पाहिजे. एका डिपार्टमेन्टवर सगळ काम सोडू नका. त्या विभागाने अशी कूठली अडचण निर्माण झाली तर त्याच्यावर लक्ष द्यायला पाहिजे त्यांना अवधी वाढवून द्यायला पाहिजे. कोटेशन जे येतात ते १०० टक्के बंद करा ऑनलाईनच करा. त्यांना दोन्ही मुभा दिली गेली आहे. एक ऑनलाईन आणि हाताने ते निविदा काढून देऊ शकतात. बाय हॅन्ड १०० टक्के बंदा करा. ऑनलाईनच करा.

**दिपक खांबित :-**

बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये अमेंटमेन्ट झाली त्यानुसार पहिले ३ हजार वरुन ५० हजाराचे कोटेशन होते. आता ते कोटेशन दोन लाखापर्यंत झाले आहे. आणि २ लाखापर्यंत संपूर्ण प्रोसेस जी आहे ती इ-टेन्डरींग द्वारे होते. आपल्याकडे पैसे जे आहेत ते अनामत रक्कमा म्युनिसिपाल्टीत चेक जमा करुन घेतो. तेही कम्पलीट बँकेमध्ये जमा करुन घेतो. म्हणजे ठेकेदाराला तक्रार करायला वाव देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

ते मंजूर आहे.

**दिपक खांबित :-**

आणि दोन लाखाच कोटेशन जे आहे ते ॲक्टमध्ये प्रोव्हिजन आहे की, संकेत स्थळावर प्रसिध्द करा त्याप्रमाणे आपण करतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब ह्याची चाचपणी आपण करा आणि करा. १०० टक्के ऑनलाईनच करा.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, हर त्योहार में टेंडर दिया जा रहा है १० टक्का बढाके दिया जा रहा है। इसका मतलब ऐसा होता है की वेलंकनी माता के त्योहार का विरोध है क्या १० टक्का बढाके दिया तो क्या होता है। हर बार बढाके ही दे रहे है ना।

**प्रमोद सामंत :-**

विरोध पैसे किती दिले त्याचा नाही. किंवा जास्त दिले त्याचा नाही. विरोध हा आहे की जर एवढा खर्च येतो तर त्याप्रमाणातच टेंडर का नाही काढत.

**स्नेहा पांडे :-**

हर टेंडर बढाके ही दिया जा रहा है।

**प्रमोद सामंत :-**

विषय असा आहे की कोणाचाही उत्सवाचा कूठल्याही धर्माचा, कूठल्याही कामाचा विरोध नाही. उत्सव झाले पाहिजेत लोकांनी एकत्र आल पाहिजे त्यातूनच समाजकरण होत. मला अस सांगायच आहे की आपल्याला २२ लाख रु. खर्च होतो तर तुम्ही २२ लाखाचीच निविदा मागवा ना. तुम्ही १६ लाखाच्या हिशोबान निविदा मागवणार. म्हणजे ठेकेदाराला ३० टक्के एक्स्ट्रा नंतर देणार तस करु नका. अस दिसून येते की हा निव्वळ भ्रष्टाचारासाठी करण्यात आलेल आहे. आपण जे जनरेटर मागवतो त्याचा रेट १२,००० ते १५,००० रु. आपण निगोशिएट करतो. ३,००० रु. कमी करतो. १२,००० देतो पण तो जनरेटर मागविताना स्टँडबाय म्हणून वापरला जातो. मग तुम्ही निविदा मागवताना स्टँडबाय जनरेटर असच का नाही मागवत?

**दिपक खांबित :-**

जर तिकडे लाइट गेली तर काय करणार? प्रशासनाला उत्तर द्यायला लागते.

**प्रमोद सामंत :-**

स्टँडबाय म्हणून मागवा. आणि जर यूज केला तर एवढे असे मागवा त्यामुळे तुम्हाला ४० टक्के अजून फायदा होणार आहे. तुम्ही बघून घ्या. वर्षभरासाठी जनरेटरसाठी किती पैसे देतात.

**अनिल सावंत :-**

त्यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. स्टँडबाय म्हणून जर मागवला आणि यूज केला तरच पैसे मग आपण आयडियल कामाचे पैसे कशाला द्यायचे. त्यांची सुचना बरोबर आहे.

**प्रमोद सामंत :-**

त्यानंतर मला मोजणी बूकाच सांगा. वर्ष-वर्षभर उशिरा केले जातात.

**दिपक खांबित :-**

त्याच उत्तर मी तुम्हाला लेखी देतो.

**प्रमोद सामंत :-**

मोजणी बूकाच्या तक्रारी तुमच्याकडे आहेत.

**दिपक खांबित :-**

आहेत.

**प्रमोद सामंत :-**

मग बघायच ना. आज लक्षवेधी आहे तुम्ही बघून सांगा. मा. आयुक्ताकडे आमची तक्रार आहे. ऑडिटर साहेबानी उत्तर द्याव. एकाच वर्षी एकाच वेळी दोन-दोन मोजणीबूक कार्यरत असतात. दोन मोजणीबूक लिहीली जातात.

**दिपक खांबित :-**

साहेब मोजणीबूक दोनच असतात एक रफ असते आणि एक फेअर असते.

**प्रमोद सामंत :-**

मोजणी क्लिअर असतात.

**दिपक खांबित :-**

तस नसते म्हणजे एक डेली असते आणि फेअर वेगळी असते.

**प्रमोद सामंत :-**

दोन्ही असतात. दोन फेअर मोजणी बूक एकाच वेळी ११ सप्टेंबर २००६ ते ९ सप्टेंबर २००९ --चालू आहे. परत सांगतो, २२ ऑगस्टपासून २९-०९ पर्यंत.

**दिपक खांबित :-**

तुम्ही जे बोलतात जे मोजणी बुक बद्दल तस मोजणी बूक प्रत्येक कामाला ॲक्टप्रमाणे वेगळ लिहायला पाहिजे. तस जर आपल्याकडे ॲक्टप्रमाणे आपल्याकडे ५० ज्यू. इंजिनियर पाहिजेत पण माझ्याकडे आहेत का? एवढी काम करण्याकरता डिपार्टमेन्टला ५० ज्यू. इंजिनियर पाहिजेत. माझ्याकडे ५ इंजिनियर आहेत त्याच्याकडून मी एवढी काम रात्रदिवस करुन घेतो. ह्या सगळया गोष्टी आहेत. महानगरपालिका लेवलला काम करण खूप कठीण असते.

**प्रमोद सामंत :-**

काही काम रात्रदिवस करता तो विषय नाही. मा. महापौर साहेब, २३ डिसेंबर २००९ ला मोजणीबूक सुरु झाल. २९ मार्च २०१० ला मोजणीबूक लिहायच थांबल. शेवटची दोन पेज सूटली. ३० मार्च २०११ ला त्याच्यात नोंद केली जाते. एक वर्ष मागे जाऊन नोंदणी का होते? ह्यांना चालू बूक मिळाल नाही. खर म्हणजे दूसर नोंदणी बूक सुरु करताना उरलेली पेज कट केली पाहिजेत. मा. महापौर साहेब, ह्याच उत्तर देण्यात यावे. ऑडीटरने त्याचे उत्तर द्यावे. ते बिल का देण्यात येते. चुकीचे नोंद असताना ऑडीटर झोपले होते का? मा. महापौर साहेब, ह्याचे उत्तर देण्यात यावे.

**दिपक खांबित :-**

ह्या बाबतीत कूठलीच तक्रार नाही. साहेब, तुम्ही जे मुद्दे मांडले त्याच उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला, ह्याच्यामध्ये ज्या काही सुधारणा करता येतील त्या आम्ही नक्कीच करु.

**प्रमोद सामंत :-**

साहेब मला सांगा दोषीवर कोणती कारवाई करणार ते मला सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, जवळ-जवळ अर्धा तास पासून हे दोघे बोलतात. मा. महापौरानी ऐकले आहे. मा. आयुक्तांनी एकल आहे. त्याच्यात तुम्हाला काय तफावत वाटते. मग ज्यांनी मुद्दा मांडला ते मांडताना चूकीचा मांडतात का? प्रशासनाने चूक केली आहे. ते बघून तुम्ही काय करणार ते सभागृहाला सांगा.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, एम.बी.बुक एन्ट्री के लिए बोलते हुए मुझे ढाई साल हो गया। एम.बी.बुक में प्रोपर एन्ट्री होता है। ऑडिटर साहब को बोला है और यहाँपर बोला है। प्लीज इसपे आप ध्यान दिजिए।

**मा. महापौर :-**

प्रमोद सामंत यांनी जी लक्षवेधी मांडली आहे त्याच्यावर जी सुचना केली आहे त्याबद्दल मा. आयुक्तांशी आधी चौकशी करुन घेऊ त्याचा आम्हाला अहवाल द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेवक बोलले की ऑडिटरने उत्तर द्यावे. ऑडिटरला उत्तर द्यायला उभे करा. सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक बोलतात तरी तुम्ही त्यांना उत्तर द्यायला उभे करत नाहीत.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य प्रमोद सामंत ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याला मी लेखी उत्तर दिलेल आहे. त्यामुळे वेगळ काही सांगायची आवश्यकता नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

लक्षवेधी सभागृहाची आहे, तर तुम्ही काय उत्तर दिल ते सभागृहाला कळू देना. लक्षवेधी सभागृहाने आणली आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

तुम्ही जी तक्रार दिलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

वर्षभर मागे जाऊन केलेली नोंद ही बरोबर आहे की चूकीची आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

बरोबर आहे.

**प्रमोद सामंत :-**

वर्षभर मागे जाऊन केलेली नोंद बरोबर आहे.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

त्या एम.बी. मधल्या ज्या नोंदी आहेत त्या एकदम बरोबर आहेत. त्या बिलामध्ये कुठेही दोन वेळा दिलेली नाहीत.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही सभागृहाची पूर्ण दिशाभूल करता. साहेब, एक वर्षानंतर तुमच्या मोजणी बूकात नोंदी केल्या आहेत. कार्यक्रम २००८ ची नोंद २००९ मध्ये हे बरोबर आहे. पून्हा सांगा बरोबर आहे म्हणून.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

तुम्हाला उत्तर दिल ते बरोबर आहे.

**प्रमोद सामंत :-**

२००८ च्या कामाची नोंद २००९ ला.

**दादासाहेब पाटील (मुलेप) :-**

२००९ ला नाही झाली. एम.बी. मध्ये काही पेजेस रिकामे राहिले होते त्या एम.बी.मध्ये त्यांनी नोंदी घेतल्या आहेत.

**प्रमोद सामंत :-**

दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. एक प्रश्न असा आहे की, उरलेल्या कामाची दोन पेजेस शिल्लक राहतात.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त आपल्याला माहिती देतील. पूढचा विषय घ्या. (सभागृहात गोंधळ)

**मदन उदितनारायण सिंह :-**

विषय महासभेत आणल्यावर चर्चा झाली पाहिजे. मग महासभेत आणायची गरज काय.

**मा. महापौर :-**

चर्चा झालेली आहे. तुम्हाला ह्याच्यात काय अडचण असेल तर मला लेखी कळवा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, मला ह्या विषयावर बोलायच आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ह्या आधी सिव्हरेज प्लान्टवर लक्षवेधी आणली होती. त्या लक्षेवधीचे काय झाले. प्रत्येक वेळेला लक्षवेधी आणायची. सन्मा. इनामदारानी अंडर ग्राऊन्ड ड्रेनेजची लक्षवेधी आणली होती त्याच काय झाल.

**मा. महापौर :-**

चौकशी करायला सांगितले.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्यावेळी लक्षवेधीमध्ये आरोप केला जातो. त्या आरोपाच खंडण होतच नाही. आपण सांगता त्याच्यावर कारवाई केली जाते. तुम्ही कुठली कारवाई कराल.

**मा. महापौर :-**

मी संपूर्ण चौकशी करायला सांगितली आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सर्व सन्मा. नगरसेवकांना विनंती करतो की, आपल्या शहरातील एक मुलगी कु. हेमा नाझरेथ भंगा ह्याच्या संबंधी आपल्याला थोडीशी माहिती देतो. दि. १९/०६/२००६ रोजी महाराष्ट्र रेल्वे पोलिस सेवेत भरती झालेली आहे. सन २००८ महाराष्ट्र राज्य पोलिस ह्याच्यातर्फे अमरावती येथे पोलिस स्पर्धेत निवड झाली. सन २००९ साली चेन्नई राज्यात आणि २०१० साली उत्तर प्रदेश आग्रा या ठिकाणी आपल्या देशाची पताका फडकवण्यासाठी सुरुवात केली. सन २००९ मध्ये पोलिस ऑल इंडीया अकॅडमी तर्फे उत्तर प्रदेश लखनौ येथे झालेल्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल सन्मा. मुख्यमंत्री मायावती यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. जानेवारी २०११ साली सांगली येथे पोलिस क्रिडा स्पर्धेत ५ सुवर्णपदक व एक कास्य पदक पटकविल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्मा. पृथ्वीराज चव्हाण व गृहमंत्री आर.आर.पाटील ह्यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. दि.२६ ऑगस्ट २०११ ते दि. ०५ सप्टेंबर २०११ ह्या दरम्यान अमेरिका येथील न्युयॉर्क ह्या शहरात पार पडलेल्या स्पर्धेत १०० मीटर व २०० मीटर ४ X १०० रिले ह्या स्पर्धामध्ये तीन सुवर्ण पदक पटकविली हे खरोखर आपल्या शहराचे भाग्य आहे. उत्तनमध्ये राहणारी ती आपली मुलगी आहे. आपण सर्वांनी टाळ्या वाजवून तिचा सत्कार करावा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. सचिव साहेब, हा विषय विषयपटलावर आहे?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण मागच्या वेळेला घेतला नव्हता. आज सत्कार करायचे ठरवले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

७६ नंबर विषय आहे तो काय करायचा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तो विषय कॅन्सल करायचा आज फक्त सत्कार ठेवला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझं मत आहे की, विषय पत्रिका वाचल्यावर विषय कन्टीन्यु होऊन जाईल. असं माझं मत आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ते लांबून आले आहेत. त्यांना बाहेर जायचं आहे. त्यांचा सत्कार उरकून घेऊ.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या हस्ते कु. हेमा भंगा ह्यांचा सत्कार करण्यात येत आहे. एक लाखाचा धनादेश मा. महानगरपालिकेतर्फे देण्यात येत आहे. श्रीफळ, बुके आणि मोमेन्टो देऊन त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. सन्मा. मिलन पाटील ह्यांच्यातर्फे ५००० रुपये देण्यात येत आहेत.

**मा. महापौर :-**

कु. हेमा भंगा ह्या मुलीने मिरा भाईंदरचे नाव लौकीक केल्याबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे तिचा सत्कार करण्यात आलेला आहे. त्यांनी हा सत्कार स्विकारलेला आहे. अशाच तऱ्हेने मिरा भाईंदरचं नाव लौकीक कराल अशी अपेक्षा करतो. सगळ्या सन्मा. नगरसेवकांनी आपला सत्कार केलेला आहे सगळ्याच्या वतीने आपल्याला एक लाखाचा चेक देण्यात आलेला आहे.

**हेमा भंगा :-**

सर्वप्रथम मी तुमच्याकडे क्षमा मागु इच्छिते की, तुमच्या महासभेत व्यत्यय आणल्यामुळे तुमच्याकडे दिलगीरी मागू इच्छिते. मला जो तुम्ही मान सन्मान दिला त्याबद्दल खुप बर वाटत आहे. भाईंदर शहराचे आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा, मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती श्री. स्टीवन मेंन्डोंसा तसेच सन्मा. विरोधी पक्षनेता आणि सर्व पक्षाचे गटनेता, सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका तुम्ही मला जो मानसन्मान देऊन माझा सत्कार केलेला आहे त्याबद्दल मी तुमचे आभार मानते. भविष्यामध्ये जर या पध्दतीचे कार्य कोणी करत असतील तर त्यांना आपण असेच प्रोत्साहन द्यावे अशी मी अपेक्षा करते धन्यवाद.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. प्रमोद सामंतनी जो सर्वधर्मिय उत्सवाचे विषय आणला होता. आपण टेंडर काढतो पेमेंट करतो. छटपुजा सुद्धा त्याच्यात आहेत ना? छटपुजेचा त्यात समावेश आहे आणि आता जी छटपुजा झाली त्यात सास्कृतिक कार्यक्रम का करण्यात आला नाही. आपण त्याचं पेमेंट करतो तरी सांस्कृतिक कार्यक्रम का करण्यात आला नाही? ह्याचे उत्तर द्यावे. मग आम्हाला इकडे कशासाठी बोलवता?

**मा. महापौर :-**

त्याचा विषय होता त्याची लक्षवेधी होती.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

लक्षवेधी महासभेत आणली म्हणजे महासभेत चर्चा करणार? जर प्रत्येकाला चर्चा करायची परमिशन नाही तर मग आणायची गरज काय? तुमच्या केबिनमध्ये चर्चा केली असती.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी त्यांची होती.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

लक्षवेधी त्यांची होती पण सभागृहाच्या पटलावर आणली ना.

**मा. महापौर :-**

सार्वजनिक बांधकामसाठी आपण सर्व व्यवस्था करतो.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

सांस्कृतिक कार्यक्रम का नाही झाले?

**मा. महापौर :-**

का नाही झाले? झाले ना.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपण सांस्कृतिक कार्यक्रम करत नाही. आपण मंडपाची व्यवस्था करतो.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

सांस्कृतिक कार्यक्रमाचं आपण पेमेंट करतो. खांबित साहेब, ह्याचं उत्तर द्या. आपण गेल्या चार वर्षापासुन सांस्कृतिक कार्यक्रम करतो. आपल्या खुर्च्या तिथे जाऊन परत आल्या. त्याचं पेमेंट कोण करणार?

**प्रभात पाटील :-**

त्या ठेक्यामध्ये अटीशर्तीमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचा उल्लेख कुठे आहे?

**मदन उदीतनारायण सिंह :-**

आहे.

**प्रभात पाटील :-**

विर्सजनाची सोय आहे. छटपुजा आणि गणपती किंवा गौरी विर्सजनाची सोय आहे. लायटींग आहे. स्टेज आहे. सांस्कृतिक कार्यक्रम करायचं असं त्याच्यात कुठे म्हटलं आहे असेल तर दाखवा.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

त्याचा उल्लेख त्यात आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सांस्कृतिक कार्यक्रम करायला महापालिका दरवर्षी स्टेज बांधते, खुर्च्या देते, लाईट देते, जनरेटर देते. यावर्षी देखील दिले परंतु कार्यक्रम करायला परमिशन दिली नाही.

**प्रभात पाटील :-**

सांस्कृतिक कार्यक्रम ह्याचा अर्थ काय होतो?

**नरेंद्र मेहता :-**

सांस्कृतिक कार्यक्रम कुठली तरी संस्था करते. खर्च गेल्या तीन चार वर्षापासुन आपण करतो.

**प्रभात पाटील :-**

तिथे सगळं काही झालं पण नाचगाणी करायला परवानगी देत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

नाच गाण्याचा विषय नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

हा विषय नाही. मी उत्तर द्यायला सक्षम आहे. ह्याठिकाणी आपण लोकांना भडकवण्याचे काम सुरु केले आहे. तुमच्याकडे काही मुद्दे नाहीत. चौपाटीवर पाण्याची, लाईटची सोय केली आहे.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

सांस्कृतिक कार्यक्रम का झाले नाहीत?

**मा. महापौर :-**

पुढच्या वर्षी जेवण देऊ.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

दिलं तर चांगली गोष्ट आहे.

**मा. महापौर :-**

छटपुजा आपकी है हमारी नही क्या?

**मदन उदीतनारायण सिंह :-**

आप अगर खाना देंगे तो हम आपका स्वागत करते है। कार्यक्रम क्यो नही हुआ यह मै पुछ रहा हूँ। आपने पेपर मे दिया है कार्यक्रमांना काही बंदी नाही. मतलब प्रशासन आपका सुनता नही क्या? महापालिका मे आपकी चलती नही क्या?

(सभागृहात गोधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

वारंवार एकाच विषयावर स्थायी समितीमध्ये चर्चा करतात. कार्यक्रमांना बदी घातली. स्थायी समितीमध्ये आम्ही चर्चा केली तेव्हा सर्व धार्मिक कार्यक्रमांना चौपाट्या खुल्या राहतील अशा प्रकारची चर्चा झाली. त्याच्यामध्ये नवरात्री, गणपती, छटपुजा आली अन्य कुठल्याही कार्यक्रमांना बंदी नाही. परंतु, तुमच्यासारखे धार्मिकतेच्या नावाखाली डान्स करणा-यांना आम्ही बंदी घालतो असे जाहीरपणे सांगतो.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

तुमच्यासारखे म्हणजे काय?

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७२, दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, आजच्या महासभेसाठी महापालिका अधिनियम १९४९ च्या अनुसुचित ''ड'' मधील प्रकरण २ ''क'' अन्वये तीन प्रस्ताव आलेले आहेत ते ह्या महासभेत घेण्यात यावे अशी विनंती आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण लक्षवेधी आणतो, मागच्या वेळेला सन्मा. इनामदार साहेबांनी भुयारी गटाराची लक्षवेधी आणली होती त्याच्यावर काय कारवाई झाली त्याची कधी चर्चा झाली नाही. लक्षवेधी आणली आम्ही ऐकली परंतु, त्याच्यावर काय कारवाई झाली त्याचा खुलासा करायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांच वाक्य प्रोसिडींगमधुन काढायचं आहे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, इथे लक्षवेधी होतात त्याच्यावर काय कारवाई झाली ते माहितच पडत नाही.

**अनिल सावंत :-**

पान नं.२२ बघा. मा. महापौरांची दोन वाक्ये आहे. श्री. भगवती शर्मा आपने जो चुक किया है। इसकेलिए महापालिका का हजार कोटी का नुकसान हुआ है। त्याच्यावर भगवतीजी बोले मै उसके लिए प्रायश्चित करने के लिए तैयार हूँ। हे वाक्य मा. महापौर सन्मा. नरेंद्र मेहताना उद्देशुन बोलले आहेत. तर तिथे नरेंद्र मेहता करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, पान नं.२४ वर अग्निशमन दलाच्या भरती प्रक्रियेबद्दल ठराव होते आणि त्याची चौकशी करुन त्याचा अहवाल महासभेपुढे ठेवायचं मान्य केलं होत तर त्याच्यावर काय झालं त्याची सभागृहाला माहिती द्या.

**प्रभात पाटील :-**

दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत मंजूर झालेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मध्यप्रश्न के लिए लेटर दिया है चर्चा के लिए लिया जाए।

**मा. महापौर :-**

लास्ट मे लिया जाएगा।

**हंसुकुमार पांडे :-**

मै पाच मिनिट मे बोलुंगा।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

साहेबांनी एकदा रुलिंग दिल्यानंतर ते बोलले नंतर घेणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, ह्याच्यामध्ये परिवहन समितीवर रुलिंग दिली होती म्हणजे प्रत्येक लक्षवेधी सभागृहात वाचनाकरीता आणि चर्चेकरीता आहे. रुलिंग दिल्यानंतर त्याच अनुपालन अहवालामध्ये आलं पाहिजे अनुपालन अहवालामध्ये का येत नाही?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. ओमप्रकाशजी आपण जेव्हा लक्षवेधी मांडतो तेव्हा संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधायचे असते. ज्या चुका प्रशासनाकडुन झालेल्या आहेत त्या चुका प्रशासनाकडुन सुधरावयाच्या असतात जर त्या चुका प्रशासनाकडुन सुधरावयाच्या असतात जर त्या चुका सुधारल्या नाहीत तर त्याच उत्तर दिलं जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज परिवहन सेवेचे चालल आहे. उत्तनला ज्या बस जातात त्याची काय पोझिशन आहे. मोठी दुर्घटना होणार आहे. सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी लक्षवेधी मांडली होती.

**अनिल सावंत :-**

२९ जुलैला परिवहन सेवेबद्दल लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी मा. आयुक्तांनी नूकताच चार्ज घेतला होता तेव्हा मा. आयुक्त साहेब, बोलले की माहिती घेतो आणि त्याचा सभागृहाला अहवाल देतो. अहवाल दिला नाही तर हरकत नाही परंतु आज संपूर्ण परिवहन सेवेचे बारा वाजले आहेत. मिरारोडला चार बसेस कायम नादुरुस्त उभ्या असतात. सेक्टर ११ मध्ये एक बस कायम नादुरुस्त उभी असते. संध्याकाळच्या वेळेला पिक अवर्स मिरारोड स्टेशनला जाऊन बघा. रिक्शाचे भरमसाठ भाडे वाढलेले आहे. रामदेव पार्क, गीता नगरमध्ये जायला लोकांचे हाल होतात. परिवहनच्या ठेकेदाराला जर इंटरेस्ट नसेल तर त्याला काढून टाका आणि नविन काय तरी व्यवस्था करा. जे.एन.एन.यू.आर.एमच्या अंडर आपल्याला ७० बस सँक्शन झालेल्या आहेत. तो २५० बसेस चालू करणार होता. त्यामध्ये ५० मिनीबस होत्या. ८० अे.सी. बस होत्या त्याच काय झाल त्याला इंटरेस्ट नसेल तर त्याला पाठवून द्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी सुध्दा महासभेला परिवहनचा विषय काढलेला त्यावेळेस तुम्ही मला सांगितले केबिनमध्ये या आपण त्याच्यावर चर्चा करु. त्याच्यावर नंतर काहीच झाल नाही. माझ्या प्रभागामध्ये मुर्ध्यापासून ते

उत्तनपर्यंत दोन बस रोज बंद पडलेल्या उभ्या असतात. एखादी बस बंद पडली तर ५० प्रवासी जाणार कसे. हे नेहमीच नाटक चालू आहे. जर परिवहनच्या ठेकेदाराला इंटरेस्ट नसेल तर त्याने सोडून द्याव. आणि रिक्शावाला तीन सिट शिवाय माणसे घेऊन जात नाही. मिरा-भाईंदरच्या नागरीकांचे हाल चालले आहेत आणि आपण काही करत नाही.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, नादुरुस्त ज्या बस आहेत त्या दोन-दोन बस ममीच्या बंगल्यासमोर उभ्या असतात. फिक्स स्टॉप ठरलेला आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, बसेसचा प्रश्न राई, मुर्धा, मोरवा मधील प्रत्येक हायस्कूलची पत्र आलेली आहेत. विद्यार्थ्यांची एवढी ताणाताण होते. सकाळी शाळेत वेळेवर येऊ शकत नाही. शाळा सूटल्यावर वेळेवर घरी जाऊ शकत नाही. अशी ही बसेसची अवस्था झालेली आहे. त्यामुळे प्रवासी सुध्दा वैतागले आहेत की आमच्या महाराष्ट्र शासनाच्या बस परवडतील पण महापालिकेच्या बस नको. म्हणून ह्या बसेसच्या व्यवस्थेबद्दल परिवहन समितीचे सर्व सदस्य, मा. महापौर, मा. आयुक्त आपण तातडीने लक्ष घालाव. अन्यथा एखादी घटना घडली तर तुम्हाला जबाबदार धरायला लागेल.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल १०० नंबरच गार्डन आहे. १०० नंबरच्या गार्डनची जी जागा आहे. आपण सर्वस्वी ते बांधकाम करुन बंदिस्त केलेल आहे. त्या ठिकाणी परिवहनवाले सर्व गाडया ठेवतो त्याला एक प्रकारच डेपो बनवल आहे. त्याला जर भाड लावल तर तो आपोआप सुधारेल. ब्रिजपासून मिरारोडमध्ये जाणारा जो मेन रोड आहे. तिकडे किती बसेस रिकाम्या पडल्या आहेत त्याच्याकडे ड्रायव्हर आहेत किंवा नाहीत तर मा. आयुक्त साहेब त्याच्याबद्दल भाड लावल. गाडया ठेवण त्याच काम आहे आपल नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, परिवहनचा अधिकारी कोण आहे. तो काय करतो ते आम्हाला काहीच कळत नाही.

**एस.ए.खान :-**

एकाच अधिकाऱ्याला एकच काम द्या. एका माणसाला दोन-दोन काम देता त्यामुळे काहीच काम होत नाही.

**मा. आयुक्त :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकामध्ये जे परिवहन खाते आहे. केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर ह्या कंपनीला मागच्या वर्षी परिवहन सेवेची जबाबदारी दिली होती. टेंडर करताना त्याच्यामध्ये ज्या अटीशर्ती होत्या. त्याप्रमाणे आजच्या दिवशी महालक्ष्मी कंपनी होती. त्यांनी त्या जुन्या बसेस त्यांना हॅन्डओव्हर केल्या होत्या. आणि ज्या नविन बसेस जे.एन.एन.यू.आर.एम मध्ये आल्या होत्या त्या सुध्दा त्याच्याकडे आहेत. आजच्या दिवशी जवळपास १०५ बसेस त्यांच्या ताब्यात आहेत त्यापैकी ५०-५५ बस रस्त्यावर असतात. म्हणजे ५० बस कायमस्वरुपी रस्त्यावर नाही ही बाब खरी आहे. त्याच्याशी माझ्या दोन मिटींग झाल्या आहेत त्यांच्या युनियनशी देखील माझी मिटींग झाली आहे. युनियनच्या लोकांना पगारामध्ये वाढ पाहिजे, त्यांच्या सुट्टीचा विषय आहे, त्यांच्या बोनसचा विषय आहे. ह्या सगळया विषयावर युनियनची आणि केस्ट्रल इन्फास्ट्रक्चर कंपनीचे जे लोक आहेत त्यांची कम्बाईन मिटींग घेऊन ते बरेच विषय सॉर्टआऊट केले होते. मुळ अडचण अशी आहे की, केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चरकडे ड्रायव्हरची कमी आहे आणि ड्रायव्हरची कमतरता असल्यामुळे १०५ बस ज्या रस्त्यावर असायला पाहिजेत त्यापैकी ५० ते ५५ बस रस्त्यावर असतात. त्यासाठी त्यांना बऱ्याचदा शोकॉज नोटिस दिलेली आहे. आणि त्यांना दररोज फाईन लावण्याचा कार्यक्रम सुरु आहे. त्यांना रोज प्रति चूक १०००/- रुपये टेंडरप्रमाणे कंडीशन होतील तशी फाईन लावण्याची कारवाई सुरु आहे. त्यांना अल्टीमेट केल आहे की तुम्ही सुधारणा केली नाही तर तुमच टेंडर कॅन्सल करण्यात येईल. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत अजून २० नविन बस येत आहेत. त्याच्यासाठी केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. आता त्याचे टेंडर काढून ते खरेदी करुन घेऊन आणि त्या २० बससुध्दा ॲड होतील. पण अडचण ही आहे की अपुरा स्टाफ, ड्रायव्हरची कमतरता आणि विशेष म्हणजे उत्तन, पाली, चौक हे जे रुट्स आहेत ह्या ठिकाणी जास्त अडचण असते. स्वतः संध्याकाळी रेल्वे स्टेशनला गेलो होतो तिकडे प्रवाशाशी बोललो. तेव्हा बऱ्याच अडचणी माझ्या लक्षात येईल. त्यांची मिटींग घेतली त्यांना एक अल्टीमेट पण दिल आहे. मला वाटते सुधारणा होईल. सुधारणा नाही झाली तर टेंडर कॅन्सल करण्याची कठोर कारवाई त्यांच्यावर करु.

**अनिल सावंत :-**

त्याच्या बरोबर जेव्हा ॲग्रीमेन्ट झाल त्यावेळी त्याने ह्या शहरात २५० बसेस चालू करायच्या आहेत आणि त्यासाठी तो ॲग्री झाला होता. ५० बस पहिल्या लॉटमध्ये जे.एन.एन.यु.आर.एमच्या अंडर मिळाल्या. त्यानंतर तुम्ही म्हणता २० बस मिळतात मग तो जे.एन.एन.यु.आर.एम. मार्फत तो २५० बस चालू करणार की स्वतःच्या सुध्दा बस चालू करणार? त्याच काय झाल.

**मा. आयुक्त :-**

साहेब, १०५ बसेस असताना ५० बसेस रस्त्यावर आहेत. २५० बस झाल्या तरी त्याचा उपयोग होणार नाही. आम्हाला हळूहळू त्याची कॅपेसिटी वाढवायची आहे. त्यांची जबाबदारी आहे. दूसऱ्या बस चालू करण्याची परंतु टेंडर कंडिशनमध्ये अशी कोणतीही अट नाही. ह्या वेळेपर्यंत २५० बसेस चालु केल्या पाहिजे. म्हणजे त्यांना टाईम लिमिट दिलेल नाही की ह्या टाईममध्ये २५०बस चालू करा.

**अनिल सावंत :-**

त्यांना ठेका देऊन १४ महिने झाले आहेत.

**मा. आयुक्त :-**

१३ महिने झाले आहेत तुमच म्हणण बरोबर आहे.

**मा. महापौर :-**

मी फोनवरुन बोललो होतो की, ४० ड्रायव्हर आपले दोन दिवसात येणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

शोकॉज देऊन अल्टीमेटम दररोज प्रति चुक हजार रुपये फाईनची आमची कारवाई सुरु आहे.

**अनिल सावंत :-**

ह्या ज्या २० बसेस जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत मिळणार आहेत त्याच्यात ५०% आपल्याला स्टेट आणि सेंट्रल गव्हरमेन्टकडून सबसिडी मिळणार आहे. त्याच ते कॉम्पेनसेट कसे करणार? कारण आपण त्या बस त्यांना देणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर स्टँडिंगमध्ये विषय आणून स्टँडिंगमध्ये निर्णय होईल.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या त्या जुन्या ५० बस होत्या आपला जो ५०% वाटा होता तो ठेकेदारानी भरला होता त्याचप्रकारे करायला लागेल ना?

**मा. आयुक्त :-**

स्टँडिंगमध्ये तसा प्रस्ताव आणू.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, जे.एन.एन.यु.आर.एम. नी आपल्याला जो फंड ग्रॅन्ड केला त्यावेळी ह्या सगळया बस रस्त्यावर धावल्या पाहिजेत त्यासाठी ह्या अटीशर्ती दिलेल्या आहेत. जे.एन.एन.यु.आर.एम. मार्फत आपण जर गॅन्ड घेत असाल तर तो स्टाफ परमनन्ट पाहिजे. ठेकेदाराला आज कर्मचारी मिळत नाही. त्याला मुळ कारण एकच आहे. माझ्या शाळेतल्या ड्रायव्हरला तो दोन-तीन तासासाठी रात्री घेऊन जातो. म्हणजे तो कोणालाही परमनन्ट कामाला ठेवायचे बघत नाही. म्हणून त्याला कोणी कामावर भेटत नाही. त्यांनी जर एखादी अपॉइंटमेन्ट चालू केली. त्याला कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर पाहिजे म्हणून कोणी कर्मचारी जात नाही. आणि पालिकेचे काम नसल्यामुळे प्रायव्हेट ठेकेदाराकडे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर कोणी जात नाही. त्याच्यात अटीशर्ती आहेत की त्यांनी परमन्ट स्टाफ अपॉईंट केला पाहिजे. आपण जाहीरात द्या लाईन लागेल, ह्या शहरात पण एवढे ड्रायव्हर भेटतील. त्याला परमनन्ट ठेवायचे नाही तो म्हणतो. कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर या. जे.एन.एन.यु.आर.एम.ची आणि सेंट्रल गव्हरमेन्टची कंडीशन आहे की, परमनन्ट स्टाफ पाहिजे. ज्यावेळी महापालिका चालवत होती. त्यावेळेला त्यांची अपेक्षा होती की, आम्ही आज ना उद्या कामाला लागु. ठेकेदारांनी परमनंन्ट केलं तर उद्या सगळे कामावर लागतील आणि १०० च्या १०० बसेस चालु होतील.

**मा. आयुक्त :-**

ठेकेदाराला सांगितलं आहे की, बसेसवर एल.ई.डी. स्क्रिन, जी.पी.आर.एस. डिव्हायसेस म्हणजे आता बस नेमकी कुठे आहे ते माहित पडणार ते २० नोव्हेबर किंवा २५ नोव्हेंबर पर्यंत ते स्क्रीन बसेसवर लावलेच पाहिजेत तसेच अतिरीक्त ड्रायव्हर, कंडक्टर आणि इतर स्टाफ त्यांनी अपॉईट केला पाहिजे. आपल्याला फक्त चेक करायला लागेल की अशी काही तरतुद आहे किंवा नाही. माझ्या माहितीप्रमाणे ते पीपीपी तत्वावर केस्ट्रल इन्फ्रास्टक्चरला दिलेली आहे. ती सगळी जबाबदारी त्यांचीच आहे. त्याने परमनन्ट नेमायचे की कॉन्ट्रॅक्टवर नेमायचे ही त्याची जबाबदारी आहे तर त्याच्यात आम्ही हस्तक्षेप करायचा नाही असे मला वाटते.

**नरेंद्र मेहता :-**

आपण पीपीपी तत्वावर करतो त्याच्यात शासनाचे काय बायलॉज आहेत. त्याला आपण फॉलो केलं नाही म्हणून आपल्याला हे भोगायला लागते. तुम्ही जर शासनाची मान्यता घेतली असती बायलॉज फॉलो करुन टेंडर काढले असते तर ह्या सगळ्या गोष्टी घडल्या नसत्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही जी.पी.आर.एस. बद्दल बोलले, जी.पी.आर.एस. ठराव वाचला त्या ठरावामध्ये दोन महिन्यामध्ये हा टेंडर रद्द करण्यात येईल ह्या गोष्टीला सहा महिने झाले. म्हणजे जी.पी.आर.एस.चा ठेका देऊन ते दोन महिन्यात झालं पाहिजे. त्याला चार महिने झाले आहेत त्या ठरावामध्ये क्लीअर मेंन्शन केलं आहे की दोन महिन्यामध्ये जी.पी.आर.एस. लावलं नाही तर हा ठेका रद्द करण्यात येईल.

**लक्ष्मण जंगम :-**

ते जे ॲग्रीमेंट झाले आहे त्याच्यामध्ये कालमर्यादा नक्की नाही की एवढ्या तारखेपर्यंत त्यांनी ते पूर्ण करायला पाहिजे. आतापर्यंत १३ महिने होऊन गेले. अजून आपण ते नक्की केले नाही. मला वाटते ते पहिले नक्की करायला पाहिजे की ह्या पिरेयडमध्ये ते पूर्ण कराल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावामध्ये नमुद आहे दोन महिन्याची मुदत नमुद आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आजसुद्धा आपण ॲग्रीमेंटच्या अनुषंगाने चाललो आहोत. त्याच्यामध्ये तो क्लॉज टाकलेला नाही की एवढ्या महिन्यामध्ये किंवा एवढ्या दिवसामध्ये ते पूर्ण करु असं आपल्या ॲग्रीमेंन्टमध्ये उल्लेख नाही. असं तुम्ही म्हणता मग कायमपर्यंत तसंच ॲग्रीमेंन्ट राहणार आहे. पून्हा जेव्हा चर्चा करु तेव्हा हाच विषय पून्हा येणार आहे. ह्या विषयासाठी नेमक आपण काय करणार आहोत? काय केलं पाहिजे त्याचा खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आपल्याला माहित आहे अमेन्टमेंट म्हणजे दोन पार्टीमध्ये ॲग्रीमेंन्ट त्यासाठी दोन्ही पार्ट्या ॲग्री असले पाहिजेत. नाहीतर ॲग्रीमेंन्ट होत नाही. एक पार्टी ॲग्री झाली आणि दुसरी पार्टी म्हणते असं करा तर ते ॲग्रीमेंट होत नाही. आपलं म्हणणं आहे. जीपीएस डिव्हायसेस किंवा एलएडी स्क्रीन त्याची जबाबदारी ५० टक्के फंड एम.बी.एम.सी. आणि ५० टक्के ठेकेदार अशी तरतुद आहे. तसे आम्ही टेंडर काढलेले आहे. टेंडर ऑर्डर दिलेले आहे. त्याचा पुरवठा २० किंवा २५ नोव्हेंबरला होणार आहे. डिलीव्हरी आलेली आहे अशी मला माहीती मिळाली.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या माहितीसाठी त्या ५० बसेस मध्ये आपला हिस्सा असायला पाहिजे. जी.पी.एस. सिस्टम आणि एल.ई.डी. आतमध्ये लावायचे आहेत त्याच्यामध्ये ५० बसेस जे आपण जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत जे दिलेले होते फक्त २० टक्के बाकीच्या २०० बसेसमध्ये १०० टक्के त्याचा वाटा असायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यात ज्या आर्थिक बाबी आहेत त्याची तपासणी करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

ते पण तसं करतात त्याची मिटींग झालेली आहे तसे पॉईंटस् ते इतर वेळेस लावणार आहेत.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, यह जो ॲग्रीमेंट के हिसाबसे ॲड का ८५ टक्का वर्सेस १५ टक्का का जो क्लासिफिकेशन किया गया था की, मिरा भाईंदर महानगरपालिका को १५ टक्का ॲड का राईट है। मेरा सावंत साहब और ऑडीटर से बात हुआ। ऑडीटर साहब ने बोला की, हमने ऑब्जेक्शन लिया है। अभी एक साल होने को आया एक भी पैसा वसुल नही किया। अगर इन्होंने बोला हर डिपार्टमेंट को लिख के भेजा की उन्होने क्या ॲडव्हटाईज किया अगर नही मिला तो १५ टक्का का जो राईट है वो जनजागरण के लिए युज कर सकते है।

**मा. आयुक्त :-**

आपण म्हणणं बरोबर आहे. ऐसाही विषय है की, १५ टक्का बसेसपर बसस्टॉप पे जो स्पेस है वहाँ मिरा भाईंदर म्युनिसीपल कॉर्पोरेशन को ॲडव्हटाईज के लिए मिलेगा उस हिसाब से नया टेंडर निकाल रहे है।

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, अनुपालन अहवाल जो देतो मा. महापौर वेळोवेळी प्रशासनाला आदेश देतात त्याचा अनुपालन अहवाल आपण सादर करत नाही का? तो फक्त ठरावाबद्दल की, मा. महापौर जे आदेश देतात त्याचे काय केलं त्याचा अहवाल द्यायला पाहिजे. कारण गेल्या मा. महासभेमध्ये रेंटल हाऊसिंग स्कीमबद्दल मा. महापौरांनी काही आदेश दिले होते. त्याच्याबद्दल प्रशासनाने काय केले त्याची माहिती द्यावी.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, जो बस स्टँड नादुरुस्त झाला आहे त्याचे रिपेअरींग कोण करणार आहे? त्याचे कॉन्ट्रॅक्ट आहे की, पालिका करणार याचे जरा उत्तर द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, त्याचं उत्तर द्या तुम्ही दिलेले आदेश होते.

**कल्पना म्हात्रे :-**

सहा महिने झाले लेटर दिलं आहे सावंत साहेबांना माहित आहे. तुम्हाला सुद्धा लेटर दिलं आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मागच्या वेळेला सन्मा. अनिल सांवत साहेबांचा जो विषय होता त्याचं काय केलं ते फक्त प्रशासनानी सांगावं.

**मा. आयुक्त :-**

अजून त्याच्यावर चर्चा चालु आहे. फायनल निर्णय दिला नाही.

**प्रशांत पालांडे :-**

रेंन्टल हाऊसिंग स्किम बद्दल.

**मा. आयुक्त :-**

रेंटल हाऊसिंगची जी स्किम आहे त्याबद्दल एम.एम.आर.डी.ए. कडुन मागच्या वेळेला सांगितल होत कमिटी अपॉइंट केली आहे. कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर त्याच्यावर आम्ही चौकशी करु.

**अनिल सावंत :-**

त्याच्यात अजून एक भयानक प्रकार घडला. महाजन वाडीला रेन्टल हाउसिंगला फोर एफ.एस.आय. दिला. एका वर्षापूर्वी बिल्डींग तयार झाली होती. लोक रहायला आले त्यावेळेला वन एफएसआयच होता रेंटल हाऊसिंग नव्हता. सहा हजार त्याचा पर स्क्वेअर फुट रेट होता त्यांनी फस्ट टाईम एवढा रेट मार्क केला होता. एवढे कॉस्टली प्लॉट लोकांनी घेतले आणि नंतर तो प्रोजेक्ट रिव्हाईज करुन त्याला रेन्टल हाऊसिंगवर करण्यात आला म्हणजे काय होणार आहे जे फ्लॅट बनले त्याच्यासमोर आता १६० स्क्वेअर फीटच फ्लॅट येणार आहेत ते प्लॅन रिव्हाईज केले ते चेक करुन घ्या.

**प्रकरण क्र. ७२ :-**

दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७६ :-**

दि. २०/०७/२०११ व दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.७३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्तेच्या पट्टी योग्य मुल्याच्या (Rateable Value) आधारे बसविता येणा-या मालमत्ता कराच्या पध्दती ऐवजी मालमत्तेच्या भांडवली मुल्यावर (Capital Value) आधारित मालमत्ता कर प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

ह्या विषयावर चर्चा होण्याअगोदर मा. आयुक्तांनी रितसर खुलासा केला तर बर होईल.

**प्रभात पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत मा. महासभा ठराव क्रमांक ६८, दि.३१/०३/२०१० अन्वये सर्वसाधारणपणे निवासी वापर असलेल्या मिळकतींना ४२% पर्यंत व बिगर निवासी वापर असलेल्या मिळकतींना ५६% पर्यंत दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कराचे नांव | कराचे दर | |
|---|---|---|---|
| | | निवासी | बिगर निवासी |
| १ | घरपट्टी | ३०% | ३०% |
| २ | वृक्षकर | १% | १% |
| ३ | मनपा शिक्षण कर | २% | २% |
| ४ | मनपा अग्निशमन कर | १% | १% |
| ५ | मलप्रवाह सुविधा लाभकर/विशेष स्वच्छता कर | ८% | ८% |
| **शासन कर** | | | |
| ६ | शिक्षण कर | १% ते ६% | २% ते १२% |
| ७ | रोजगार हमी कर | --- | १% ते ३% |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता अनेक कर्जे घेतली आहेत हे खर असले तरी पाणी आणि आरोग्य ह्या दोन सुविधा नागरिकांना संतोष देण्या इतपत आपण देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरी देखील सन २०१०-११ मध्ये आपण मलप्रवाह सुविधा लाभ कर आणि विशेष स्वच्छता कराच्या रुपात प्रत्येकी ८% वाढ केली आहे. भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणालीचा महानगरपालिकेस पूर्णपणे अभ्यास झाल्याचे गोषवा-यातून सिध्द होत नाही. तसेच ही प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेने अवलंबल्याचे दिसत नाही.

नागरिकांना सोयी सुविधा पुरवण्याच्या बाबतीत महानगरपालिका कमी पडत असताना भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणे हे वस्तूस्थितीला धरुन होणार नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**याकुब कुरेशी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र.७३ करिता आलेला ठराव मंजुर करण्यात येऊन या ठरावानुसार प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्तेच्या पट्टी योग्य मुल्याच्या (Rateable Value) आधारे बसविता येणा-या मालमत्ता कराच्या पध्दती ऐवजी मालमत्तेच्या भांडवली मुल्यावर (Capital Value) आधारित मालमत्ता कर प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत मा. महासभा ठराव क्रमांक ६८, दि.३१/०३/२०१० अन्वये सर्वसाधारणपणे निवासी वापर असलेल्या मिळकतींना ४२% पर्यंत व बिगर निवासी वापर असलेल्या मिळकतींना ५६% पर्यंत दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कराचे नांव | कराचे दर | |
|---|---|---|---|
| | | निवासी | बिगर निवासी |
| १ | घरपट्टी | ३०% | ३०% |
| २ | वृक्षकर | १% | १% |
| ३ | मनपा शिक्षण कर | २% | २% |
| ४ | मनपा अग्निशमन कर | १% | १% |
| ५ | मलप्रवाह सुविधा लाभकर/विशेष स्वच्छता कर | ८% | ८% |
| **शासन कर** | | | |
| ६ | शिक्षण कर | १% ते ६% | २% ते १२% |
| ७ | रोजगार हमी कर | --- | १% ते ३% |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता अनेक कर्जे घेतली आहेत हे खर असले तरी पाणी आणि आरोग्य ह्या दोन सुविधा नागरिकांना संतोष देण्या इतपत आपण देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरी देखील सन २०१०-११ मध्ये आपण मलप्रवाह सुविधा लाभ कर आणि विशेष स्वच्छता कराच्या रुपात प्रत्येकी ८% वाढ केली आहे. भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणालीचा महानगरपालिकेस पूर्णपणे अभ्यास झाल्याचे गोषवा-यातून सिध्द होत नाही. तसेच ही प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेने अवलंबल्याचे दिसत नाही.

नागरिकांना सोयी सुविधा पुरवण्याच्या बाबतीत महानगरपालिका कमी पडत असताना भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणे हे वस्तूस्थितीला धरुन होणार नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.७४, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप-आयुक्तांची पदे मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

शासन निर्णय दि.३१ ऑक्टोबर २००२, अन्वये उपायुक्तांची तिन पदे मंजूर आहेत परंतु शासन परिपत्रक दि.०४ मे २००६ अन्वये "ड" वर्ग महानगरपालिकेस निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार दोनच उपायुक्त पदे निश्चित केलेली आहेत. सदर दोन्ही पदे भरलेली असून एक पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने व एक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त कार्यरत आहेत. त्यामुळे तिन मंजूर पदांपैकी एक उपायुक्तांचे पद दि.०४/०५/२००६ च्या शासन

परिपत्रकाच्या अनुषंगाने भरलेले नाही. यामुळे सदरचे मंजूर पद रद्द झालेले आहे अशी धारणा असून ती पुर्नजिवीत करणेस तसेच उपायुक्ताचे नव्याने एक पद मंजूर करणे आवश्यक नाही तसेच महानगरपालिकेच्या सन-२०११ मधील आस्थापनेवरील खर्च ३५ टक्के आहे. हयापेक्षा अधिक खर्च आस्थापनेवर करणे उचित वाटत नाही, त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र.७४ करिता आलेला ठराव मंजुर करण्यात येऊन या ठरावानुसार प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप-आयुक्तांची पदे मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.

**ठराव क्र. ७८ :-**

शासन निर्णय दि.३१ ऑक्टोबर २००२, अन्वये उपायुक्तांची तिन पदे मंजूर आहेत परंतु शासन परिपत्रक दि.०४ मे २००६ अन्वये "ड" वर्ग महानगरपालिकेस निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार दोनच उपायुक्त पदे निश्चित केलेली आहेत. सदर दोन्ही पदे भरलेली असून एक पद शासनाकडून प्रतिनियुक्तीने व एक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त कार्यरत आहेत. त्यामुळे तिन मंजूर पदांपैकी एक उपायुक्तांचे पद दि.०४/०५/२००६ च्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने भरलेले नाही. यामुळे सदरचे मंजूर पद रद्द झालेले आहे अशी धारणा असून ती पुर्नजिवीत करणेस तसेच उपायुक्ताचे नव्याने एक पद मंजूर करणे आवश्यक नाही तसेच महानगरपालिकेच्या सन-२०११ मधील आस्थापनेवरील खर्च ३५ टक्के आहे. हयापेक्षा अधिक खर्च आस्थापनेवर करणे उचित वाटत नाही, त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ग्रंथपाल पद मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.

**अनिल सावंत :-**

ठराव झालेला आहे प्रकरण मागे घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, विषय आणतात काय मागे घेतात काय? फेटाळतात काय?

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने दिलेला प्रस्ताव आहे. फेटाळण्याचा आपल्याला अधिकार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापालिकेत ह्यासाठी आलो आहोत की, महत्वाचे निर्णय घ्यायचे विषय घेतात आणि सत्ताधारी फेटाळतात हा विषय चाललेला मागे घ्या.

**अनिल सावंत :-**

मेहता साहेब तुम्हाला टॅक्स वाढवायचे आहेत का?

**नरेंद्र मेहता :-**

आणले कशाला आणायची गरज काय?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, जागतिक पोलीस स्पर्धेत तीन सुवर्ण पदक विजेत्या खेळाडू कु. हेमा नाझरेथ भंगा ह्यांचा यथोचित सन्मान करुन रोख पोरितोषीक देणेकरीता विचार विनिमय करुन निर्णय घेणे. हा विषय झालेला आहे.

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि. ०१/०६/१९९५ पूर्वीच्या धोकादायक इमारतींना वाढीव चटईक्षेत्र देणेकरीता मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनिमय १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**आसिफ शेख :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास नियंत्रण नियमावली विनीयम ३२(७) प्रमाणे दि.०१/०६/१९८५ पूर्वीच्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता जुन्या विद्यमान इमारतींचे चटईक्षेत्र + वाढीव १.० चटई क्षेत्र निर्देशांक व जास्तीत जास्त २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद आहे.

तथापी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ग्रामपंचायत कालावधी पूर्वी व तद्नंतर बनविण्यात आलेल्या इमारतींचे चटईक्षेत्र जास्तीचे आहे. म्हणून विद्यमान मंजूर तरतूद अपूरी आहे. सबब मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये नियमावलीत नवीन प्रस्तावित फेरबदलानुसार दि.०१/०६/१९८५ ऐवजी दि.०१/०६/१९९५ पूर्वीच्या इमारतींकरीता इमारतीमध्ये वापरलेले चटईक्षेत्र + १.० चटई क्षेत्र व कमाल मर्यादा ३.० चटई क्षेत्र याप्रमाणे तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

प्रस्तावित फेरबदलाबाबत आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन महानगरपालिकेने प्रस्ताव मा.शासनास दि. २१/१२/२०१० रोजी अंतिम मंजुरी करिता सादर केलेला आहे. व दि.१६/०९/२०११ रोजी सादर फेरबदल प्रस्तावास मंजूरी मिळणेकरीता शासनास विनंतीपत्र देण्यात आलेले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी मिरा भाईंदर महानगरपालिकेस लागू करणेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१०-११, दि.०६/१०/२०१० अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. सदरच्या प्रस्तावात विद्यमान बांधकाम क्षेत्र + १.० याप्रमाणे चटईक्षेत्राची तरतूद असणे आवश्यक असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रात ६० पेक्षा जास्त अती धोकादायक घोषित केलेल्या आहेत. इमारतीस धोकादायक असल्याची नोटीस देवून इमारती खाली करण्यासाठी महानगरपालिकेकडून इमारत खाली करुन इमारत तोडण्याचे आदेश रहिवाश्यांस दिल्यानंतर धोकादायक इमारतीतील रहिवाशी इमारत खाली करत नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने धोकादायक घोषित केलेल्या इमारती रिकामी करुन घेणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. मात्र अचानकपणे इमारत पडून दुर्घटना होते. मृत्यु व मानवास दुखापत होते. अशी घटना घडल्यानंतर घटनेवर मात करण्यासाठी / घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेकडे पर्याय राहत नाही. सबब महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक घोषित इमारतीचा पूर्नविकास करण्यासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करणे आवश्यक आहे.

१) दि.०१/०६/१९९५ पूर्वी बांधण्यात आलेल्या विद्यमान इमारतीस महानगरपालिकेने धोकादायक घोषित केल्यानंतर धोकादायक इमारतीचा पूर्नविकास करावयाचा असल्यास पूर्नविकासासाठी विद्यमान चटईक्षेत्र + १ याप्रमाणे चटईक्षेत्र असणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस व फेरबदलाचे सूचना हरकती घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ह्या ठरावामध्ये सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्या गावात क्षेत्रात १/२ चटईक्षेत्र अनुयोज्ञ आहे त्या गावात क्षेत्रात १ चटईक्षेत्र करावे. ज्या गावात नियोजित प्राधिकरण (Planning Authority) महानगरपालिका आहे, जेणे कारणे गावात व इतर रहिवासियांना सुविधाचा फायदा होईल असे मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी शासनाने अनुज्ञेय चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ याप्रमाणे मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हद्दीवाढ होण्यासाठी चारही बाजूने क्षेत्र उपलब्ध नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, डोंगरी, चौक, तारोडी, पाली ही महसूल गावे एम.एम.आर.डी.ए. या विशेष नियोजन प्राधिकरणाकडे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उर्वरीत क्षेत्र सॉल्टपॅन व सि.आर.झेड. ने ५०% पेक्षा जास्त बाधीत होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रहिवासी क्षेत्र उपलब्ध नाही. तसेच डी.डी.आर. जनरेट करण्यासाठी आरक्षणेही उपलब्ध नाहीत. विकास थांबलेल्या अवस्थेत आहे.

शासनाने मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू केला आहे. हा नियम लागू करतांना प्रिमीयम आकारणी करण्यात येणार आहे. हाच नियम मिरा भाईंदर महानगरपालिकास लागू केल्यास विकासाला चालना मिळेल व महानगरपालिकेस उत्पन्नही प्राप्त होवू शकेल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू करणेसाठी सुधारणा सूचवत आहे. मा. महापौर साहेब ह्याच्यामध्ये महानगरपालिकेला करोडो रुपयांचे उत्पन्न आहे.

**मा. महापौर :-**

ह्यासाठी ठराव करायला लागेल.

**मिलन पाटील :-**

रितसर विषय घ्या.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही सुचना घ्या प्रशासन कारवाई करतील.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, ठराव मी मांडलेला आहे. अनुमोदन ह्यांनी केलेलं आहे. आमच्या दोघांची हरकत नाही. त्याच्या सुचना समाविष्ठ करुन घ्या.

**मा. महापौर :-**

हा ठराव सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आमच्या गावठण क्षेत्रामध्ये खारीगांव, नवघर, गोडदेव येथे सिटी सर्व्हे नंबर नाहीत ती जागा गावठणमध्ये असल्यामुळे प्रत्येकाच्या नावाने मोजमाप झालेलं नाही. नगरपालिकेने सर्व्हेक्षण केले परंतु त्याचे नंबर दिलेले नाहीत जर अशा क्षेत्रामध्ये जे विद्यमान बांधकाम आहे. त्याच्या अतिरीक्त त्यांना चटई क्षेत्र देणार का? ह्याचा उल्लेख होणं गरजेचं आहे. कारण सन्मा. नरेंद्र मेहतानी जी सुचना केली त्यांना अर्धा ऐवजी एक एफ.एस.आय. द्या. परंतु गावठण क्षेत्रामध्ये चार-चार, पाच-पाच माळ्याच्या बिल्डींग उभ्या राहिल्या आहेत त्याचे काय करणार?

**नरेंद्र मेहता :-**

एक अधिक दोन रि-डेव्हलपमेंटला म्हणजे मुळ एक द्यावं.

**शशिकांत भोईर :-**

कारण अचानक सिटी सर्व्हे झाला आणि नंबर पडला नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

नरेंद्रजी त्याच म्हणणं बरोबर आहे की, तिकडे सर्व्हे नंबर नाही. एफएसआय काऊंट कसा करणार.

**नरेंद्र मेहता :-**

त्याचं म्हणणं बरोबर आहे मी जो मुद्दा मांडला आहे आता इतर ठिकाणी एक आपलं मुळ चटई क्षेत्र आहे. वन एफएसआय गावठणमध्ये अर्धा आहे म्हणजे त्यांना एक आणि जो काय बांधला आहे तो द्यावा असं माझं मत होत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

एक म्हणजे तुम्ही काय पकडणार?

**नरेंद्र मेहता :-**

जेवढा प्लॉट एरीया आहे तो एक एफएसआय आता आपल्याकडे अर्धा आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्या एरीयाचं मेजरमेंट कसं करणार?

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय वेगळा आहे डी.सी. रुलमध्ये त्या जागेला अर्धा एफ.एस.आय. आहे. त्याला गावठणला एक द्यावं ती आमची सुचना होती.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, अशा क्षेत्राचं मोजमाप झालेलं नाही. कुठे उताराही नाही आणि उतारा नसल्यामुळे त्याचे किती एफ.एस.आय. ने नाही मिळणार त्यामुळे आता देताना जे विद्यमान क्षेत्रफळ आहे ज्या जागेवर बांधलेलं आहे ते ॲडीशनल करुन ते एक एफएसआय देणार की कोणत्या ह्याने मोजणार? त्याला मेजरमेंट मार्जिन सोडत नाही त्याकरीता त्याचा विचार होणं गरजेचं आहे. म्हणून ह्या प्रस्तावामध्ये सुधारणा करणही गरजेच आहे कारण ज्याठिकाणी सिटी सर्व्हे नंबर झालेला नाही त्या जागेच मोजमाप नाही फक्त बिल्डींग बांधलेली आहे ह्याच्यावर सुचना घ्यावी. ज्या गावामध्ये सिटी सर्व्हे नंबर झालेला नाही किंवा त्याचा उतारा नाही अशा गावासाठी विद्यमान क्षेत्रफळ प्लस एक चटई क्षेत्र असे मंजूर करण्यात यावे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, उपमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेब गांर्भिय लक्षात घ्या. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या इमारतीमध्ये राहणा-या लोकांना रिडेव्हलपमेंट करणे शक्य नाही. कारण

त्याच्याकडे तेवढे पैसे नाहीत. म्हणून त्यांना एक्स्ट्रा एफ.एस.आय. त्यांना मिळावा म्हणजे एखादा विकासक येऊन ती इमारत पून्हा बांधेल त्याच्यासाठी हा ठराव पास करुन घ्या त्याच्यात तुम्ही ह्या सुचना ॲड करत गेला तर राज्य शासन मंजूर करणार नाही. इतर जे विषय आहेत ते वेगळ्या विषय पटलावर विषय आणा आणि ते पास करा.

**भगवती शर्मा :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंतजी मै आपको सुचना देता हूँ। इस सदन के अंदर मे अनेक ठराव हुए है। मै आपको एक एक का नाम भी बताता हूँ। अनेक ठराव है जिनमे सुचना हुई है। प्रशासन के पास नगरविकास खाते ने कुछ मंजूर किया। कुछ मंजूर नही किया। यह प्रशासन के पास जाने दिजिए। यह शहर का विषय है।

**अनिल सावंत :-**

विषय लेके आऐंगे।

**भगवती शर्मा :-**

विषय पत्रिका मे बाकी के विषय आने दो। महानगरपालिका की रेव्हेन्यू ४०० ते ५०० करोड बढेगी। इसी तरीकेसे मुंबई महानगरपालिका ने प्रस्ताव भेजा था जिसे सी.एम. साहबने मंजूरी दि है।

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहताने ठराव के अंदर मे सुचना दि है।

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

सन्मा. मिलन पाटील ने जो सुचना दी है उसको समाविष्ठ किजीए।

**मा. महापौर :-**

गावठण विषयी जो विषय घेतलेला आहे हा विषय अतिशय चांगला आहे. ज्या गावाचा सिटीसर्व्हे झाला नाही अशी गावं घेऊन त्याच्यानंतर हा ठराव करायला पाहिजे. अशा सुचना घेता येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, सुचनेसह ठराव मंजूर झाला असे सांगा.

**मा. महापौर :-**

गावठण का विषय किया उसका विषय बादमे लिया जाएगा।

**नरेंद्र मेहता :-**

गावठण म्हणजे घर नाही. गावठण म्हणजे पुरा परिसर चेणा, उत्तन हा पूर्ण परिसर आला.

**मा. महापौर :-**

गावठण म्हणजे घर नाही गावठण म्हणजे गावे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, सुचनेसह ठराव मंजूर झाला आपण ती नोंद घ्या.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, गोषवाऱ्यामध्ये पूर्ण माहिती दिली नाही. वन प्लस वन म्हणजे किती दिलेली आहे. इंडीव्युजवल जी लोक राहतात त्यांना परवानगी द्यायची का?

**अनिल सावंत :-**

मा. उपमहापौर साहेब, विरोधी पक्षनेत्यांनी इमारतीचा ठराव पास केलेला आहे. ही जी लिस्ट दिलेली आहे त्याच्यात दिल्ली दरबार हॉटेल आहे.

**भगवती शर्मा :-**

आपण लिस्टला मंजूरी दिलेली नाही आपण ठरावाला मंजूरी दिलेली आहे आपण हॉटेलला मान्यता दिली नाही.

**अनिल सावंत :-**

लिस्ट दिली आहे.

**भगवती शर्मा :-**

तुमच्या माहितीसाठी लिस्ट दिलेली आहे. ती ठरावामध्ये नमुद नाही तुम्ही कसं काय बोलता तुम्ही मा. महापौरांची दिशाभुल करु नका.

**(सभागृहात गोंधळ)**

**आसिफ शेख :-**

ठराव सुचनेसह मंजूर झालेला आहे पुढचा विषय घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

शहरामध्ये धोकादायक इमारती पडायला लागलेल्या आहेत. एक इमारत पडली आहे. त्याच्यातली लोक अजून रस्त्यावर आहेत. त्यांची कुठलीही राहण्याची व्यवस्था नाही हा ठराव जेवढ्या लवकर आपल्याला पाठवता येईल तेवढ्या लवकर इम्प्लीमेंन्टेशन होईल आणि तेवढ्या लवकर मंजूरी मिळेल. शहरामध्ये ग्रामपंचायत काळात बाधलेल्या इमारती धोकादायक अवस्थेत आहेत ज्या इमारतींना महापालिकेने नोटीसा दिल्या आहेत. त्याची आपल्या गोषवाऱ्यामध्ये

काय गरज नाही महापालिकेच्या रेकॉर्डवरती आहेत आणि त्याच्यानंतर ज्या धोकादायक होतील त्याची ह्याच्यात एन्ट्री होईल. ज्या पडण्याच्या स्थितीत आहेत त्यांना हा नियम लागु होईल.

**अनिल सावंत :-**

पण ठरावामध्ये ६६ इमारतींची लिस्ट दिली आहे ना?

**एस.ए.खान :-**

अर्धवट माहिती दिली आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठरावात सुचना करा भविष्यात येणाऱ्या सर्व इमारती........

**एस.ए.खान :-**

चुकीची माहिती दिली.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, ह्या ठिकाणी स्वयंस्पष्ट ठराव वाचण्यात आलेला आहे ह्या ठरावास सन्मा. भगवती शर्मा ह्यांनी अनुमोदन दिले आहे आणि सन्मा. मिलन पाटील ह्यांची सुचना आहे ती समाविष्ट केलेली आहे. ठराव सुचनेसह मंजुर झाला आहे सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

विरोधी पक्षनेते तुमचा आम्हाला विरोध नाही तुमचा ठराव पास झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

ज्या धोकादायक इमारती आहेत ज्या मोडकळीस आल्या आहेत त्याच्यासाठी.

**आसिफ शेख :-**

ठरावामध्ये त्या लिस्टचा उल्लेख नाही लिस्ट तुमच्या माहितीसाठी प्रशासनाने दिलेली आहे. कृपया सदस्यांनी मा. महापौरांची दिशाभुल करु नये.

**एस.ए.खान :-**

तुम्ही दिशाभुल करता आम्ही करत नाही.

अनिल सावंत :-

ठराव राज्यशासनाकडे व्यवस्थित गेला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

ठराव व्यवस्थित आहे पुढचा विषय घ्या.

**एस.ए.खान :-**

ठराव व्यवस्थित झाला नाही तर मंजूर होणार नाही.

**आसिफ शेख :-**

ठराव मंजूर होणार आहे.

**भगवती शर्मा :-**

ठराव मंजूर करणारे तिकडे बसले आहेत. तुम्ही तिकडे व्यवस्थित प्रस्ताव पाठवा.

**अनिल सावंत :-**

मा. उपमहापौरसाहेब, त्यांचा काहीतरी गैरसमज होतो माझ हेच म्हणणं आहे की, हा ठराव लवकरात लवकर राज्य शासनाकडुन पास होऊन यायला पाहिजे. त्यादिवशी मंत्रालयात मिटींग झाली त्यावेळी मा. पालक मंत्र्यांनी सांगितलं. मुंबईच्या पर्सनल डेव्हलपमेंट कोळी वाड्यासाठी जो रुल लागु केला गेला तसा तुमची विशेष बाब आहे. त्याच्यासाठी एक विशिष्ट कारण पाहिजे म्हणून हा ठराव पाठवून  ज्या इमारती मोडकळीस आल्या आहेत त्यांचा विचार करा आणि ६२ चा उल्लेख केला आहे. शासनाने यादी दिली आहे. त्याच्यात हॉटेल आहे तर तुम्ही काय करणार?

**भगवती शर्मा :-**

उस मिटींग मे गावठण के अंदर मे जो विषय सदस्य नरेंद्र मेहताने जो विषय लाया है उसपे चर्चा हुई थी। धोकादायक के बारे मे नही हूई थी। धोकादायक के बारे मे यह हुई थी एक्झेस्टींग प्लस वन एफएसआय का ठराव करो वह ठराव किया है। जो महासभा ने मंजूर किया है।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य अनिल सावंत ने जो मुद्दा उपस्थित केला. पालकमंत्र्यांकडे जी मिटींग झाली ती मिटींग फक्त सीआरझेड बाधीत धोकादायक इमारती.................

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

सुचनेसह ठराव मंजूर करा.

**प्रकरण क्र. ७७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि. ०१/०६/१९९५ पूर्वीच्या धोकादायक इमारतींना वाढीव चटईक्षेत्र देणेकरीता मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनिमय १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास नियंत्रण नियमावली विनीयम ३२(७) प्रमाणे दि.०१/०६/१९८५ पूर्वीच्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता जुन्या विद्यमान इमारतींचे चटईक्षेत्र + वाढीव १.० चटई क्षेत्र निर्देशांक व जास्तीत जास्त २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद आहे.

तथापी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ग्रामपंचायत कालावधी पूर्वी व तद्नंतर बनविण्यात आलेल्या इमारतींचे चटईक्षेत्र जास्तीचे आहे. म्हणून विद्यमान मंजूर तरतूद अपूरी आहे. सबब मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या धोकादायक तथा मोडकळीस आलेल्या इमारतींकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये नियमावलीत नवीन प्रस्तावित फेरबदलानुसार दि.०१/०६/१९८५ ऐवजी दि.०१/०६/१९९५ पूर्वीच्या इमारतींकरीता इमारतीमध्ये वापरलेले चटईक्षेत्र + १.० चटई क्षेत्र व कमाल मर्यादा ३.० चटई क्षेत्र याप्रमाणे तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

प्रस्तावित फेरबदलाबाबत आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन महानगरपालिकेने प्रस्ताव मा.शासनास दि. २१/१२/२०१० रोजी अंतिम मंजुरी करिता सादर केलेला आहे. व दि.१६/०९/२०११ रोजी सादर फेरबदल प्रस्तावास मंजूरी मिळणेकरीता शासनास विनंतीपत्र देण्यात आलेले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी मिरा भाईंदर महानगरपालिकेस लागू करणेसाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/२५८८/२०१०-११, दि.०६/१०/२०१० अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. सदरच्या प्रस्तावात विद्यमान बांधकाम क्षेत्र + १.० याप्रमाणे चटईक्षेत्राची तरतूद असणे आवश्यक असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रात ६० पेक्षा जास्त अती धोकादायक घोषित केलेल्या आहेत. इमारतीस धोकादायक असल्याची नोटीस देवून इमारती खाली करण्यासाठी महानगरपालिकेकडून इमारत खाली करुन इमारत तोडण्याचे आदेश रहिवाश्यांस दिल्यानंतर धोकादायक इमारतीतील रहिवाशी इमारत खाली करत नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने धोकादायक घोषित केलेल्या इमारती रिकामी करुन घेणे महानगरपालिकेस शक्य होत नाही. मात्र अचानकपणे इमारत पडून दुर्घटना होते. मृत्यु व मानवास दुखापत होते. अशी घटना घडल्यानंतर घटनेवर मात करण्यासाठी / घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेकडे पर्याय राहत नाही. सबब महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक घोषित इमारतीचा पूर्नविकास करण्यासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करणे आवश्यक आहे.

१) दि.०१/०६/१९९५ पूर्वी बांधण्यात आलेल्या विद्यमान इमारतीस महानगरपालिकेने धोकादायक घोषित केल्यानंतर धोकादायक इमारतीचा पूर्नविकास करावयाचा असल्यास पूर्नविकासासाठी विद्यमान चटईक्षेत्र + १ याप्रमाणे चटईक्षेत्र असणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस व फेरबदलाचे सूचना हरकती घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्या गावात क्षेत्रात १/२ चटईक्षेत्र अनुयोज्ञ आहे त्या गावात क्षेत्रात १ चटईक्षेत्र करावे. ज्या गावात नियोजित प्राधिकरण (Planning Authority) महानगरपालिका आहे, जेणे कारणे गावात व इतर रहिवासियांना सुविधाचा फायदा होईल असे मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. मिलन पाटील व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी शासनाने अनुज्ञेय चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ याप्रमाणे मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हद्दीवाढ होण्यासाठी चारही बाजूने क्षेत्र उपलब्ध नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, डोंगरी, चौक, तारोडी, पाली ही महसूल गावे एम.एम.आर.डी.ए. या विशेष नियोजन प्राधिकरणाकडे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उर्वरीत क्षेत्र सॉल्टपॅन व सि.आर.झेड. ने ५०% पेक्षा जास्त बाधीत होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रहिवासी क्षेत्र उपलब्ध नाही. तसेच डी.डी.आर. जनरेट करण्यासाठी आरक्षणेही उपलब्ध नाहीत. विकास थांबलेल्या अवस्थेत आहे.

शासनाने मुंबई उपनगरीय क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू केला आहे. हा नियम लागू करतांना प्रिमीयम आकारणी करण्यात येणार आहे. हाच नियम मिरा भाईंदर महानगरपालिकास लागू केल्यास विकासाला चालना मिळेल व महानगरपालिकेस उत्पन्नही प्राप्त होवू शकेल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी चटईक्षेत्र १.० ऐवजी १.३३ लागू करणेसाठी सुधारणा सूचवत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक सौ. नयना म्हात्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक मिठागर, शेतकरी, कोळी बांधव व इतर समाजाचे स्थानिक आहेत. पुर्व काळापासून काही गावठण व मौजे महसुल गावात महसुल विभागाकडून, भुमापन विभागाकडून तत्कालीन ग्रामपंचायत, नगरपरिषद कडून सर्व्हे (मोजमाप) करण्यात आलेली नाही. गावातील जुन्या घरांना सिटी सर्व्हे नंबर नसल्याने घर बांधताना किंवा पुर्ननिर्माण करताना अनेक अडचणी येतात. जुन्या ग्रामपंचायत काळीन घरांना घर नंबर आहेत व त्यांच्याकडे ग्रामपंचायत काळीन घरपट्टी पावती आकारणी केलेल्या पावत्या आहेत. पण इमारत जर्रर जुनी किंवा मोडकळीस आल्यामुळे त्या घरातील / इमारती मधील रहिवाशी स्थलांतरीत झाल्यामुळे ती जागा मोकळी झालेली आहे. काही इमारतींच्या बाबतीत ई.एल.यु. नकाशाप्रमाणे वाढीव एफ.एस.आय. देताना विद्यमान चटईक्षेत्र १.० + चटईक्षेत्र देण्यात यावे.

तसेच बृहनमुंबई व उपनगर जिल्हातील गावठण कोळीवाडा इत्यादी क्षेत्रासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांनी अनुज्ञेय चटईक्षेत्र १.०० ऐवजी १.३३ या प्रमाणे मंजुरी दिलेली आहे. आपल्या मनपा क्षेत्राच्या हद्दीमध्ये तीन बाजुनी समुद्र असून वाढ होण्याची शक्यता नाही. एम.एम.आर.डी.ए. या प्राधिकरणाने मनपा क्षेत्रातील मुर्धा ते उत्तन, चवळी या परिसराला एस.ई.झेड. घोषीत केल्याने मिठागर व सी.आर.झेड या कायद्याने अनेक स्थानिक शेतकरी व रहिवाशी बांधीत झाले आहे. मुंबईतील प्रचलीत नियमाप्रमाणे प्रिमियम आकारणी करुन विकास करता येईल. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल, अशी मी सुचना करीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.७८, सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक ०३/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर शहरात खाजगी लावल्या जाणाऱ्या जाहिरात फलकांवर बंदी आणण्याबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खाजगी शब्दांचा उल्लेख केला आहे. खाजगी म्हणजे काय?

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये वैयक्तिक, हार्दिक शुभेच्छांचे, मंडळांचे, पदनियुक्तीचे, सणाबाबतचे, वाढदिवसाचे इ. सर्व प्रकारचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी अनधिकृतपणे लावले जातात. त्यामुळे शहर व परिसर विशोभित दिसतो. ते लावत असतेवेळी रत्यावर खड्डे खोदले जातात. त्यामुळे रस्ते खराब होतात. काही वेळा ते पालिकेची परवानगी न घेता लावले जातात. त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होते. बऱ्याच वेळा कार्यक्रम संपल्यानंतर सुध्दा बराच काळ सदरचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी काढले जात नाहीत. काही वेळा यामुळे समाजामध्ये तणाव निर्माण होतात. यावर महापालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ तसेच महाराष्ट्र मालमत्ता विरुपन कायद्यातील तरतुदी नुसार कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित असते. परंतु प्रत्येक वेळी कार्यवाही होतेच असे नाही. अशा प्रकारच्या जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी शहरामध्ये कायमस्वरुपी बंदी घालावी व या निर्णयाचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर तसेच अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कारवाई करावी, असा मी ठराव मांडत आहे. मा. महापौर साहेब, हा जो विषय आहे महासभेने बऱ्याच ठिकाणी ह्या दोन तीन वर्षात दौरे केल्यामुळे नंतर आम्ही बऱ्याच शहरात बघितलं त्याच्यात पण जी मनाली किंवा अमृतसर ह्या शहरामध्ये हे जे प्रायव्हेट कटआऊट लागले जातात मग ते बर्थ-डे चे असू दे ते कट आऊट वर्षभर काढले जात नाहीत म्हणजे ते पुढचा बर्थडे येईपर्यंत असतात. सणाच्या दिवशी रस्त्यावर दोन्ही बाजूने खड्डे खोदुन गेट लावले जातात. त्या गेटमुळे रस्ते खराब होतात शहर विशोभित होते. ह्या कारणामुळे मिरा भाईंदर शहरामध्ये जे प्रायव्हेट कटआऊट लावले जातात त्यांना कायम स्वरुपी बंदी असावी ज्यांना कटआऊट किंवा होर्डींग लावायचे असतील तर महानगरपालिकचे होर्डींग आहेत जे महानगरपालिकेने जाहीरातदारांना बीओटी तत्वावर दिलेले आहेत त्या जाहीरात फलकावर त्यांनी होर्डींग लावावे ज्यांना जाहिरात करायची आहे त्यांनी त्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, अनिल सावंतनी जो प्रस्ताव आणला आहे. तो शहराच्या दृष्टीने चांगला आहे. या शहरात सर्व धर्माचे नागरीक राहतात. मग होळी, दिवाळी, गणपती, नवरात्री असु द्या. आपण एकदमच बंद केलं तर कुठलही मंडळ त्याच्या मंडपात किंवा गल्लीत किंवा कुठल्या एरीयात एखादा कार्यक्रम असला आणि तुम्ही एकाही होर्डींगला जाहिरातला परवानगी देणार नाही तर तो कसा करणार? एक धोरण ठरवा की शहर कसं सुंदर दिसेल एकदमच बंदी टाकुन चालणार नाही. उदा. नयानगर आहे तिथे एकही होर्डींग नाही कुठलाही कार्यक्रम असला तर त्यांनी जाहीरात कुठे लावावं बोर्ड कुठे लावायच गावात एखादा कार्यक्रम झाला तर त्यांनी एकही बोर्ड लावायच नाही का? गावात होर्डींग आहेत का? साहेब, मिरा भाईंदरला होर्डींग आहेत का? साहेब, मिरा भाईंदरला होर्डींग आहेत, मिरारोडला होर्डींग आहेत, भाईंदर पूर्व आणि पश्चिमला होर्डींग लागलेच नाहीत. कुठल्याही कार्यक्रमाला लावलं नाही तर कसं होईल. रस्त्याचं नुकसान जेथे् होते तेथे आपण बंदी घाला पण एकदम बंदी घातली तर जे काही धार्मिक संस्था आहेत किंवा सांस्कृतिक संस्था आहेत ते कुठे जाणार? होर्डींग एवढं महाग झालं आहे की सामान्य मंडळ ते लावू शकत नाही. १०,०००/- त्याच्यावर रेंट आहे. एखाद्या गल्लीमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम करणारा मित्रमंडळ असेल तर ते १०,०००/- होर्डींग लावणार का? तीन होर्डींग लावले तर ५०,०००/- होणार साहेब त्यांना ते परवडणार का? अनिल सावंत आपण ह्याच्यावर एक बैठक घेऊन रितसर चर्चा करु या एकदम बंदी टाकु नका.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर साहेब, होर्डींग का कोई लिमिट तो होना मंगता है। उसमे कुछ लिमिटेशन बांधो ना।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेचे ३५० होर्डींग आहेत तुम्ही रिलायन्सवाल्यांना दिले आहेत पोल वगैरे लावायला त्यानंतर मध्येमध्ये पोल वगैरे लावायला दिले आहेत, डिव्हायडरमध्ये लावायला दिले आहेत. त्या व्यतिरीक्त जे होर्डींग किंवा गेट लागतात किंवा पालिकेने प्रत्येक वॉर्डमध्ये दोन दोन नोटीस बोर्डच्या जागा पॉईंटआऊट कराव्या आणि त्याठिकाणी मार्किंग करुन त्याठिकाणी लावायला द्याव्या. पोस्टर लावतात ते कुठेही लावतात आणि वर्षानुवर्षे ते बोर्ड निघत नाहीत प्रत्येक वॉर्डमध्ये दोन जागा निश्चित करा म्हणजे तिकडच्या नगरसेवकांना नोटीसबोर्ड म्हणून वापर करता येईल.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. अनिल सावंतनी जो प्रस्ताव आणला आहे त्याला मंजूरी द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

क्लासेस के बोर्ड, बिअर बार के बोर्ड, हॉटेल के बोर्ड अनऑथोराईज्ड् लगते है। और पॉलिटीकल बोर्ड जो लगते है उसको अधिकारी फाडके फेकते है। प्रोग्राम खतम होने के पहले ही उसको उतार देते है। मेरे पास पुरावा है मुख्यमंत्री के होर्डींग चौहान साहब ने उतारा। मेरे ऑफिस को जो बोर्ड था वो भी उन्होने उतारा। उसके उपर कडक कारवाई करो। मैने मा. मुख्यमंत्री को लेटर भेजा है। मा. महापौर और मा. कमिशनर को कॉपी दिया है। मै सन्मा. अनिल सावंत को धन्यवाद देता हूँ साहेब पूर्ण बद करा कमिशनर साहेब मैने आपको लेटर दिया है। उसपर कोई कार्यवाही हुयी नही। मै फोटो रुजु करता हुँ।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पानपट्टे साहेब, या संदर्भात मी यादव ह्यांना सुचना दिली होती. आमचे बोर्ड काढले जातात. बाकीच्या मंडळाचे बोर्ड आता पण तिथे लागले आहेत ह्याच्यावर कारवाई होत नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

अपने महानगरपालिका के बोर्ड के उपर सर्कस का बॅनर लगता है।

**मा. महापौर :-**

सन्मा. अनिल सावंतजीने प्रस्ताव मांडलेला आहे. त्याच्या मध्ये प्रत्येक वॉर्डात दोन बॅनर लावण्याची परमिशन देण्यात येत आहे बाकी सर्व बंद करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. अनिल सावंतनी जो विषय इकडे आणला आहे त्यांनी विषय आणल्यामुळे सर्वांना चर्चा करण्याची संधी मिळाली आहे. माझे असे म्हणणे आहे की, सन्मा. आयुक्त विक्रम कुमारजी ह्यांनी ज्या दिवसापासुन ह्या शहराचा आयुक्त म्हणून चार्ज स्विकारला आहे त्यांनी जाहिरात संबंधी स्वतःचे धोरण अवलंबविलं आहे. जर जाहिरात करायची असेल तर एका व्यक्तीला पाच ठिकाणी आपण परवानगी देऊ शकतो त्याप्रमाणे त्यांनी परवानगी पण दिलेली आहे. सन्मा. अनिल सावंतनी जो विषय आणलेला आहे तो विषय आणण्याची गरज नव्हती प्रशासनाने ह्या संदर्भात कारवाई करायला पाहिजे आपल्याकडे उपविधी मंजूर आहेत नियम मंजूर आहेत नियमाप्रमाणे मा. आयुक्त कारवाई करतील. आता तुम्ही असा निर्णय घेणार की फक्त दोनच देणार तर असं चालणार नाही. या शहरात सर्वसामान्य नागरीक राहतो ज्याला स्वतःची जाहिरात करायची असेल. सण असतात कोणाचे वाढदिवस असतात लहान जी मंडळे आहेत त्यांनी काय करायच ते परवानगी घेऊनच लावतील.

**दिनेश नलावडे :-**

वाढदिवस करतात त्याचे बोर्ड सहा-सहा महिने तसेच पडलेले असतात.

**आसिफ शेख :-**

तो अधिकार मा. आयुक्तांचा आहे हा विषय महासभेचा होऊ शकत नाही. हे प्रशासनाचं काम आहे. प्रशासनासाठी मा. आयुक्त सक्षम आहेत मा. आयुक्त ह्या संदर्भात योग्य निर्णय घेणार आहेत प्रस्तावाची गरज नाही असं माझं स्पष्ट आणि प्रामाणिक मत आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. चंद्रकांत मोदी बोलले त्या माणसांनी बोर्ड उचलला त्या अधिकाऱ्यावर कारवाई का करत नाही त्याच्यावर कारवाई करायला सांगा. ज्या अधिकाऱ्याचे नाव सांगितंल त्या चंद्रकांत मोदीचा विषय तुम्ही बाजूलाच ठेवता वरती कशाला बसले आहात.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, मैने पाच-पाच फोटो दिए है।

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही आदेश देऊ शकत नाही.

**भगवती शर्मा :-**

त्यांना शब्द मागे घ्यायला सांगा.

**मा. महापौर :-**

शब्द मागे घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

मी तुम्हाला काय बोललो श्री. चंद्रकांत मोदी तुम्हाला बोलले की, त्यांच्या ऑफिसचा बोर्ड काढला.

**मा. महापौर :-**

श्री. चंद्रकांत मोदी काय बोलले ते ऐकायला आले नाही. सभागृह शांत असताना बोलायला पाहिजे दहा लोक बोलणार तर ऐकायला येणार का?

**दिनेश नलावडे :-**

तुम्हाला विरोधक माझ्यावर कारवाई करायला सांगता शब्द मागे घ्यायला मी तुम्हाला काय बोललो मी मा. महापौरांना काय बोललो.

**मा. महापौर :-**

तुम्ही कशाला वरती बसले.

**दिनेश नलावडे :-**

हा शब्द तुम्हाला महासभेत हजार जण बोललात काय कारवाई केली तुम्ही

**मा. महापौर :-**

कोणी मला असे शब्द बोलू शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. चंद्रकांत मोदी ह्यांना बोलायची संधी द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. अनिल सावंतनी जो विषय आणलेला आहे त्यांनी त्याचा अभ्यास करायला पाहिजे होता असं माझं मत आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाला आम्ही किती वेळा तक्रार केली आहे. त्यासाठी हा विषय महासभेत आणला आहे. जे दोषी आहेत त्याच्यावर कारवाई करायला सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत तुमचा विषय रितसर वाचून दाखवा.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. श्री. अनिल सावंत, तुम्ही रितसर विषय वाचून दाखवा.

**अनिल सावंत :-**

सन्मा. विरोधी पक्षनेते यांची जी भुमिका आहे, ती या शहराच्या हिताच्या दृष्टीने नाही. मा. महापौरांना ते दोन वेळा बोलले की, मा. महापौरांची दिशाभुल करतात. मा. महापौरांना काही कळत नाही असे तुमचे म्हणणे आहे का? "ज" चा प्रस्ताव दिला. प्रशासनाचा विषय होऊ शकत नाही हे ठरवणारे सन्मा. विरोधी पक्षनेते कोण? प्रशासन

ठरवेल. मा. महापौर ठरवतील. हे ठरविण्याचा अधिकार यांना कोणी दिला? आणि हे सांगतात की, मा. महापौरांची दिशाभुल करतात. सभागृह मा. महापौरांची दिशाभुल करु शकते का? आज मिरा भाईंदरचे प्रथम नागरीक तुम्ही आहात तुम्हाला सर्व गोष्टी कळतात. तुमचा आदर ठेवून, रिस्पेक्ट ठेवून प्रत्येक सन्मा. सदस्य इकडे बोलत असतो. आणि हे ठरवणार की, मा. महापौराची दिशाभुल करतात. हे आज सकाळपासून दिशाभूल करतात. आग लावायचे धंदे यांचे चालले आहेत. श्री. दिनेश नलावडे काही बोललेले नाहीत. तुमची इज्जत, तुम्ही आमचे जिल्हाध्यक्ष आहात. तीस वर्षे काँग्रेस पक्षासाठी झिजवले आहेत. आम्हाला माहिती आहे की, तुमची इज्जत कोणी कशी करायची यांनी आम्हाला शिकवण्याची गरज नाही. सभागृहामध्ये विषय आलेला आहे. प्रशासनाने सांगायचे होते की, हा "ज" चा प्रस्ताव होऊ शकत नाही. मी मागे घेतला असता पण अभ्यास करायला पाहिजे होता. तुम्ही काय अभ्यास केला तो सांगा. उद्या चौदा तारखेला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये विषयपटलावर हा विषय आहे. माहिती घ्या की, शहरामध्ये कायमस्वरुपी होर्डींगला बंदी आणि ज्या ज्या शहरामध्ये आम्ही फिरुन आलो, महाराष्ट्रामध्ये किंवा महाराष्ट्र सोडून, कुठेही मिरा भाईंदर सारखे होर्डींग दिसत नाहीत. वर्षभरापूर्वीचे वाढदिवसाचे होर्डींग मी तुम्हाला नेऊन दाखवतो.

**मर्लिन डिसा :-**

गोव्यामध्ये एकपण नाही.

**अनिल सावंत :-**

आणि मी काय म्हटले आहे की, बीपीएमसी ॲक्ट मध्ये जी प्रोव्हीजन आहे, त्यानूसार कार्यवाही करा. मी तुम्हाला कायमस्वरुपी बंद घाला म्हणून अजून ठराव पण मांडलेला नाही. विषय आणलेला आहे. विषयावर व्यवस्थित चर्चा करा. माहिती नसेल तर माहिती करुन घ्या. उगाच आरोप करु नका. चढवाचढवीचे धंदे करु नका. मा. महापौर आमचे आहेत. त्यांची इज्जत कशी राखायची ते आम्हाला माहिती आहे. आम्हाला ते भिष्माचार्यांसारखे आहेत. हे आम्हाला तुम्ही शिकवण्याची गरज नाही. श्री. दिनेश नलावडे काहीही बोललेले नाहीत. श्री. दिनेश नलावडे फक्त एवढेच बोलले की, श्री. चंद्रकांत मोदी यांनी जे सांगितले, ते तुम्ही ऐकुन घ्या.

**मा. महापौर :-**

श्री. मोदी काय बोलले ते कोणाला ऐकू आलेले नाही. श्री. चंद्रकांत मोदी यांनी काय ते आत्ता बोलावे.

**चंद्रकांत मोदी :-**

मैने अभी मा. आयुक्त साहब को जो फोटो के साथ लेटर दिया, अन्य होर्डींग नही निकाला जाता है। और मिरा भाईंदर से आपके फोटो, मा. मुख्यमंत्री का फोटो, श्रीम. सोनिया गांधी का फोटो, श्री. राहूल गांधी, सन्मा. माजी आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहब के फोटो का चित्रीहाल, अधिकारी ब्लॅक कलर के गाडी मे बैठकर, काच निचे उतारकर खडे खडे उतारकर उसका चित्रीहाल किया। मैने आपको फोटो भेजा मा. आयुक्त साहब ने देखा। एक कॉपी मा. मुख्यमंत्री को भेजा और एक कॉपी आपको भेजा।

**मा. महापौर :-**

जिसने किया उसका आपके पास फोटो है क्या?

**चंद्रकांत मोदी :-**

दिया है। चव्हाण नाम का अधिकारी है।

**मा. महापौर :-**

श्री. चंद्रकांत मोदी यांनी ज्या माणसाला बघितलेले आहे, त्याचा फोटो तुमच्याकडे दिलेला आहे. त्याला ताबडतोब सहा महिन्यांसाठी सस्पेंड करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, धन्यवाद हा निर्णय आम्हाला तुमच्याकडून अपेक्षित आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. मी आत्तापर्यंत या शहरामध्ये कधी होर्डींग लावलेले नव्हते. मला त्या होर्डींगची गरज नाही. आम्ही लोकांना रस्त्यावर दिसतो. मला स्टँडींग कमिटीमध्ये घेतले म्हणून माझ्या कार्यकर्त्यांनी दोन होर्डींग लावले. मी त्याच दिवशी बाहेर गेले आणि श्री. सुनिल यादव यांना कोणीतरी सुपारी दिली की, ते होर्डींग काढा. म्हणून त्यांनी जाऊन एका दिवसामध्ये माझे होर्डींग काढले. त्यांना बाकीचे होर्डींग दिसले नाही का? म्हणजे हे अधिकारी एवढे राजकारण करणार का? या अधिकाऱ्यांना राजकारण करण्याची परवानगी कोणी दिली? मा. आयुक्त साहेब, त्या अधिकाऱ्यांवर पहिले कार्यवाही करा. त्यांनी होर्डींग काढायचे होते तर सगळ्यांचे काढायचे होते. त्यांनी माझेच दोन कसे काय काढले?

**मा. महापौर :-**

यापूढे कुठलेही विना परवानगीचे बोर्ड असतील, त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन ते बोर्ड काढले जातील.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांनी काढले त्याच्याबद्दल माझा वाद नाही पण त्यांनी सगळ्यांचे काढायला पाहिजे होते.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, आपण नियम केला आहे की, एका माणसाला फक्त पाच होर्डींगची परवानगी देण्यात येईल. एका माणसाला नाही, एका व्यक्तीबाबत कोणती जाहिरात लावायची असेल तर पाचच होर्डींगची परवानगी द्या. कारण तो पाच लावत नाही, पन्नास लावतो. एका विषयावर फक्त पाच होर्डींग लावायची परवानगी द्या.

**एस.ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, सर्कसवाल्यांनी किती कागदी पोस्टर्स लावलेले आहेत. बसस्टॉप वर आहे, आपले जे चौक आहेत त्याच्यावर आहेत किती कागदी पोस्टर लावतात त्याच्यावर पत्ता असतो त्यांच्यावर आपण गुन्हा दाखल करु शकतो. मुंबई प्रांतिक कायद्यानुसार त्यांच्यावर आपण गुन्हा दाखल करु शकतो. मग का करत नाही? एकतरी गुन्हा दाखल केला आहे का? सर्कसवाल्यांनी एवढे पोस्टर लावले, त्याच्यावर काही कार्यवाही आहे का?

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर साहेब, झाडांवर जे होर्डींग आहेत, ते पण काढायचे आहेत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, ३१/१० च्या मा. महाभेमध्ये आपले सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब यांनी माझी व माझ्या पक्षाची बदनामी केली. त्यांनी असा उच्चार केला, मी स्वतः ऐकले नाही पण दुसऱ्या दिवशी जेव्हा पेपरला आले तेव्हा मला माहिती पडले की, माझी मुर्धा येथे पुर्नमिलन नावाची बिल्डींग आहे, तिकडे यांनी चोरटे कनेक्शन लावले आहेत असा त्यांनी उच्चार केला आणि इकडे माझी मानहानी केली तर याबाबत मी याचा खुलासा तुमच्याकडे दिलेला आहे आणि ही माझी अधिकृत नळ कनेक्शन आहेत त्या बिल्डींगला ऑक्युपेशन सर्टीफिकेट आहे. २००३ साली मी त्याचे दोन कनेक्शन दिले आहेत आणि सोसायटीने एक कनेक्शन परत घेतलेले आहे. असे तीन कनेक्शन घेतले आहेत. साहेब, त्याच्यावरुन प्रोसिडींगमध्ये जे आलेले आहे ते काढण्याची तुम्ही त्यांना सुचना करावी.

**मा. महापौर :-**

या प्रकरणाची शहानिशा करुन तो विषय काढून टाका.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, जर हा खुलासा केला तर या पेपरवाल्यांनी जी बातमी दिली आहे की, मा. महापौर आणि मा. उपमहापौर निकम्मे आहेत, त्याचा पण खुलासा करा.

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये वैयक्तिक, हार्दिक शुभेच्छांचे, मंडळांचे, पदनियुक्तीचे, सणाबाबतचे, वाढदिवसाचे इ. सर्व प्रकारचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी अनधिकृतपणे लावले जातात. त्यामुळे शहर व परिसर विशोभित दिसतो. ते लावत असतेवेळी रत्यावर खड्डे खोदले जातात. त्यामुळे रस्ते खराब होतात. काही वेळा ते पालिकेची परवानगी न घेता लावले जातात. त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होते. बऱ्याच वेळा कार्यक्रम संपल्यानंतर सुध्दा बराच काळ सदरचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी काढले जात नाहीत. काही वेळा यामुळे समाजामध्ये तणाव निर्माण होतात. यावर महापालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ तसेच महाराष्ट्र मालमत्ता विरुपन कायद्यातील तरतुदी नुसार कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित असते. परंतु प्रत्येक वेळी कार्यवाही होतेच असे नाही. अशा प्रकारच्या जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी शहरामध्ये कायमस्वरुपी बंदी घालावी व या निर्णयाचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर तसेच अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कारवाई करावी, असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आत्ता काय ठराव वाचला तो सचिवांनी नंतर वाचून दाखवायचा आहे. मा. महापौर साहेब, या पोस्टरबाबत काय ठराव आहे तो अजून आम्हाला नीट ऐकायला आलेला नाही. ऐकल्यानंतर सांगू, पण आम्हाला जे बोलायचे आहे, ते मी बोलतो आहे. पक्षपातीपणा केला जातो आहे. प्रत्येक वॉर्डमधील बॅनर काढले जात नाहीत. ते काढले पाहिजेत. एकाचा काढतात आणि एकाचा काढत नाही हे योग्य नाही जेव्हा त्याची वेळ संपलेली आहे, आपण त्याची परवानगी दिलेली नसेल तर ते सर्व बॅनर काढले पाहिजेत. नक्की हे बॅनर मेन रस्त्यावरचेच काढणार आहात की, वॉर्डमध्ये पोलवर लावलेले आहेत. तेसुध्दा काढणार आहात याचासुद्धा निर्णय याच्यामध्ये घ्या. प्रत्येक गल्लीतील बॅनर तुम्ही काढुन टाका आणि बॅनर लावायला तुम्ही परवानगी देऊ नका. ठरावामध्ये काय आहे ते माहिती नाही. बॅनरमुक्त शहर करा आणि शहर सुशोभित राहिल असा प्रयत्न करा अशी माझी विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, या ठरावाला माझी एक सुचना आहे याच्यापुढे कमानीला परवानगी देताना कमानी बांधण्याकरीता रस्ते खोदण्याची परवानगी देऊ नका. त्यांना सुचना द्या की, ड्रममध्ये माती टाकून पोल उभे करायला त्यांना परवानगी देण्यात यावी. रस्ते खोदण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

**नरेंद्र मेहता :-**

शहरामध्ये आपली परवानगी नसेल तरी होर्डींग लागणारच आहेत आणि आपण कडक कार्यवाही करणार असणार तर ते शक्य होणार नाही. तुम्ही एकदम स्पष्टपणे धोरण ठरवा की, ज्यांनी लावले त्यांच्यावर पोलिस गुन्हा दाखल करायला तुमची तयारी असेल तरच करा. आपण रितसर पुढच्या सभेमध्ये विषय आणा. एका मिटींगमुळे काय फरक पडणार आहे.

**मा. महापौर :-**

श्री. अनिल सावंत यांनी जो विषय घेतला होता तो शहराच्या हिताचा विषय होता. तरीसुद्धा त्याच्यावर सभागृहाने रितसर विचार करुन त्याचा रितसर विषय आणावा.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, हम होर्डींग की परमिशन देते है, उसके उपर निकालने की तारीख नही लिखी होती है। मैने पहले लिखकर दिया हुआ है की, किस तारीख को इसकी अवधी पुरी होती है, वो होर्डींगपर लिखना जरुरी किया जाए ताकी उसके बाद भी लगा रहेगा तो पब्लीक मे मेहनत कम हो जाएगी। दुसरा उसको निकालने की जिम्मेदारी भी लगानेवालों को दि जाए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेवक को मालुम नही है की, ऑर्डर पर लिखा हुआ रहता है की, निकालनेकी जबाबदारी उनकी है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपण सविस्तर विषय घेणार तेव्हा चर्चा करा.

**नगरसचिव :-**

श्री. अनिल सावंत यांनी मांडलेल्या ठरावाचे मी वाचन करतो. मिरा भाईंदर शहरामध्ये वैयक्तिक, हार्दिक शुभेच्छांचे, मंडळांचे, पदनियुक्तीचे, सणाबाबतचे, वाढदिवसाचे इ. सर्व प्रकारचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी अनधिकृतपणे लावले जातात. त्यामुळे शहर व परिसर विशोभित दिसतो. ते लावत असतेवेळी रत्यावर खड्डे खोदले जातात. त्यामुळे रस्ते खराब होतात. काही वेळा ते पालिकेची परवानगी न घेता लावले जातात. त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होते. ब-याच वेळा कार्यक्रम संपल्यानंतर सुध्दा बराच काळ सदरचे जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी काढले जात नाहीत. काही वेळा यामुळे समाजामध्ये तणाव निर्माण होतात. यावर महापालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ तसेच महाराष्ट्र मालमत्ता विरुपन कायद्यातील तरतुदी नुसार कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित असते. परंतु प्रत्येक वेळी कार्यवाही होतेच असे नाही. अशा प्रकारच्या जाहिरात फलक, बोर्ड, कटाउट्स, कमानी शहरामध्ये कायमस्वरुपी बंदी घालावी व या निर्णयाचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर तसेच अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कारवाई करावी, असा मी ठराव मांडत आहे. सुचक श्री. अनिल दिवाकर सावंत, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता आपले ठरले मग ठरावाची गरज काय आहे? आमचे असे मत आहे की, होर्डींगबाबत तुम्हाला जो काही निर्णय घ्यायचा आहे तो शहरामध्ये इम्प्लिमेंट झाले पाहिजे आणि प्रॅक्टीकली झाले पाहिजे की, सर्व धार्मिक किंवा संस्था आहेत त्यांना लावायची संधी मिळाली पाहिजे प्रत्येक माणुस पोल होर्डींगवर जाऊ शकत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त बी.पी.एम.सी. ॲक्ट प्रमाणे कार्यवाही करतील.

**नरेंद्र मेहता :-**

आमचे म्हणणे असे आहे की, मा. आयुक्तांनी हा प्रस्ताव द्यावा की, त्यांना नक्की कोणत्या प्रकारे या शहरात इम्प्लीमेंट करता येईल, कोणत्या ठिकाणी परवानगी देता येईल त्यानंतर विषय आणावा.

**अनिल सावंत :-**

ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करतील.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी प्रस्ताव द्यावा. मा. महापौर साहेब, प्रशासनाकडून हा प्रस्ताव येऊ द्या असे आमचे मत आहे. रितसर सगळी माहिती येऊ द्या नंतर विषय आणावा नाहीतर त्याचे होणारे इम्प्लीमेंट होणार नाही. घाईमध्ये होईल. लावणारा होर्डींग लावणारच आहे तो थांबणार नाही मग एकदम नियमित करा. त्यांनाही सोयीचे पडेल आणि महापालिकेलाही सोयीचे होईल.

**अनिल सावंत :-**

कुठेतरी शहराला शिस्त लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

शिस्त एकदम लागत नाही.

**अनिल सावंत :-**

जमले नाही तर मा. आयुक्त साहेब नंतर प्रस्ताव आणतील. ठराव पास करा त्याच्याप्रमाणे होईल.

**शरद पाटील :-**

या ठरावावर श्री. जुबेर इनामदार यांनी नंतर सुचना केली आहे ती याच्यामध्ये घेतली आहे का?

**अनिल सावंत :-**

नाही घेतली.

**जुबेर इनामदार :-**

माझी सुचना मी परत घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

तो ठराव करायचा असेल तर त्या ठरावाला आमचा विरोध आहे प्रस्ताव प्रशासनातर्फे परत सादर करावा.

**भगवती शर्मा :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही तुमचा गोषवारा देऊन रितसर विषय घ्या. त्याच्यामध्ये काय करता येईल, काय शिक्षा देता येईल, कुठे लावता येईल कुठे लावता येणार नाही याचा एक संपूर्ण गोषवारा तुम्ही द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, श्री. अनिल सावंत यांनी उल्लेख केला की, जे खाजगी बोर्ड आहेत, त्यांच्यावर त्यांनी जाहिरात करावी. खाजगी बोर्डचे एका महिन्याचे दहा हजार रुपये रेट आहे. एकतर महापालिकेने स्वतःची ३०-३५ होर्डींग लावावे आणि ते होर्डींग............

**अनिल सावंत :-**

यांची सुचना चांगली आहे. मी तर म्हणतो की, महापालिकेने प्रत्येक प्रभागामध्ये एक होर्डींग लावावी. मा. आयुक्त साहेब, येणाऱ्या मिटींगमध्ये रितसर विषय घ्या.

**मा. महापौर :-**

श्री. अनिल सावंत यांनी जो ''ज'' चा प्रस्ताव आणलेला आहे, याबाबत सभागृहाचे मत आहे की, आपण याचा पूर्ण अभ्यास करुन आणि मा. आयुक्तांनी प्रस्ताव देऊन हा विषय पुढच्या सभेमध्ये आणावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी मघाशी सभा सुरु होताना आपल्याला २(क) प्रकरण ''ड'' मधील प्रकरण २(१) के चे प्रस्ताव आहेत. याबाबत सुचित केलेले प्रशासनाकडून आलेला विषय आहे. विषय असा आहे की, मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजनेतील सांडपाण्यावर पूर्नप्रक्रीया आणि पूर्नवापर करणेबाबत आपण एक ठराव केलेला, त्या अनुषंगाने मा. महासभेने ०१/०२/२०११ रोजी ठराव क्र.८४ अन्वये मान्यता दिली होती आणि जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर शहराला सुर्या धरणातुन १००० दशलक्ष लीटर पाणी आरक्षण करताना पाण्याच्या पूर्नवापराची अट घातली होती. मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजने अंतर्गत सांडपाण्याचा पुर्नवापर करणे कामी सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मलनिःस्सारण केंद्रातील सांडपाण्याचा पूर्नवापर करणेचा प्रस्ताव राबविण्यात येणार असून एकूण २० टक्के पाणी पूर्नवापरासाठी प्रस्तावीत आहे. त्याबाबत खाजगी लोकसहभागातून या प्रकल्पाची उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी संस्थांकडुन संकल्पन करणे, अर्थसहाय्य करणे, बांधणे राबविणे व हस्तांतरण करणे या तत्तावर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये सदरील योजना २५ वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती व चालविणेचा अंर्तभाव होता. परंतु, सदर निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नसुन फक्त दोन निविदा धारकांनी निविदा दाखल केलेल्या असून त्यांनीच महानगरपालिकेकडुनच रकमेची मागणी केलेली होती. २० द.ल.ली. सांडपाण्यावर पूर्नप्रक्रिया करण्याचे झोन क्र.६ सी व ८ मध्ये प्रस्तावित असून त्याची वितरण व्यवस्था व टँकर फिडर पॉईंट झोन क्र. ५,६ सी व ८ मध्ये प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक योजनेचे सल्लागार मे. टंडन अँन्ड असोसिएट्स यांनी तयार केले असून त्याचा अंदाजित खर्च रु.२३.७७ कोटी इतका होत आहे. तसेच हा प्रकल्प राबविणेसाठी खाजगी लोकसहभाग निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्पाची निविदा ईपीसी तत्वावर मागविण्याची शिफारस योजनेचे सल्लागार यांनी केलेली आहे. सबब सदर कामाची निविदा काढणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ''क'' मध्ये आर्थिक व प्रशासकीय मान्यता होईल का? सचिव साहेब, आपण एकदा नाही चारदा आम्हाला सांगितलेले आहे की, ''क'' मध्ये आर्थिक व प्रशासकीय मान्यता होत नाही. आर्थिक विषयाला मा. आयुक्त साहेबांनी रितसर गोषवारा दिला पाहिजे. त्याला मान्यता घ्या आम्ही कुठे नाही बोलतो. सचिव साहेब, ''क'' खाली आर्थिक विषय होऊ शकत नाही.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, जब इन्होंने विषय दिया तब आपको लेना चाहिए। नही तो अगली मिटींग मे लेना चाहीए।

**प्रभात पाटील :-**

''क'' खाली अजून एक विषय आहे. पहिल्या प्रस्तावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहरासाठी भुयारी गटार मंजुर योजनेमध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर करण्याबाबतचा Reforms आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकाम क्षेत्रासाठी, बगीच्यासाठी तसेच रस्ते धुण्यासाठी केल्यास सध्या पिण्याचा होणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये बचत होवून पाण्याचे दुर्भिक्ष कमी होवून सर्वांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात मिळून नागरीकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यास मदत होईल.

सदर सांडपाण्याच्या पुर्नवापर उपांगाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यातील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे

अ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर गाळणी व निर्जंतुकीकरणाची पुर्नप्रक्रिया करुन उपलब्ध होणारे पाणी शुध्द स्वरुपात मिळते. सदर प्रक्रिया केलेल्या पाण्यात व शुध्द पाण्यात काहीही फरक नसतो. परंतु सदरचे पाणी केवळ बिगर घरगुती वापरासाठीच प्रस्तावित आहे.

ब) सांडपाण्याचा पुर्नवापर, बगीचा, रस्ते धुणे सार्वजनिक शौचालयासाठी व बांधकामासाठी वापर करता येईल.

सांडपाण्याचा पुर्नवापर करणे हा रिफॉर्म शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेला आहे. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करुन पुर्नवापर करण्यासाठी सदर प्रकल्प खाजगी लोकसहभागाच्या माध्यमातून राबविण्यास मा. महासभेने दि.०१/०२/२०११ रोजी ठराव क्र. ८४ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर शहराला सुर्या धरणातून १०० दलली पाणी आरक्षण मंजुर करताना पाण्याच्या पुर्नवापराची अट घालण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजने अतंर्गत सांडपाण्याचा पुर्नवापर करणे कामी सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मलनिःस्सारण केंद्रातील सांडपाण्याचा पुर्नवापर करणेचा प्रस्ताव राबविण्यात येणार असून एकूण २० टक्के पाणी पुर्नवापरासाठी प्रस्तावीत आहे. त्याबाबत खाजगी-लोकसहभागातून या प्रकल्पाची उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी संस्थांकडून संकल्पन करणे, अर्थसहाय्य करणे, बांधणे, राबविणे व हस्तांतरण करणे या तत्वावर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये सदरील योजना २५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती व चालविणेचा अंर्तभाव होता.

परंतु सदर निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नसून फक्त दोन निविदाकारांची निविदा दाखल केलेल्या असून त्यांनीच महानगरपालिकेकडूनच रकमेची मागणी केलेली होती.

२० द.ल.लि. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्याचे झोन क्र. ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित असून त्याची वितरण व्यवस्था व टँकर फिडर पॉईट झोन क्र. ५, ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक योजनेचे सल्लागार मे. टंडन ॲन्ड असोसिएट्स यांनी तयार केले असून त्याचा अंदाजित खर्च रू.२३.७७ कोटी इतका होत आहे. तसेच हा प्रकल्प राबविणेसाठी खाजगी लोकसहभाग निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्पाची निविदा EPC तत्वावर मागविण्याची शिफारस योजनेचे सल्लागार यांनी केलेली आहे. सदर कामाची निविदा काढणेस व येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, या विषयामध्ये दोन विषय आहेत. एकतर मागचा विषय रद्द करायचा आणि नविन विषयाला आर्थिक व प्रशासकीय मान्यता द्यायची हे ‘‘क’’ खाली होऊ शकत नाही हे नोंद करुन घ्यावे आणि नक्की काय ठराव केला ते आम्हाला व्यवस्थित वाचून दाखवावे. त्याला आमची सहमती नाही.

**अनिल सावंत :-**

शहराच्या हितामध्ये विकासाची कामे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

विकासाची कामे बघायला मा. महापौर साहेब सक्षम आहेत. ते विषयपटलावर विषय आणतील.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, सचिव साहेबांकडे सन्मा. नगरसेवक श्री. अनिल सावंत यांनी एक विषय दिलेला आहे. के अन्वयेच दिलेला आहे हासुद्धा विषय आपल्याकडे झालेला आहे. मी विषय एकदा वाचते.

**नरेंद्र मेहता :-**

हा तर विषय होऊ द्या. आम्ही विरोध करतो. पहिले बहुमत सिध्द करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर शहरातील भुयारी गटार योजनेतील सांडपाण्यावरील पूर्नप्रक्रिया करुन पाणी पुरवठा योजनेबाबतचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची ‘‘ड’’ मधील प्रकरण २(१) (क) अन्वये घेतलेला प्रस्ताव आहे. हा सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए. खान यांनी मांडलेला ठराव आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आमचा विरोध आहे.

**प्रशांत पालांडे :-**

याच्यापूर्वी ‘‘ज’’ किंवा ‘‘क’’ खालच्या विषयावर आर्थिक किंवा धोरणात्मक विषय कधीच घेत नाहीत. तुमचे स्वतःचे अनेक वेळा स्टेटमेंट आहे. मग आजच असे काय झाले की, तुम्ही हे विषय घेता? धोरणात्मक आणि आर्थिक बाबींशी निगडीत विषय घेऊ शकत नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

ऑडीटर साहेब, आपणही खुलासा करा.

**प्रशांत पालांडे :-**

प्रशासनाचा गोषवारा असल्याशिवाय असे निर्णय घेऊ शकत नाही.

**नगरसचिव :-**

२(के) खाली ते प्रशासनाकडील विषय आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

“ज” चा प्रस्ताव आणि “क” च्या प्रस्तावावर धोरणात्मक आणि आर्थिक बाबींशी निगडीत प्रस्ताव मंजूरीसाठी आणू शकत नाही. त्याला प्रशासनाचा गोषवारा लागतो. आपण स्वतः अनेक वेळा सांगितलेले आहे.

**नगरसचिव :-**

याच्यामध्ये जी तरतुद आहे ती मी वाचून दाखवतो. कोणत्याही सभेपूढे, वर सांगितल्याप्रमाणे कोणतेही तातडीचे कामकाज आणावयास असल्यास उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांपैकी निदान तीन चतुर्थांश पालिका सदस्यांनी, पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन चतुर्थांश पेक्षा कमी असता कामा नये. अनुमती दिली नसेल तर, असे कोणतेही कामकाज अशा सभेपुढे आणता येणार नाही. दिली तर ते कामकाज आणता येईल अशी तरतुद आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग यापुढे आर्थिक व प्रशासकीय विषय असेच येणार?

**प्रशांत पालांडे :-**

रितसर पणे आणू शकतात. मग “क” खाली आणण्याचे काय कारण आहे?

**अनिल सावंत :-**

स्टँडींग कमिटी फॉम झालेली नाही. उत्तनचा रस्ता आणि शितल नगरच्या रस्त्याची फार दुर्गती आहे आणि ते होणे फार गरजेचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

रस्त्याचा काय संबंध आहे?

**अनिल सांवत :-**

तोच विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आजच गोषवारा काढा आणि परत सात दिवसांनी मिटींग लावा आम्ही पत्र देतो, तीन दिवसांत स्पेशल मिटींग लावा. प्रशासनाने आपली रितसर भुमिका मांडली पाहिजे की पैसे आहेत की नाहीत. तरतुद आहे की नाही, इकडे गोषवारा नाही, अभ्यास नाही, उगाच मंजूर करायचे का? सचिव साहेब बहुमत सिध्द करा.

**नगरसचिव :-**

पहिल्या प्रस्तावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहरासाठी भुयारी गटार मंजुर योजनेमध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर करण्याबाबतचा Reforms आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकाम क्षेत्रासाठी, बगीच्यासाठी तसेच रस्ते धुण्यासाठी केल्यास सध्या पिण्याचा होणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये बचत होवून पाण्याचे दुर्भिक्ष कमी होवून सर्वांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात मिळून नागरीकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यास मदत होईल.

सदर सांडपाण्याच्या पुर्नवापर उपांगाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यातील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे

अ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर गाळणी व निर्जंतुकीकरणाची पुर्नप्रक्रिया करुन उपलब्ध होणारे पाणी शुध्द स्वरुपात मिळते. सदर प्रक्रिया केलेल्या पाण्यात व शुध्द पाण्यात काहीही फरक नसतो. परंतु सदरचे पाणी केवळ बिगर घरगुती वापरासाठीच प्रस्तावित आहे.

ब) सांडपाण्याचा पुर्नवापर, बगीचा, रस्ते धुणे सार्वजनिक शौचालयासाठी व बांधकामासाठी वापर करता येईल.

सांडपाण्याचा पुर्नवापर करणे हा रिफॉर्म शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेला आहे. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करुन पुर्नवापर करण्यासाठी सदर प्रकल्प खाजगी लोकसहभागाच्या माध्यमातून राबविण्यास मा. महासभेने दि.०१/०२/२०११ रोजी ठराव क्र. ८४ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर शहराला सुर्या धरणातून १०० दलली पाणी आरक्षण मंजुर करताना पाण्याच्या पुर्नवापराची अट घालण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजने अतंर्गत सांडपाण्याचा पुर्नवापर करणे कामी सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मलनिःस्सारण केंद्रातील सांडपाण्याचा पुर्नवापर करणेचा प्रस्ताव राबविण्यात येणार असून एकूण २० टक्के पाणी पुर्नवापरासाठी प्रस्तावीत आहे. त्याबाबत खाजगी-लोकसहभागातून या प्रकल्पाची उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी संस्थांकडून संकल्पन करणे, अर्थसहाय्य करणे, बांधणे, राबविणे व हस्तांतरण करणे या तत्वावर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये सदरील योजना २५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती व चालविणेचा अंर्तभाव होता.

परंतु सदर निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नसून फक्त दोन निविदाकारांची निविदा दाखल केलेल्या असून त्यांनीच महानगरपालिकेकडूनच रकमेची मागणी केलेली होती.

२० द.ल.लि. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्याचे झोन क्र. ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित असून त्याची वितरण व्यवस्था व टँकर फिडर पॉईट झोन क्र. ५, ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक योजनेचे सल्लागार मे. टंडन अॅन्ड असोसिएट्स यांनी तयार केले असून त्याचा अंदाजित खर्च रू.२३.७७ कोटी इतका होत आहे. तसेच हा प्रकल्प राबविणेसाठी खाजगी लोकसहभाग निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्पाची

निविदा EPC तत्वावर मागविण्याची शिफारस योजनेचे सल्लागार यांनी केलेली आहे. सदर कामाची निविदा काढणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए. खान हा २(क) खाली जो प्रस्ताव आहे या प्रस्तावाच्या बाजूने कोण आहेत?

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता मला जी माहिती दिली म्हणजे ते टेंडर ऑलरेडी कॉल झालेले आहे? मा. स्थायी समिती गठित नाही म्हणून त्याला मान्यता द्यायची असे आहे का? जर टेंडर झालेले आहे आणि स्टँडींग गठित नाही म्हणून त्याला मान्यता पाहिजे असेल तर आमची त्याला हरकत नाही. बाकी जे विषय आहेत त्यासाठी आपल्या बजेट प्रोव्हीजन आहे की नाही?

**नगरसचिव :-**

या प्रस्तावाच्या बाजूने कोण आहेत?

**प्रशांत पालांडे :-**

कोणता विषय आहे?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, क्लीअर करावे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये दोन विषय आहेत. एक विषय आहे की, आम्ही तीन रस्त्यांचे टेंडर काढले होते. त्याच्यामध्ये उत्तन पाली रस्ता आहे, शांतीनगरचा रोड आहे अजून सिनेमॅक्स जवळचा रोड आहे, अशा तीन रोडचे टेंडर आम्ही काढले होते ते टेंडर कॉल करुन बीड अमाऊंट आलेली आहे. ती बीड अमाऊंट फायनल करायची आहे पण सध्या स्टँडींग कमिटी अस्तित्वात नाही. त्यामुळे ते तसेच ठेवावे लागते असे नियम आहेत. म्हणून हा विषय येथे ठेवलेला आहे. दुसरा विषय आहे, भुयारी गटारातून जे पाणी एस.टी.पी.तून डिस्पॅच होणार आहे. त्याचे रिसायकलींग करुन लोकांनी परत वापरले पाहिजे. यासाठी आपल्याकडुन टेंडर काढण्याची परवानगी पाहिजे. असे दोन विषय आहेत. आपल्याला ज्याला मान्यता द्यायची आहे त्याला मान्यता द्यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, स्टँडींग गठीत नाही म्हणून जे काम अडकले असेल त्याला आम्ही विरोध करण्याचे कारण नाही. आम्ही प्रशासनाची भुमिका यासाठी विचारली की, आपल्याला नक्की माहिती आहे की, लोएस्ट कोण आहे? सभागृहाला काही माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला सगळी माहिती देऊ. लोएस्ट कोणते आहे, किती टक्के कमी आहे सगळी माहिती आपल्याला देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

त्याचेच असेल आणि त्याचा ठराव असेल तर आमचा काही विरोध नाही.

**मा. महापौर :-**

"क" खाली जे दोन विषय होते ते मंजूर झालेले आहेत.

**प्रकरण क्र. ७९ :-**

के अन्वये प्रस्ताव – मिरा भाईंदर शहरातील भुयार गटार योजनेतील सांडपाण्यावरील पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत.

**ठराव क्र. ८० :-**

मिरा भाईंदर शहरासाठी भुयारी गटार मंजुर योजनेमध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर करण्याबाबतचा Reforms आहे.

सांडपाण्याचा पुर्नवापर बांधकाम क्षेत्रासाठी, बगीच्यासाठी तसेच रस्ते धुण्यासाठी केल्यास सध्या पिण्याचा होणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये बचत होवून पाण्याचे दुर्भिक्ष कमी होवून सर्वांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात मिळून नागरीकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यास मदत होईल.

सदर सांडपाण्याच्या पुर्नवापर उपांगाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यातील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे

अ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर गाळणी व निर्जंतुकीकरणाची पुर्नप्रक्रिया करुन उपलब्ध होणारे पाणी शुध्द स्वरुपात मिळते. सदर प्रक्रिया केलेल्या पाण्यात व शुध्द पाण्यात काहीही फरक नसतो. परंतु सदरचे पाणी केवळ बिगर घरगुती वापरासाठीच प्रस्तावित आहे.

ब) सांडपाण्याचा पुर्नवापर, बगीचा, रस्ते धुणे सार्वजनिक शौचालयासाठी व बांधकामासाठी वापर करता येईल.

सांडपाण्याचा पुर्नवापर करणे हा रिफॉर्म शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेला आहे. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करुन पुर्नवापर करण्यासाठी सदर प्रकल्प खाजगी लोकसहभागाच्या माध्यमातून राबविण्यास मा. महासभेने दि.०१/०२/२०११ रोजी ठराव क्र. ८४ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर शहराला सुर्या धरणातून १०० दलली पाणी आरक्षण मंजुर करताना पाण्याच्या पुर्नवापराची अट घालण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजने अतंर्गत सांडपाण्याचा पुर्नवापर करणे कामी सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मलनिःस्सारण केंद्रातील सांडपाण्याचा पुर्नवापर करणेचा प्रस्ताव राबविण्यात येणार असून एकूण २० टक्के पाणी पुर्नवापरासाठी प्रस्तावीत आहे. त्याबाबत खाजगी-लोकसहभागातून या प्रकल्पाची उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी संस्थांकडून संकल्पन करणे, अर्थसहाय्य करणे, बांधणे, राबविणे व हस्तांतरण करणे या तत्वावर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये सदरील योजना २५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती व चालविणेचा अंर्तभाव होता.

परंतु सदर निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नसून फक्त दोन निविदाकारांची निविदा दाखल केलेल्या असून त्यांनीच महानगरपालिकेकडूनच रकमेची मागणी केलेली होती.
२० द.ल.लि. सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्याचे झोन क्र. ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित असून त्याची वितरण व्यवस्था व टँकर फिडर पॉईट झोन क्र. ५, ६ सी व ८ मध्ये प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक योजनेचे सल्लागार मे. टंडन ॲन्ड असोसिएट्स यांनी तयार केले असून त्याचा अंदाजित खर्च रू.२३.७७ कोटी इतका होत आहे. तसेच हा प्रकल्प राबविणेसाठी खाजगी लोकसहभाग निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्पाची निविदा EPC तत्वावर मागविण्याची शिफारस योजनेचे सल्लागार यांनी केलेली आहे. सदर कामाची निविदा काढणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ८० :-**

के अन्वये प्रस्ताव – निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती अस्तित्वात नाही. राज्य शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात केलेल्या दुरूस्तीनुसार कलम ३५ अ मध्ये कोणतीही समिती किंवा विशेष समिती कोणत्याही वेळी गठीत केली नसेल तर अशी समिती गठीत करण्यात येईपर्यत महानगरपालिका समितीच्या अधिकाराचा वापर करील अशी तरतूद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने व शहरातील खालील नमुद कामाच्या निविदा तातडीने मंजूर होउुन कामे सुरू होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | उत्तन पाली रस्त्यामधील नादुरुस्त झालेल्या भागाचे पुर्नपृष्ठीकरण करणे.<br>**1´ मे. जेकिन इंटरप्रायजेस**<br>२) मे. पी.ई. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि.<br>३) मे. श्री.जी. कंन्स्ट्रक्शन<br>४) गजानन कंन्स्ट्रक्शन<br>५) आर.ॲन्ड बी. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | रू. ५०,००,०००/-<br>**13.32 ‰ कमी दराने**<br>12.21 ‰ कमी दराने<br>11.1 ‰ कमी दराने<br>2.00 ‰ कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दराने |

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत फुटपाथ / गटारे / नाले यावर झाकणे बसविणे. रू. ५०,००,०००/- | | | | |
| **Sr. NO.** | **DESCRIPTION** | **PER** | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | मे. ए. पी. आय. कंन्स्ट्रक्शन | मे. माऊट इन्फ्रा प्रोजेक्ट |
| | | | **RATE** | **RATE** | **RATE** |
| **a)** | **ITEM NO. 1**<br>**Providing and Fixing M – 30 grade of RCC Concrete Covers on Gutter / Nalla / Footpath of following Various Sizes for pedestrian as per drawing and required specification etc. Complete in MBMC Area.**<br>Mainly Sizes as Follows. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (0.60M x 0.60 M, 0.75M x 0.75 M, 0.60Mx 0.75M, 0.75M x 0.90 M, 0.90M x 0.90 M etc.)<br><br>A) RCC Concrete Cover (for pedestrian Use ) | SMT | 2095 | 25000 | 1206 |
| **b)** | **ITEM NO. 2**<br>**Providing and Fixing M – 30 grade of RCC Concrete Covers on Main Road of following Various Sizes as per drawing and required specification etc. Complete in MBMC Area.**<br>Mainly Sizes as Follows.<br>(0.60M x 0.60 M, 0.75M x 0.75 M, 0.60Mx 0.75M, 0.75M x 0.90 M, 0.90M x 0.90 M etc.)<br>A) RCC Concrete Cover (for Main Road Use ) | SMT | 5900 | 34000 | 2421 |
| **3.** | **ITEM NO. 3**<br>**Providing and Fixing structural steel work in trusses, other similar trussed purlins and members with all bracing, gusset plates etc. as per detailed design and drawings or as directed by Engineer – In – Charge., including cutting, fabricating, hoisting, erecting fixing in position, making riveted / bolted / welded connection and one coat of anticorrosive paint and over it two coats of oil painting of approved quality and shade complete.** | Kg | 65 | 191 | 97.21 |

| | | |
|---|---|---|
| ३ | मिरारोड (पुर्व) शितलनगर रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकीरण करणे.<br><br>**१) मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट.प्रा.लि.**<br>२) मे. जेकिन इंटरप्रायजेस<br>३) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>४) मे. पी.ई. इन्फ्रास्ट्रक्चर्स डेव्हलपर्स प्रा.लि. | रू. ६८,४८,३००/-<br><br><br>**१८.०० % कमी दराने**<br>१६.२ % कमी दराने<br>१४.०० % कमी दराने<br>१२.११ % कमी दराने |
| ४ | मिरारोड (पुर्व) सिनेमॅक्स ते रामदेव पार्क कडे जाणारा रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकीरण करणे.<br>**१) मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट.प्रा.लि.**<br>२) मे. जेकिन इंटरप्रायजेस<br>३) मे. पी.ई. इन्फ्रास्ट्रक्चर्स डेव्हलपर्स प्रा.लि.<br>४) मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन | रू. ७२,१६,९००/-<br><br>**१८.०० % कमी दराने**<br>१६.२ % कमी दराने<br>१२.११ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने |
| ५ | घोडबंदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते सी. एम.आय. कंपनी पर्यंत मजबुतीकरण करुन डांबरीकीरण करणे.<br>**१) मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट.प्रा.लि.**<br>२) मे. जेकिन इंटरप्रायजेस<br>३) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रू. ६४,५१,७००/-<br><br>**१८.०० % कमी दराने**<br>९.०० % कमी दराने<br>६.०० % कमी दराने |

अ.क्र. १ च्या कामाकरीता मे. जेकिन एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १३.३२ % कमी दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामाकरीता मे. माऊट इन्फ्रा प्रोजेक्ट यांची कमी दराची निविदा, अ.क्र. ३,४ व ५ करीता मे. आर ॲन्ड बी इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १८.०० % कमी दराच्या निविदा हया वाजवी असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभात पाटील :-**

सन्मा. नगरसेवक श्री. अनिल सावंत यांनी पत्र दिले आहे आणि २(क) खाली हा प्रस्ताव घेण्याबाबत लिहिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, मिरा भाईंदर शहरात पाण्याच्या प्रश्नाचे आज भयानक स्वरुप धारण केलेले आहे.

शहरामध्ये पाणीपुरवठा ४५ ते ४८ तासांवर गेलेला आहे. त्यानंतर सुध्दा नागरीकांना २० ते २५ मिनीटे पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थितीत स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्टक्चर कं.प्रा.लि. कडून दररोज ८६ दललि व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून २० दललि (मंजूर कोटा ३० दललि) असा एकूण दररोज १०६ दललि पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदरची लोकसंख्या १० लाख असून त्यांच्यासाठी हा पाणीपुरवठा अत्यल्प आहे. अशीच परिस्थीती राहीली तर या शहरामध्ये पाण्यासाठी केव्हाही जनआंदोलन होवू शकते. सुर्या धरण उद्‌भव धरुन खाजगी लोक सहभागावर आधारीत (पीपीपी) तत्वावर सुर्या धरणातून पाणीपूरवठा योजना तयार करण्यात आलेली आहे. परंतु सदर योजना पूर्ण होण्यासाठी किमान ५ ते ६ वर्षाचा कालावधी लागणार आहे. शहरामध्ये विविध गृहनिर्माण योजना उदा.म्हाडा २.५ एफ.एस.आय. एमएमआरडीए भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना व इतर योजना येऊ घातलेल्या आहेत त्यामुळे येणाऱ्या वर्षात शहरातील लोकसंख्या जवळपास २ लाखाने वाढणार आहेत. अशा परिस्थितीत शहरासाठी त्वरीत अतिरिक्त पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेने नवी मुंबई महानगरपालिकेच्या पत्र जा.क्र.नमुंमपा/शअ/काअ (गो/नि)/९९२/२००५ दि.०९/०६/२००५ च्या अनुषंगाने मोरवे धरणातून १०० दशलक्ष पाणी उपलब्ध होण्यासाठी मा.महासभेमध्ये दि.२०/१०/२००५ रोजी ठराव क्र. १७ पारीत केला. या प्रकरणी पालकमंत्री मा.ना. श्री.गणेशजी नाईक सो।. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यानंतर मिरा-भाईंदर पालिका प्रशासनाने वारंवार विनंती करुन सुध्दा नवी मुंबई महानगरपालिकेने अनुकूल प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे हे पाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मिळू शकले नाही. मा.खासदार डॉ.संजीवजी नाईक हे ठाणे लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. वारंवार मंत्रालयामध्ये होत असलेल्या बैठका व वृत्तपत्रांमध्ये येत असलेल्या बातम्या पाहता त्यांची मिरा भाईंदर शहराला पाणीपुरवठा करण्यासंबंधी असलेली तळमळ दिसून येते. त्यांनी पुढाकार घेतल्यास या शहराला मोरवे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळू शकते. नवी मुंबई महानगरपालिकेजवळ मोरवे धरणातून अतिरीक्त पाणी उपलब्ध आहे. नवी मुंबई महानगरपालिका बारवे धरणातून एम.आय.डी.सी. जवळून प्रतिदीन ९५ दललि पाणी उचलत आहे. ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मोरवे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळण्यासाठी कार्यवाही करणे गरजेचे आहे. तरी या ज्वलंत प्रश्नावर चर्चा होण्यासाठी व कार्यवाहीसाठी हा विषय मा. महासभेमध्ये घेण्यात यावा ही विनंती. मला असे वाटते या संदर्भामध्ये मी एका पत्राचा उल्लेख करते की, या संदर्भात मिरा भाईंदर महापालिकेला मोरबे धरणातून पाणी उपलब्ध करण्यासंदर्भात आपण २००५ ला ठराव केला होता आणि ०६/०६/२००५ ला मा. आयुक्तांनी नवी मुंबईला एक पत्र दिले होते. त्या अनुषंगाने एक पत्र प्राप्त झाले आहे. नवी मुंबई महापालिकेचे हे पत्र आहे त्यांनी म्हटले आहे की, नवी मुंबई मालकीच्या मोरबे धरणामध्ये नवी मुंबई मनपाच्या मागणीपेक्षा जास्त पाणी पुरवठा असून सुमारे १०० द.ल.लि. पाणी पुरवठा उपलब्ध करुन देऊ शकतो. आपल्या पत्राच्या अनुषंगाने आपल्यासाठी मोरबे धरणातील १०० द.ल.लि. पाणी आरक्षित करण्यासाठीच्या प्रस्तावाचा यथायोग्य विचार करुन तो निर्णय आपणांस लवकरच कळविण्यात येईल असे त्यांचे ०९/०६/२००५ चे पत्र आहे. त्याच्यानंतर आपल्या महापालिकेने त्यासंदर्भात त्यांच्याशी काय पाठपुरावा केला आहे? हे प्रकरण कुठपर्यंत गेले? कुठे अडकले? त्याची माहिती आपल्यापर्यंत पोहोचली नाही आणि याच्यावर तुम्हाला सांगते की, हे पत्र मिळाले त्यावेळी मा. आयुक्त श्री. रतन शिंदे होते आणि पत्रावर त्यांची १५/०६/२००५ ची सही आहे. त्याच्यापुढे सहानंतर आज अकरा झाले. मग आपल्या प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली आणि हे प्रकरण कुठे अडकले? जर ते म्हणतात की, आम्ही करुन देऊ शकतो. तर मग हे का झाले नाही? आपले पत्र आहे श्री. रतन शिंदे यांचे याच्यावर नाव आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर साहेबांच्या परवागीने बोलतो. मोरबे धरणातून अतिरीक्त १०० एमएलडी पाणी आहे. नवी मुंबईकडुन पत्र आल्यानंतर मा. महासभेपुढे विषय ठेवला होता. मा. महासभेने एकमताने ठराव पास करुन त्यानंतर प्रशासनाने नवी मुंबई महानगरपालिकेकडे विनंती केली होती की, १०० एमएलडी पाणी देण्यात यावे. याबाबत तेथील अधिकारी, इंजिनिअरींग सेक्शन आणि मा. आयुक्त लेव्हलला सात आठ बैठका झाल्या श्री. गायकवाड साहेब मा. आयुक्त होते त्यावेळेपासुन बैठका झाल्या तिथले श्री. डगावकर साहेब सिटी इंजिनिअर होते. टेक्नीकल लोकांबरोबर चर्चा झाली होती. पाणी कुठून घ्यायचे, पाण्याचा दर काय असावा, पाणी किती काळासाठी उपलब्ध होऊ शकेल याबाबत सविस्तर चर्चा झाली होती. आपल्याकडुनपण चर्चा झाली होती त्यांनीही बोलावले होते. परंतु, त्याबाबत अंतिम निर्णय हा नवी मुंबईने घ्यायचा आहे. त्याबाबत आपणाला नवी मुंबईकडुन अद्याप पर्यंत काही कळवलेले नाही आपण पाठपुरावा केलेला आहे, मागणी केलेली आहे. ठराव करुन पाठवलेला आहे. आपण त्यांच्याकडून पाणी मागतो आहे. त्यांनी होकार कळविल्यानंतर त्याच्या पुढची प्रोसेस करता येईल.

**भगवती शर्मा :-**

सद्यस्थितीत आम्हाला काय केले पाहिजे? २००५ ला ठराव केले. त्यानंतर २००६ ला त्यांनी पत्र दिले होते.

**एस.ए.खान :-**

नवी मुंबईलापण ठराव केला आहे ना? तुम्ही ठरावाची कॉपी दिलेली नाही. पण ठराव केलेला उल्लेख त्याच्यामध्ये आहे.

**भगवती शर्मा :-**

श्री. बारकुंड साहेब, आप जो बोल रहे हो, २००५ के ठराव के बाद २००६ मे लेटर आया है की, हम पानी देने के लिए तैयार है।

**एस.ए.खान :-**

त्यांचापण ठराव झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

श्री. बारकुंड साहेब, मला सांगा नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी आणि तुमची शेवटची जॉईंट मिटींग कधी झाली?

**शिवाजी बारकुंड :-**

तीन वर्षे झाली.

**अनिल सावंत :-**

तीन वर्षे झाली तर ही बाब त्यावेळी आपली जी जनरल बॉडी होती, त्यांच्या निदर्शनास आणली होती का? कारण जनरल बॉडीच्या ठरावावर कार्यवाही करत होते.

**शिवाजी बारकुंड :-**

ही बाब प्रशासकीय पातळीवर मा. तत्कालीन आयुक्त साहेब आणि आम्ही स्वतः नवी मुंबईचे मा. आयुक्त आणि तिथल्या टेक्नीकल स्टाफबरोबर वारंवार बैठका झालेल्या आणि जोपर्यंत ठोस निर्णय घेत नाही, तोपर्यंत आम्ही मा. महासभेपुढे काय सांगणार?

**अनिल सावंत :-**

ठोस निर्णय म्हणजे, तीन वर्षापूर्वी तुमची शेवटची बैठक झाली आणि तुम्ही तो विषय सोडुन दिला.

**एस.ए.खान :-**

हे काम प्रशासकीय स्तरावर होत होते का?

**शिवाजी बारकुंड :-**

प्रशासकीय स्तरावरील ज्या बाबी करायच्या असतात त्याचा पाठपुरावा मिरा भाईंदरने केलेला आहे. काही गोष्टीबाबत मला हे बोलायचे नाही परंतु काही गोष्टी............

**एस.ए.खान :-**

काय असेल ते बोला म्हणजे आम्हाला माहिती पडेल. आम्ही सगळे जाऊन चौकशी करुन आलेले आहोत. जे काही असेल ते सगळे इथे सांगा. यापुढे आम्हाला काहीतरी निर्णय करता येईल.

**शिवाजी बारकुंड :-**

प्रशासकीय पातळीवर जे करायचे होते, जी माहिती पाहिजे होती, ज्या बैठका पाहिजे होत्या त्या सगळ्या झालेल्या आहेत. अंतिमतः नवी मुंबईकडुन होकार आल्याशिवाय आपण पुढे काही करु शकत नाही.

**एस.ए.खान :-**

त्यांनी ठराव केला आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. आयुक्त साहेब, ज्यावेळेला त्या महापालिकेचे लेटर आलेले आहे आणि ते काम कशामुळे अडले किंवा काय याची माहिती तुम्ही मा. महासभेला दिलेली नाही. आम्हाला माहिती कसे पडणार की, हे काम कशामुळे अडलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ते जे पत्र आहे, ते पत्र त्यांच्याकडुन पाणी उपलब्ध आहे. त्यानंतर आपला मा. महासभेचा ठराव मान्य झाला. ते पत्र आल्यानंतर मा. महासभेपुढे विषय ठेवला. मा. महासभेने एकमताने मान्यता दिली. त्या ठरावाच्या अनुषंगाने मा. आयुक्तांकडुन आपण नवी मुंबईच्या मा. आयुक्तांना पत्रव्यवहार केला आणि प्रशासकीय पातळीवर या सगळ्या चर्चा चालू होत्या त्यावेळेस पाणी कुठून घ्यायचे, पाण्याचा दर काय राहील, पाणी किती वर्षासाठी उपलब्ध राहील या सगळ्या चर्चा, मी प्रत्येक चर्चेला उपस्थित आहे आणि अंतिमतः त्यांनी होकार किंवा नकार आपल्याला कळवायचा आहे. आम्ही पाठपुरावा करत होतो. माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्याकडुन अद्यापपर्यंत काही आलेले नाही. आणि माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्याकडे सुद्धा त्यांच्या मा. महासभेत भाईंदरला पाणी देण्याबाबतचा ठराव पारित झालेला नाही.

**राजेंद्र जैन :-**

श्री. बारकुंड साहेब, तीन साल पहले आपका और उनका मिटींग हुआ। उसके बाद उन्होंने आपको फायनल ना किया था क्या? उसके बाद आपने क्या किया?

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही प्रयत्न करत होतो.

**राजेंद्र जैन :-**

आपकी तीन साल पहले मिटींग कौनसे डेटपर हुई थी?

**शिवाजी बारकुंड :-**

डेट अब याद नही है।

**राजेंद्र जैन :-**

उसके अंदर आपको फायनल ना कर दिया था?

**शिवाजी बारकुंड :-**

मी तुम्हाला वारंवार सांगतो, मिटींग वारंवार झाल्या आहेत. परंतु त्यांच्याकडे अंतिम यस किंवा नो हे काहीच कळविण्यात आलेले नाही.

**राजेंद्र जैन :-**

उसके बाद आपने क्या किया? मा. महापौर साहेब, मुझे इस बात का जवाब दिजिए कि, तीन साल पहले की लास्ट मिटींग का डेटा इनके पास है। उसमे इनको फायनल हा या ना नही आया। उसके बाद इन्होंने क्या किया?

**लक्ष्मण जंगम :-**

आज आपल्या मा. महासभेमध्ये ठराव काय करायचा ते आपण सदस्य फायनल करतो आहे. त्यांनी सांगितले की, इथून ठराव करुन तो पत्रव्यवहार नवी मुंबईला केला. त्यांनी त्यांच्या सभागृहामध्ये ठराव केला नाही, त्यासाठी अधिकारी काय करु शकतात? तुम्ही प्रथम समजून घ्या की, त्यांनी त्यांचे जे काम करायचे ते केले. त्यांच्या मा. महासभेमध्ये जाऊन अधिकारी ठराव करु शकतात का? ते सतत रोज जाऊन तिथे बसले, पण तो त्यांचा विषय नाही.

**राजेंद्र जैन :-**

विषय यह नही है। तीन साल से आपने क्या कोशिश किया, यह बात चल रही है।

**लक्ष्मण जंगम :-**

अब आप लोग ऐसा करो, वहा के लोकप्रतिनिधी और अपने यहा के लोग मिलकर चर्चा करेंगे तो ठराव होगा। तुम्ही निव्वळ अधिकाऱ्यांना बोलत बसलात तर त्याच्यातून काय होणार आहे?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, श्री. शिवाजी बारकुंड साहेब आता सिटी इंजिनिअर आहेत. पाणी पुरवठाचे डिपार्टमेंट आज त्यांच्याजवळ १५ ते २० वर्षे आहे असे मला वाटते. या शहरामधील पाण्याची समस्या किती बिकट आहे, कुठूनही पाणी येण्याचा सोर्स नाही. एम.आय.डी.सी. चे ३० एम.एल.डी. पाणी सॅक्शन झाले ते २० एम.एल.डी. पर्यंतच आपल्याला येते, हे त्यांना माहिती आहे. नवी मुंबईचे लोकप्रतिनिधी, मा. पालकमंत्री श्री. गणेशजी नाईक हे पाणी द्यायला ॲग्री झाले. त्यांचे आपल्याला पत्र येते आहे. आता मा. खासदार श्री. संजीवजी नाईक आहेत, त्यांनी सुध्दा तयारी दर्शविली की, आम्ही तुम्हाला पाणी द्यायला तयार आहोत. मा. महासभेचा ठराव २००५ ला होतो, आणि त्यानंतर फक्त बैठका घेतात. महापालिकेच्या ठरावावर ते कार्यवाही करत होते. तीन वर्षापूर्वी त्यांची शेवटची बैठक झाली. मग हे त्यांनी मा. महासभेमध्ये महापालिकेच्या निदर्शनास आणले का? आज परिस्थिती अशी आहे की, शहरामध्ये पाण्यासाठी केव्हाही दंगे होऊ शकतात. ५० तासावर पाणी पुरवठा गेलेला आहे. आणि जिथून पाणी येण्याची शक्यता होती, तिथून पाण्याचे काहीच प्रोसेसिंग केलेले नाही. त्यांनी सांगितले की, तुम्हाला आम्ही देत नाही? ते द्यायला तयार आहेत. मा. खासदार श्री. संजीवजी नाईक यांचा हा मतदार संघ आहे आणि त्यांनी कालपण सांगितले की, आम्ही द्यायला तयार आहोत. पण तुम्ही त्याच्यावर कार्यवाही न करता, फक्त आम्ही तीन वर्षापूर्वी शेवटची बैठक घेतली आणि बस झाले? तुमची जबाबदारी संपली? मिरा भाईंदरला पाणी आले?

**शिवाजी बारकुंड :-**

त्यानंतरच मा. महासभेने, हे येत नाही याचा विचार सभागृहाने करुन सूर्या धरणामधून २०० एम.एल.डी. ला मान्यता दिली.

**अनिल सावंत :-**

तो विचार झालेला नाही. काहीतरी खोटी माहिती सांगू नका.

**एस.ए.खान :-**

बरोबर माहिती दिलेली नाही म्हणून सूर्या धरणाचे झाले आणि मा. आयुक्त साहेबांनी पण सांगितले की, ते चुकीचे झालेले आहे. पी.पी.पी. तत्वावर ते चुकीचे झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

आम्हाला लोकांना जवाब द्यावे लागतात. तुम्हाला फरक पडत नाही. जिथून येणारे पाणी होते, त्याच्यासाठी काही केले नाही. आणि सांगता की, तो ठराव झाला होता. तो ठराव झाला, तुम्हाला पण माहिती आहे की, पाणी यायला पाच वर्षे लागणार आहेत. तुम्हाला माहिती आहे की नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

ते माहिती आहे. परंतु मोरबे धरणातून पाणी आणण्यासाठी जे प्रयत्न करायचे होते.......

**अनिल सावंत :-**

तुम्ही काय प्रयत्न केले ते सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

प्रयत्न केले म्हणजे, दहा वेळा तरी बैठका झाल्या.

**अनिल सावंत :-**

तुम्ही सभागृहाच्या निदर्शनास आणले का की, ही अडचण आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आम्ही सर्वजण काम करतो.

**प्रभात पाटील :-**

पण प्रशासनाला आम्हाला सांगणे पण तुमचे काम होते.

**शिवाजी बारकुंड :-**

ही सर्व वस्तुस्थिती सर्वांना माहिती होती.

**दिनेश नलावडे :-**

मा. पालकमंत्री आमचे आहेत. तुमची जर ही समस्या मा. महासभेला सांगितली असती तर आम्ही आमच्या लेव्हलवर जाऊन त्यांच्याशी चर्चा करुन हा प्रश्न मिटवला असता. तुम्ही हे आमच्याशी का लपवले?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, तीन वर्षानंतर जो पाठपुरावा हवा होता, तो संबंधित महापालिकेला आणि मला असे वाटते की, या जिल्ह्याचे मा. पालकमंत्री आणि आपले मा. खासदार यांनासुध्दा झालेला नाही. श्री. अनिल सावंत यांनी आजचा विषय आणण्यामागची कल्पना हीच आहे असे मला वाटते. आज आमचे श्री. नरेंद्र मेहता हा प्रश्न व्यवस्थित ऐकत आहेत. आपल्या बरोबर आहेत असे मी गृहित धरते. कारण त्यांनी या विषयाला विरोधही केलेला नाही. म्हणून ते पाणी प्रश्नावर आपल्या बरोबर राहतील असा माझा अंदाज आहे. माझा पक्का विचार आहे. मला एवढेच म्हणायचे आहे की, हा विषय आणण्यामागचा हेतू असाच आहे की, वाहून गेली ती गंगा आणि राहिले ते तिर्थ, अजूनही हा प्रश्न आपल्या हातात आहे. आपले एम.पी. आहेत. सांसद आपले आहेत, मा. पालकमंत्री आपले आहेत. आपल्या शहराला मा. आमदार आहेत. माजी आमदार आहेत. तुम्ही मा. महापौर आहात, मा. उपमहापौर आहेत, सगळे जनप्रतिनिधी आपल्या बरोबर आहेत. अशावेळी हा जो तीन वर्षांपूर्वी थांबलेला प्रश्न आहे, हा प्रश्न आपण आजपासून मार्गी लागायचा असा ठराव करुन उद्यापासून आपल्याला त्याची काय प्रोसीजर करता येईल, ह्या कामासाठी लागण्यासाठी मी श्री. भगवती शर्मा यांना सुध्दा सांगेन की, मा. पालकमंत्री, मा. आमदार, सांसद हे सगळे तुमच्या पक्षाचे आहेत. आम्ही तुमच्या बरोबर आहोत आणि आपण सगळयांनी मिळून, श्री. नरेंद्र मेहता आणि इतर पक्षीयसुध्दा आमच्याबरोबर या प्रवाहात सामील होतील आणि आपण उद्यापासून या कामाला लागूया असा प्रयत्न आज आपण करु.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, या विषयाची आपल्याला थोडी माहिती देतो की, हा विषय खरोखर का थांबला आणि आज परत का आला? २००५ ला ज्यावेळी विषय आला, त्यावेळी माझे समर्थन काँग्रेसला होते. मी त्याच पक्षाबरोबर होतो. त्याला एकतर समर्थन होते. मा. पालकमंत्री ज्यावेळी जनता दरबार घ्यायचे, अनेक पक्षांनी त्यांच्याकडे हा प्रश्न मांडला की, पाण्याची अत्यंत समस्या आहे. त्यांनी आपल्याला शब्द दिला की, आपण पत्र पाठवा आणि एक ठराव आम्हाला पाठवा. आम्ही त्याच्यावर नक्कीच निर्णय घेऊ आणि तुम्हाला १०० एम.एल.डी. पाणी देऊ. त्याप्रकारचे एक कामकाज चालू होते. त्यामध्ये २००७ नंतर नवीन निवडणुका आल्या. जो प्रश्न होता तो तसाच राहिला. आणि डायरेक्टली-इनडायरेक्टली मा. खासदार साहेब मलाही बोलले आहेत म्हणजे याच्यात काही दुमत नाही की, श्री. मेहता साहेब, तिकडून पाणी शक्य नाही. ते का बोलले हे मला माहिती नाही. तिकडे प्रॅक्टीकली प्रॉब्लेम आहे, टेक्नीकली प्रॉब्लेम आहे, जे काही आहे. आणि आता श्री. अनिल सावंत यांनी जे सांगितले की, तीन वर्षे का माहिती पडले नाही. या ठिकाणी मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेब होते. त्यांनीही तो प्रश्न त्यावेळी सोडवला नाही. ते एम.एल.सी. होते. त्यानंतर परत ज्यावेळी मी मा. महापौर असताना श्री. अजितदादा पवार साहेबांकडे मिटींग झाली. त्यांच्याकडे पाणी खाते होते. त्यावेळी श्री. संजीव नाईक साहेब होते, मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेब होते. त्यांनी सर्वांनी एकच सांगितले की, त्यांना कुठूनही पाणी मिळत नाही. आता नवीन पाणी सोर्स द्या. म्हणजे सगळेजण मेंटली प्रीपेअर होते की, आपल्याला आता मोरबे धरणातून पाणी मिळणार नाहीच आहे. आणि नवीन सोर्स कुठला, तर त्यांनी आपल्याला सुर्या धरणाचाही सोर्सचे कमिटमेंट केलेले की, आम्ही या धरणातून पाणी देऊ. त्याच्यामागे कोणीही लागले नाही. मग कोणीही लोकप्रतिनिधी असू द्या. काँग्रेस असू द्या, बी.जे.पी. असू द्या, राष्ट्रवादी असू द्या, कोणीही असू द्या. कोणीही त्याला पाठपुरावा केला नाही आणि सर्वांना हे मेंटली प्रीपेअर होते की, आपल्याला तिकडे पाणी मिळणार नाही. आणि आज जो प्रश्न इकडे आणला, सत्ता आपली, मा. आमदार आपले, मा. खासदार आपले. तुम्ही त्यांच्याशी चर्चा केली असती की, नक्की काय अडकलेले आहे, हा प्रस्ताव आणायचा? याच्यावर निर्णय झालेला आहे. परत काय निर्णय करायचा आहे? एक निर्णय ऑलरेडी झालेला आहे. त्यांनी आपल्याला स्पष्ट सांगावे. मा. पालकमंत्री साहेब दर महिन्याला इकडे येतात. त्यांना आपण सर्वजण, आम्ही सोबत येऊ, विचारु की, आपण एक कमिटमेंट केले होते, ते पूर्ण होणार आहे की नाही? होणार नसेल तर कशाला? एका बाजूला आपण तिकडे पाणी मागतो एका बाजूला आपण हजार-पंधराशे करोड खर्च करतो आहे. म्हणजे हे घ्यायचे की, ते घ्यायचे? उद्या ते घ्यायचे म्हणून सांगितले तर त्यालाही फंडची प्रोव्हीजन करायची का? नक्की महापालिकेने काय ठरवायचे ते तरी ठरवा. एका बाजूला हजार करोड द्यायचे. दुस-या बाजूला इकडून पाणी मागायचे. पाणी आले पाहिजे. जिकडून लवकर मिळेल तिकडून पाणी आणा. मा. महापौर साहेब, माझे हेच मत आहे की, ज्यावेळेला मा. पालकमंत्री साहेब येतील. सर्व पक्ष मिळून त्यांच्याकडे जाऊ.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने आपली भूल केलेली आहे. आपण इकडे जादूगर नाही. प्रशासनाकडे त्याबाबतची कागदपत्रे होती. पत्रव्यवहार होता. आपल्याला त्यांनी काय दाखवले? त्यांची चुक झालेली आहे. हे सर्व सभागृहाला माहिती पडलेले

आहे. म्हणून त्यावेळेचे मा. आमदार होऊन गेले त्यांनाही प्रशासनाने व्यवस्थित सांगायचे असते. हे पाणी आपल्याला सहा महिन्यामध्ये मिळणार आहे. म्हणून हा प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि या प्रयत्नाला १०० % यश येईल अशी मी सभागृहाला खात्री देतो. मला दोन महिन्यानंतर प्रश्न विचारा. पाणी येणार म्हणजे येणार, याच्यात तिळमात्र शंका नाही.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही आता सांगता आणि जे भाषण करता ते आम्ही ऐकतो आणि पाणी येणारच. पण आता श्री. शिवाजी बारकुंड साहेबांनी हे सांगितले की, यांचे भाषण काय ऐकायचे आहे. आम्ही असे भाषण केले तेव्हा पाणी येणार. त्यांनी एवढया बैठकांचे आयोजन केले, पण अजूनपर्यंत पाणी आलेले नाही. त्यांनी असे का बोलले की, यांचे भाषण का ऐकायचे? त्यांना माफी मागायला सांगा.

**मा. महापौर :-**

त्यावेळेचे श्री. सुदामराव गायकवाड यांनी लोकांना भरती करायचे एकच काम केले. जेव्हा निवडणुका लागल्या तेव्हा लोकांना भरती केले. आणि ज्या मिटींग झाल्या होत्या ते यांनी सभागृहाला कळवायला पाहिजे होते. त्यांनी काही कळवलेले नाही.

**एस.ए.खान :-**

ठिक आहे. मिटींग झाल्या. पण असे बोलायची काय गरज आहे की, यांचे भाषण का ऐकायचे?

**अनिल सावंत :-**

साहेब, भाषण ऐकायचे ते बोलले का? त्यांना बोलावा. श्री. खान साहेब जे बोलले तशी कमेंट त्यांनी पास केली का?

**शिवाजी बारकुंड :-**

मी असे काही बोललो नाही. मी बोललो की, मी याच्यावर अधिक भाष्य करणार नाही. पाहिजे तर तुम्ही रेकॉर्ड काढा. माझा सभागृहाचा कधीच या पंचवीस वर्षात अवमान करण्याचा उद्देश नाही, केलेला नाही, आणि मी असे बोललेलो नाही.

**अनिल सावंत :-**

करायचा प्रयत्न पण करु नका. आम्ही हे इथे भांडतो किंवा जे भाषण करतो आहे, ते शहरातील प्रॉब्लेमसाठी आहे. मिरा-भाईंदर शहरात पाण्याच्या प्रश्नाने आज भयानक स्वरुप धारण केलेले आहे. शहरामध्ये पाणीपुरवठा ४५ ते ४८ तासांवर गेलेला आहे. त्यानंतर सुध्दा नागरीकांना २० ते २५ मिनीटे पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थितीत स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्टक्चर कं. प्रा. लि. कडून दररोज ८६ दललि व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून २० दललि (मंजुर कोटा ३० दललि) असा एकूण दररोज १०६ दललि पाणीपुरवठा होत आहे. १५ टक्के गळती पकडता शहराला जवळपास ९० दललि प्रतिदिन पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदरची लोकसंख्या १० लाख असून त्यांच्यासाठी हा पाणीपुरवठा अत्यल्प आहे. अशीच परिस्थीती राहीली तर या शहरामध्ये पाण्यासाठी केव्हांही जनआंदोलन होवू शकते. सुर्या धरण उद्‌भव धरुन खाजगी लोक सहभागावर आधारीत (पीपीपी) तत्वावर सुर्या धरणातून पाणीपुरवठा योजना तयार करण्यात आलेली आहे. परंतू सदर योजना पूर्ण होण्यासाठी किमान ५ ते ६ वर्षाचा कालावधी लागणार आहे. शहरामध्ये विविध गृहनिर्माण योजना उदा. म्हाडा २.५ एफ.एस.आय., एमएमआरडीए भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना व इतर योजना येऊ घातलेल्या आहेत त्यामुळे येणा-या वर्षात शहरातील लोकसंख्या जवळपास २ लाखाने वाढणार आहेत. अशा परिस्थीतीत शहरासाठी त्वरीत अतिरीक्त पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणे गरजेचे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने नवी मुंबई महानगरपालिकेच्या पत्र जा.क्र.नमुंमपा/शअ/काअ (गो/नि)/ ९९२/२००५ दि. ०९/०६/२००५ च्या अनुषंगाने मोरबे धरणातून १०० दशलक्ष पाणी उपलब्ध होण्यासाठी मा. महासभेमध्ये दि. २०/१०/२००५ रोजी ठराव क्र. १७ पारीत केला. या प्रकरणी पालकमंत्री मा.ना. श्री.गणेशजी नाईक साो. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यानंतर मिरा-भाईंदर पालिका प्रशासनाने वारंवार विनंती करुन सुध्दा नवी मुंबई महानगरपालिकेने अनुकूल प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे हे पाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मिळू शकले नाही. मा. खासदार डॉ. संजीवजी नाईक हे ठाणे लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. वारंवार मंत्रालयामध्ये होत असलेल्या बैठका व वृत्तपत्रांमध्ये येत असलेल्या बातम्या पाहता त्यांची मिरा भाईंदर शहराला पाणीपुरवठा करण्यासंबंधी असलेली तळमळ दिसून येते. त्यांनी पुढाकार घेतल्यास या शहराला मोरबे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळू शकते. नवी मुंबई महानगरपालिकेजवळ मोरबे धरणातून अतिरीक्त पाणी उपलब्ध आहे. नवी मुंबई महानगरपालिका बारवे धरणातून एम.आय.डी.सी. जवळून प्रतिदीन ९५ दललि पाणी उचलत आहे. ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मोरबे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळण्यासाठी कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मगाशी जे श्री. मेहता साहेब बोलले की, मा. खासदार श्री. संजीव नाईक त्यांना असे बोलले की, मोरबे धरणातून पाणी मिळणार नाही. ते धडधडीत खोटे बोलत आहेत. काल आमची मिटींग होती. श्री. संजीव नाईक साहेब

आले होते. काल त्यांनी सांगितले की, या मोरबे धरणातून १०० द.ल.ली. पाणी मिळायला तुम्हाला अडचण कुठे आहे? आम्ही तुम्हाला पाणी मिळवून देतो. श्री. संजीव नाईक साहेब तयार आहेत. मा. पालकमंत्री तयार आहेत. नवी मुंबई महानगरपालिका एकहाती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या हातात आहे. पाणी मिळायचे असेल तर तिथूनच मिळू शकते. एक वस्तुस्थिती लक्षात घ्या. मोरबे धरण पूर्ण झालेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची जी गरज आहे, ती गरज पूर्णपणे क्षमलेली आहे आणि येणाऱ्या कित्येक वर्षासाठी त्यांना मोरबे धरणातून आणखीन पाणी उपलब्ध होणार आहे. आणि त्यातून ते आपल्याला १०० एम.एल.डी. पाणी देणार आहेत. त्यानंतर आजसुध्दा नवी मुंबई महानगरपालिका एम.आय.डी.सी. कोटयातून ९५ एम.एल.डी. पाणी उचलते आहे. आपल्याला जसे २० एम.एल.डी. पाणी येते तसे नवी मुंबई महानगरपालिका आजच्या डेटला बारवी धरणातून एम.आय.डी.सी. चे, तोसुध्दा त्यांचा कोटा फ्री होणार आहे. त्यांना त्या पाण्याची गरजपण पडणार नाही. तो ९५ एम.एल.डी. चा नवी मुंबईचा कोटा जरी आपल्याला मिळाला तरी आपली गरज आज या ठिकाणी भागू शकते. सूर्या धरणाचा जो प्रकल्प आहे, तो राज्य शासनाकडे मान्यतेसाठी आहे. त्यानंतर तो प्रकल्प कधी कार्यान्वीत होणार? ७९ किलोमीटरची लाईन आहे. तो आपला एक प्रयत्न आहे. पाच सहा वर्षानंतर ते होणार आहे. पण आपल्याला एमिजिएट मोरबे धरणातून १०० एम.एल.डी. आणि एम.आय.डी.सी. कडून १०० एम.एल.डी. पाणी जर मिळाले. मा. आयुक्त साहेब गेल्या दोन दिवसामध्ये मंत्रालयामध्ये मा. खासदार श्री. संजीवजी नाईक यांच्या पुढाकाराने मा. पालकमंत्री मिटींग लावली. मा. जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे साहेबांनी मिटींग लावली. आणि ते प्रयत्न चालू आहेत. श्री. नारायण राणे यांच्याजवळ आम्ही मिटींग लावली, ते मा. उद्योगमंत्री आहेत. तेही प्रयत्न चालू आहेत आणि याच्यावर जर पॉझीटीव्ह ॲक्शन घेतली तर आपल्याला लवकरात लवकर मोरबे आणि बारवी धरणातून १००-१०० एम.एल.डी. पाणी मिळू शकते. आपण ही जरी कंडीशन टाकली की, सुर्या धरणाचा प्रकल्प होईपर्यंत आम्हाला पाणी द्या. आणि ते कार्यान्वीत करा. पाच-सहा वर्षानंतर ती योजना सुरु होईपर्यंत द्या. एवढे जरी केले आणि तो पाठपुरावा व्यवस्थित केला तर ती कार्यवाही होऊ शकते. म्हणून मी आज या मा. महासभेमध्ये प्रस्ताव मांडलेला आहे आणि ठराव मांडलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहामध्ये २००६ साली आम्ही ठराव केला. प्रशासनाने पाठपुरावा केला नाही. आपण आता प्रशासनावर आरोप ठेवता. या सभागृहामध्ये तुमची युती आहे. मा. स्थायी समितीचे चेअरमेन इकडे बसलेले आहेत. श्री. गणेश नाईक आणि मा. खासदार श्री. संजीव नाईक यांचे तुमच्यावर जास्त प्रेम दिसते.

**मा. महापौर :-**

श्री. अनिल सावंत यांनी जो ठराव मांडलेला आहे, तो ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

के अन्वये प्रस्ताव - नवी मुंबई महापालिकेने मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी मोरबे धरणातील आरक्षित केलेले १०० दललि पाणी त्वरीत मिळण्यासंबंधी कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा-भाईंदर शहरात पाण्याच्या प्रश्नाने आज भयानक स्वरुप धारण केलेले आहे. शहरामध्ये पाणीपुरवठा ४५ ते ४८ तासांवर गेलेला आहे. त्यानंतर सुध्दा नागरीकांना २० ते २५ मिनीटे पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थितीत स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्टक्चर कं. प्रा. लि. कडून दररोज ८६ दललि व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून २० दललि (मंजुर कोटा ३० दललि) असा एकूण दररोज १०६ दललि पाणीपुरवठा होत आहे. १५ टक्के गळती पकडता शहराला जवळपास ९० दललि प्रतिदिन पाणीपुरवठा होत आहे. मिरा-भाईंदरची लोकसंख्या १० लाख असून त्यांच्यासाठी हा पाणीपुरवठा अत्यल्प आहे. अशीच परिस्थीती राहीली तर या शहरामध्ये पाण्यासाठी केव्हांही जनआंदोलन होवू शकते. सुर्या धरण उद्‌भव धरुन खाजगी लोक सहभागावर आधारीत (पीपीपी) तत्वावर सुर्या धरणातून पाणीपुरवठा योजना तयार करण्यात आलेली आहे. परंतू सदर योजना पूर्ण होण्यासाठी किमान ५ ते ६ वर्षाचा कालावधी लागणार आहे. शहरामध्ये विविध गृहनिर्माण योजना उदा. म्हाडा २.५ एफ.एस.आय., एमएमआरडीए भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना व इतर योजना येऊ घातलेल्या आहेत त्यामुळे येणाऱ्या वर्षात शहरातील लोकसंख्या जवळपास २ लाखाने वाढणार आहेत. अशा परिस्थीतीत शहरासाठी त्वरीत अतिरीक्त पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणे गरजेचे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने नवी मुंबई महानगरपालिकेच्या पत्र जा.क्र.नमुंमपा/शअ/काअ (गो/नि)/ ९९२/२००५ दि. ०९/०६/२००५ च्या अनुषंगाने मोरबे धरणातून १०० दशलक्ष पाणी उपलब्ध होण्यासाठी मा. महासभेमध्ये दि. २०/१०/२००५ रोजी ठराव क्र. १७ पारीत केला. या प्रकरणी पालकमंत्री मा.ना. श्री.गणेशजी नाईक साो. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यानंतर मिरा-भाईंदर पालिका प्रशासनाने वारंवार विनंती करुन सुध्दा नवी मुंबई महानगरपालिकेने अनुकूल प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे हे पाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मिळू शकले नाही. मा. खासदार डॉ. संजीवजी नाईक हे ठाणे लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. वारंवार मंत्रालयामध्ये होत असलेल्या बैठका व वृत्तपत्रांमध्ये येत असलेल्या बातम्या पाहता त्यांची मिरा भाईंदर शहराला पाणीपुरवठा करण्यासंबंधी असलेली तळमळ दिसून येते. त्यांनी पुढाकार घेतल्यास या शहराला मोरबे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळू शकते. नवी मुंबई महानगरपालिकेजवळ मोरबे धरणातून अतिरीक्त पाणी उपलब्ध आहे. नवी मुंबई महानगरपालिका बारवे धरणातून एम.आय.डी.सी. जवळून प्रतिदीन ९५ दललि पाणी उचलत आहे. ह्या सर्व गोष्टी

विचारात घेऊन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मोरबे धरणातून १०० दललि पाणी त्वरीत मिळण्यासाठी कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

श्री. हंसूकुमार पांडे आपला जो प्रस्ताव आहे तो आपण घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

मिरा भाईंदर मे बहोत सारे इंडस्ट्रीयल इस्टेट है। जिसमे कस्तुरी इस्टेट, एम.आय.इंडस्ट्रीज, अे.वाय. इंडस्ट्रीज, दोशी इस्टेट, मेहता स्टेट, अशोक इस्टेट, हितेंद्र इस्टेट ऐसे बहोत सारे इंडस्ट्रीअल इस्टेट है। लेकिन इस महानगरपालिका के इन तमाम इंडस्ट्रीज से बहोत सारे टॅक्सेस और एल.बी.टी. मिरा भाईंदर को मिलते है। लेकिन इंडस्ट्रीज मे कोई साफसफाई, इंडस्ट्रीज के लिए कोई प्रोव्हीजन महानगरपालिका मे है या नही यह मैं जानना चाहता हूँ। आज तक कभी इंडस्ट्रीज में कोई काम नही हुआ हैं। इंडस्ट्रीज में कोई गटर नहीं है। कोई इंडस्ट्रीज के अंदर नल का कनेक्शन किसी को दिया नही हैं। नाही इंडस्ट्रीज में रस्ता बरोबर हैं। जहा भी गटर है, वो इतना भरा हुआ हैं कि, उसमें साफसफाई नही होती है। उसके कारण पुरे रस्ते के उपर गटर का पानी आता है। और इंडस्ट्री के रस्ते पर पुरा कचरा भरा हुआ रहता है। कचरे का ढेर रहता है। और उस कचरे को लास्ट में हमे मजबुरन जलाना पडता है। नगरपालिका के जो कर्मचारी आते है, वो पैसा मांगते है। पैसा देंगे जो हम उठायेंगे, यह भाषा चलती है। सबसे ज्यादा फायदा महानगरपालिका को इंडस्ट्रीजसे होता है। एल.बी.टी. के माध्यम से लगभग १००-११० करोड रुपया हर साल महानगरपालिका को आता है। लेकिन सुविधा के नामपर इंडस्ट्री को कुछ भी नही मिलता है। ऐसा क्यों? इस चीज का जवाब दिया जाए। मिरा भाईंदर मैं जो इंडस्ट्रीअल एरिया है, उसके आजूबाजू के परिसर मैं इस कचरे के वजह से कही सारी बिमारीया फैलती है। कामगारों को भी बिमारीया होती है और रहिवासीयों को भी बिमारीया होती है। दवा फवारणी नही होती है, ना पावडर छिडकाव होता है। कुछ नही होता है। इंडस्ट्रीवाले ने क्या गलती किया है। यह जरा आरोग्य डिपार्टमेंट को पुछेंगे।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, श्री. हंसूकुमार पांडे यांनी आता जे वक्तव्य केले. माझ्या प्रभाग समिती क्र. ०२ मध्ये जास्तीत जास्त औद्योगिक वसाहत आहे. त्यामध्ये मी आपल्याला एक पत्र दिले, त्याच्यासोबत सीडी पण दिलेली आहे. की, पाच-पाच वर्षापासून एक गटार उघडलेले नाही. कचऱ्याचे ढीग पडले आहेत. रस्ता बुझलेला आहे. रस्त्याच्या ठिकाणी कचऱ्याचे ढिग झालेले आहेत. अशी एक सीडी मी आपल्याला दिलेली आहे. आपण बघितली की नाही ते माहिती नाही. आठ तारखेला आपल्याला पत्र आणि सीडी दिलेली आहे. या सीडी मध्ये इंडस्ट्रीमधील कामगारांचे वक्तव्य मी ऐकले की, नगरपालिकेचे कर्मचारी, एस.आय, मुकादम हे पैशाची मागणी करतात. पैसे दिले तरच आम्ही कचरा उचलू असे प्रत्यक्ष म्हटलेले आहे. ठेकेदार, एस.आय. आणि मुकादम हे सगळे मिलीभगत असून, आपल्याला इंडस्ट्रीजमधून एल.बी.टी. मिळते, टॅक्सेस मिळतात अनेक प्रकारचे परवाने आपण त्यांना देतो. पण त्यांना कुठलीही सुखसुविधा दिली जात नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

ठेकेदार इतना बडा बडा टेंडर लेता है, तो उसको कचरा उठाना चाहिए।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा विषय श्रीम. प्रभात पाटील मॅडमनी आणला होता. त्यावेळेला आपण रुलिंग दिलेली होती. तरी सुध्दा परत विषय येतो म्हणजे आपला वचक राहिलेला नाही का?

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, श्री. हंसुकुमार पांडे यांनी जो विषय आणलेला आहे तो चांगला विषय आहे. श्रीम. प्रभात पाटील यांनी मागे लक्षवेधी टाकली होती. आपण रुलींग पण दिलेले होते. माझे म्हणणे असे आहे की, हे इंडस्ट्रीजसाठी आहे. पूर्ण मिरा भाईंदरमध्ये दररोजचा कचरा अजून उचलत नाही. त्यासाठी आपले काय चालू आहे? आपण ठेकेदारांना परत-परत मुदतवाढ देतो आहे, त्याचे काय? कुठपर्यंत हे असे चालणार आहे? ते थांबणार की नाही?

**हंसुकुमार पांडे :-**

इंडस्ट्रीज के लिए बजेट मे कोई प्रोव्हीजन है की नही है?

**एस.ए.खान :-**

बजेटमध्ये पूर्ण शहराचा कचरा उचलण्याचे प्रोव्हीजन असते असे नसते की, इंडस्ट्रीचा उचलायचा आणि बाकीचा नाही.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदरमध्ये कचऱ्याचा विषय चाललेला आहे. याच्यावर प्रशासनाने जास्त लक्ष देऊन आठ दिवसामध्ये तसा अहवाल तयार करावा आणि आठ दिवसामध्ये याचा पाठपुरावा झालेला आहे असा लेखी पत्रव्यवहार आम्हाला करावा.

**शशिकांत भोईर :-**

एक शोकप्रस्ताव आहे. कुमार देवानंद जयवंत पाटील, वय २१ वर्षे व कुमार रुपेश मधुकर खंडागळे, वय २१ वर्षे हे गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी गेले होते समुद्रात पोहण्यासाठी उतरले असता समुद्रात बुडुन दि.०१/११/२०११ रोजी निधन झाले. मृत व्यक्तीस श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करावी असा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दुःखवठा ठराव क्र. ८३ :-**

खारी गावातील कुमार देवानंद जयवंत पाटील वय २१ वर्षे व कुमार रूपेश मधुकर खंडागळे वय २१ वर्षे हे गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी गेले होते. समुद्रात पोहण्यासाठी उतरले असता समुद्रात बुडून दि ०१/११/२०११ रोजी निधन झाले. मृत व्यक्तिस श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी २ मिनिट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली देण्यात यावी.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ४.२८ वाजता.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**